म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. ६५६

REFBK-0009082

# अनुक्रमणिका


१ निवेदन

२ थोरांचे आशीर्वाद

३ अर्पणपत्रिका

४ महाराष्ट्र शारदा मंडळ पार्श्वभूमि पूर्वार्ध १

५ महाराष्ट्र शारदा मंडळ पार्श्वभूमि उत्तरार्ध १८

परिशिष्टे

पहिलें .... .... ३४

दुसरें .... .... ३७

तिसरें .... .... ४०

चौथें .... .... ४१

पांचवें .... .... ६४

सहावें .... .... ६६

20958 इतिहास
६४८ १०१०१

# निवेदन

ग्वाल्हेरचे दक्ष, प्रजाहितैकतत्पर व सदैव कार्यमग्न असे कै. **श्रीमंत सर माधवराव महाराज शिंदे** अलिजाह बहादुर, हे १९२५ सालीं स्वर्गस्थ झाले त्यांचें व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावशाली आणि स्फूर्तिकारक असें होतें. त्यांचा स्वधर्माभिमान, स्वदेशाभिमान आणि स्वभाषाभिमान अत्यंत जाज्वल्य होता. ग्वाल्हेरच्या जयविलास राजवाड्यांतील गणपत्युत्सव आणि भारतीय प्राचीन विद्यांची आश्रित पंडितांची परंपरा, हें त्यांच्या उज्ज्वल स्वधर्माभिमानाचें; तसेंच पुण्यासारख्या महाराष्ट्राच्या पराक्रमाच्या आणि बुद्धिवैभवाच्या केंद्रस्थानी इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्तें पुण्यश्लोक नृपावळींत विराजणाऱ्या आपल्या छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांचा पुतळा बसवून घेतला, हें त्यांच्या स्वदेशाभिमानाचें; आणि कांहीं अपरिहार्य परिस्थितीमुळें व अडचणींमुळें आपल्या राज्यांत सर्वत्र फारशी भाषेचा प्रभाव गाजत असतांना देखील कै. **श्रीमंत माधवराव महाराजांनीं** आपल्या राज्याच्या 'खासगी' या विभागांत अट्टाहासानें आपली मातृभाषा जी मराठी ती कायम ठेविली व कांहीं थोड्या बाबीं वगळल्या तर ते बहुधा सर्वत्र आपलें सगळें लिखाण मोडी लिपींतूनच करीत असत, हे त्यांच्या स्वभाषाभिमानाचें ठळक व ठसठशीत प्रतीक होय. असें हे स्वधर्मभक्त, स्वदेशभक्त, व स्वभाषाभक्त **श्रीमंत सर माधवराव महाराज** कैलासवासी झाल्यानंतर ग्वाल्हेरचें नेतृत्व साहजिकच त्यांच्याच तालमींत वाढलेले व मुरलेले त्यांचेच पट्टशिष्य जे श्रीमंत सरदार शितोळेसाहेब, श्रीमंत सरदार आंग्रे साहेब, आणि श्रीमंत सरदार फाळके साहेब, या तरुण, होतकरु व तडफदार अशा लोकांकडे आलें. याचेंच फळ म्हणजे आपल्या अपूर्व भूमिकेनें व वैशिष्ट्यानें महाराष्ट्रांत सर्वत्र गाजलेलें १९२८ सालच्या एप्रिल महिन्यांतील ग्वाल्हेरचें अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचें, संपूर्ण राज्यैश्वर्यानें नटलेलें तेरावें अधिवेशन होय. त्या अधिवेशनाचें अध्वर्युत्व श्रीमंत सरदार **चंद्रोजीराव आंग्रे** यांनीं मोठ्या हौसेनें, उत्साहानें व धडाडीनें अगदीं स्वयंस्फूर्तीनें पत्करलें होते. व ते त्यांनीं आपल्या मोठेपणास व नांवलौकिकास साजेल अशाच रीतीनें पारही पाडलें. या अधिवेशनाच्या बाबतींत अगदीं आरंभापासून शेवटपर्यंत सर्व गोष्टींत श्रीमंत सरदार आंग्रेसाहेब

यांच्या बरोबर काम करण्याचा योग प्रस्तुत लेखकास लाभला असल्यानें त्या वेळचे स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांच्या जळजळींत अभिमानानें भारलेलें व रंगलेलें ग्वाल्हेरचें तें दिव्य चित्र आजही त्याच्या डोळ्यासमोर मूर्तिमंत उभे आहे. ग्वाल्हेर-करांच्या त्या वेळच्या मनोमंदिराचें यथातथ्य, हुबेहूब चित्र रेखाटण्याचा प्रस्तुत लेखकानें या पुस्तकांत कसोशीनें प्रयत्न केला आहे. त्यावेळीं ग्वाल्हेरकर महाराष्ट्रीयांच्या मनांत कोणकोणतें भाव उसळून येत होते, कोणकोणत्या भावना तरळत होत्या, कोणकोणत्या महत्वाकांक्षा उफाळून येत होत्या, त्यांचे यथार्थ असेंच चित्र उमटविण्याचा येथें प्रयत्न केला आहे. त्यांत अतिरंजितपणा अथवा अतिशयोक्ति मुळींच नाहीं. त्यांत कांहीं दोष असला तर तो प्रस्तुत लेखकाच्या लेखणीच्या सामर्थ्याभावामुळें उत्पन्न झालेल्या ऊनोक्तीचाच दोष असेल व आहेही. पण त्याबद्दल तो क्षमेस पात्र होईल अशी आशा आहे.

त्यावेळीं, आजचे मध्यभारताचे राजप्रमुख श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे आलिजाह बहादुर हे अगदीं अल्पवयी, अवघें बारा वर्षांचें असलें तरी त्या वेळचा तो संमेलनाच्या अधिवेशनाचा सोज्वल सोहळा त्यांच्या स्मृतिपटावर अद्यापही ताजा असाच असल्याचें आढळून येईल. कै. श्रीमंत सर माधवराव महाराजांच्या अंगचे वरील सद्‌गुण श्रीमंत जयाजीराव महाराज यांच्या अंगींही उत्कटत्वानें वसत आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. श्रीमंत जयाजीराव महाराजही आपल्या परम पूज्य तीर्थरूपांच्या पावलावर पाऊल टाकूनच वागत असतात ही गोष्ट खरोखरच त्यांस फार भूषणावह आहे. लोकांच्या सुखदु:खाशीं समरस होऊन वागण्याची कला त्यांना फार उत्कृष्ट साधली असल्यानें ते किती लोकप्रिय झाले आहेत हें सांगावयास नकोच.

ग्वाल्हेरच्या त्या वेळच्या त्या संमेलनाच्या अधिवेशनाला आज सुमारें चोवीस वर्षे उलटून गेलीं. एवढ्या या दोन तपांच्या दीर्घ कालावधींत ग्वाल्हेरला संमेलनाचें आणखी एखादें अधिवेशन भरविण्याचा योगच आला नाहीं. पण याच कालांत बडोदे व इंदूर या और भारतीय मोठ्या महाराष्ट्रीय संस्थानांनीं एकेक अधिवेशन आणखी भरवून ग्वाल्हेरवर पुनः आघाडी मारली. ही उणीव भरून निघावी म्हणून आम्ही गत वर्षी, ग्वाल्हेरकरांनीं संमेलनाच्या अधिवेशनास पुन: आमंत्रण द्यावें

म्हणून मुंबईच्या '**लोकसत्ता**' या दैनिकांतून ग्वाल्हेरकरांस प्रेमाची सूचना केली* पण त्याच वेळीं **श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे** यांच्या परदेशगमनामुळें तो योग जुळून आला नाहीं. पण आतां तशी कांहींच अडचण नाहीं. तरी ग्वाल्हेरकर या संधीचा अवश्य फायदा घेतील आणि आपली जबाबदारी पार पाडतील अशी बळकट आशा वाटते.×

सरतेशेवटीं ज्या थोर व ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध आणि वयोवृद्ध लोकांनीं या माझ्या मातृभाषाविषयक स्वल्प सेवेचा, माझ्या **महाराष्ट्र शारदा मंडळ** नामक योजनेचा आपल्या अधिकारयुक्त वाणीनें मनःपूर्वक पुरस्कार केला आहे त्या **लोकनायक डॉ. माधव श्रीहरि अणे, दी राइट ऑनरेबल डॉ. मुकुंदराव रामराव जयकर, नामदार न. वि.** उर्फ **काका साहेब गाडगीळ,** रा. ब. सरदार **माधवराव विनायक किबे, श्री. नारायण गोविंद चाफेकर, श्री. जनार्दन सखाराम करंदीकर,** आणि **श्री. नरहर शंकर रहाळकर** यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहे.

तसेंच इंदूरचे लोकप्रिय, त्यागी व निगर्वी वृत्तीचे, आणि गोड व निरलस स्वभावाचें सार्वजनिक कार्यकर्ते **श्री. नारायण वामन पंतवैद्य** यांनीं हें पुस्तक छापण्याच्या कामीं जी उदार मनानें आर्थिक मदत केली तांबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

**गोविंद बळवंत माकोडे**

---

* हा लेख या पुस्तकाच्या परिशिष्टांत छापला आहे. परिशिष्ट ६ पहा.

× ग्वाल्हेर राजस्थ मराठी साहित्य संमेलनाचें पहिलें अधिवेशन १९२७ सालीं, जिनसी बिल्डिंगमध्यें भरविण्यांत आलें. त्यानंतर आठ वर्षांनीं म्हणजे १९३५ सालीं त्याच ठिकाणीं त्याच संमेलनाचें दुसरें अधिवेशन भरविण्यांत आलें. त्याच अधिवेशनांत हा प्रस्तुतचा लेख म्हणजे 'अखिल भारतीय तेराव्या मराठी साहित्य संमेलनाची भूमिका व वैशिष्ट्य' हा वाचला गेला. पण वास्तविकपणें पाहतां हा लेख त्या सम्मेलनाच्या बरीच वर्षें अगोदर म्हणजे १९३० च्या आरंभींच लिहिला गेला होता. पण तो छापून निघण्याचा योग मात्र आज इतक्या विलंबानें येत आहे.

# थोरांचे आशीर्वाद

इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष, व्हायसरॉयच्या कौन्सिलचे सभासद, सीलोनमध्ये भारताचे हाय कमिशनर, बिहार राज्याचे गव्हर्नर, पाटणा युनिव्हर्सिटीचे चान्सेलर, मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आदि पदें मंडित केलेले नामदार डॉ. **माधव श्रीहरि अणे** म्हणतात:—

"आपल्या **महाराष्ट्र शारदा मंडळाच्या** योजनेचे जनक या नात्यानें महाराष्ट्रांत सर्वत्र प्रसिद्धि पावलेले मध्यभारतांतील नामांकित साहित्यिक श्री गोविंद बळवंत माकोडे यांची नव्यानें ओळख करून द्यावयास पाहिजे असें नाहीं. मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठीं आजवर जे जे प्रयत्न झाले, त्यांत श्री माकोडे यांच्या प्रयत्नांचाही प्रामुख्याने उल्लेख करावयास पाहिजे यांनी अत्यंत परिश्रमानें व निरनिराळ्या बाजूंनीं विचार करुन तयार केलेली **महाराष्ट्र शारदा मंडळा**ची योजना अत्यंत व्यापक स्वरूपाची असून दूरदर्शीपणाची व दूरगामी परिणामाची आहे. तींत ज्या भारतांतील व इतरत्र असलेल्या निरनिराळ्या भाषांतील तज्ज्ञांशीं व इतर ज्ञानविज्ञानाच्या संस्थांशीं संपर्क ठेऊन परस्पर सहकार्य करण्याच्या बाबतींत ज्या सूचना व योजना केल्या आहेत, त्यांचें महत्व वर्णन करावं तेवढें थोडेंच होणार आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां श्री. माकोडे यांची योजना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित स्वरूपाची नसून तिला संबंध भारताच्या दृष्टिनेंही मोठें महत्व आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून महाराष्ट्र साहित्य परिषदेने या योजनेला मूर्त स्वरूप देण्याचा अवश्य प्रयत्न करावा. श्रीं माकोडे यांनीं या बाबतींत सूक्ष्म व स्वतंत्र बुध्दीनें विचार केलेला असल्यामुळें या कामी त्यांचा मोठाच उपयोग होण्यासारखा आहे, हें सांगावयास नकोच.

× × ×

होळकर संस्थानाचे माजी दिवाण, महाराष्ट्र साहित्य परिषद् व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यांचे भूतपूर्व अध्यक्ष राव बहादुर, सरदार-**माधवराव विनायक किबे** एम्. ए. म्हणतात:—

श्री. गो. ब. माकोडे यांचा दीर्घ व्यासंग, कोणत्याही गोष्टीचा अंत:स्थळा पावतों जाण्याची प्रवृत्ति, मौलिक विचारांची प्रसूति, हे गुण आनुवंशिक आहेत, त्यांत त्यांनीं स्वत:च्या तीक्ष्ण बुद्धीची भर घातली आहे. त्यांनीं मराठी भाषेचा उत्कर्ष करण्याची जी योजना आज अनेक वर्षांच्या विचारांनीं ठरविली आहे, ती अत्यंत विचारणीय आहे. व तिला अमलांत आणण्याकरितां अधिकारी व्यक्तींनीं सहाय्य करण्या सारखी आहे. पूर्वी विशिष्ट देशी राज्यांचे लहान मोठे शासक स्वभाषेस यथाशक्ति उत्तेजन देत असत. पण आतां लोकसत्ताक राज्यांचे अंग प्रत्यंग मोठ्या आकाराचे आणि अधिक कार्यक्षम, द्रव्याच्या दृष्टिनेंही, झालें आहे. तेव्हां हा समय भाषाभिवृद्धीच्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांसाठीं अत्यंत अनुकूल आहे. मुंबई राज्य मराठीच्या दृष्टीनें बहुजन संख्येच्या मातृभाषेचे आहे. मध्य प्रदेशांत मराठीस हिंदीच्या बरोबरीनें स्थान दिलें गेलें आहे. मध्य भारताचे **राजप्रमुख** आणि उभयता **उपराजप्रमुख** हेही आज पावेतों मराठीच्या उत्कर्षास सहाय्य करीत आले आहेत. ते श्री माकोडे यांच्या योजनेचा पाठपुरावा करून ती अमलांत आणण्यास अवश्य ते सर्व करतील अशी अपेक्षा करणें योग्यच होईल."

× × ×

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे व महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष आणि मुंबई युनिव्हर्सिटीच्या डॉक्टर या पदवीचे मार्गदर्शक, बदलापूरच **श्री. नारायण गोविंद चापेकर** बी. ए., एल् एल् बी. म्हणतात:—

"माझ्या माहितीप्रमाणें **शारदा मंडळाचा** विचार आज कैक वर्षे श्री. गोविंदराव माकोडे ह्यांच्या मनांत घोळत आहे, हा आपली कल्पना लोकांना पटवून देण्यासाठीं जिवाचें रान त्यांनीं केलें आहे, हें मला माहित आहे. ह्या विषयावर त्यांच्याइतका विचार व त्यांनीं केले तेवढे परिश्रम दुसऱ्या कोणी केल्याचे मला माहित नाहीं. **श्रीमंत सयाजीराव गायकवाड** ह्यांना मराठी अकेडेमी स्थापन करावयाची उत्सुकता होती. परन्तु प्रचार करणे त्यांना शक्य नसल्यानें व इतरांत तद्विषयक अज्ञान वसत असल्यानें ती कल्पना जागच्या जागींच जिरली. **सयाजीरावांना** जें करितां आलें नाहीं ते श्री. माकोड्यांनीं केलें आहे. त्यांनीं **शारदा मंडळाची** योजना विस्तारपूर्वक महाराष्ट्राला सादर केली आहे.

ह्या नंतर पुढील कार्याचा बोजा राजेरजवाडे, सरदार-उमराव ह्यांनीं उचलणें भाग आहे. ह्या कामीं सध्यां **श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे** हेच पुढाकार घेण्यास

योग्य आहेत, ह्यांत संशय नाहीं. त्यांच्याकडे माकोडे ह्यांनीं दाखविल्याप्रमाणें फार मोठा वारसा आलेला आहे. त्याची त्यांना जाणीव नाहीं असें नाहीं. कारण ते मराठी भाषेचे व संस्कृतीचे अभिमानी आहेत. लोककल्याणाची तळमळ त्यांना लागून राहिली आहे. खेरीज बाणेदारपणाही त्यांच्यांत आहे. **शारदा मंडळाचें** कार्य आपलें असें समजून त्यांनीं तें सिद्धीस नेल्यास भारताच्या इतिहासांत त्यांचे नांव अजरामर होईल ह्यांत संशय नाहीं. कारण हें कार्य तितक्या योग्यतेचें आहे. त्यांच्या पूर्वजांनीं हातांत तरवार असतांना लेखणी चालविली आहे. आतां कोणत्याही राजाला म्यानांतून तरवार बाहेर काढण्याचें कारण उरलें नाहीं. तेव्हां साहित्याला त्यांनीं वाहून घ्यावें हें उचित आहे.

ह्या कामीं माकोडे व **श्रीमंत सरकार ग्वाल्हेर** ह्यांना परमेश्वर यश देवो असें मीं इच्छितों."

× × ×

**श्री. जनार्दन सखाराम करंदीकर** बी. ए., एल् एल् बी., **केसरी** चे भूतपूर्व **संपादक** व **केसरी-मराठा** संस्थेचे विद्यमान **विश्वस्त** लिहितात.

"श्री. गोविंद बळवंत माकोडे हे महाराष्ट्रीय साहित्यिकांच्या चांगल्या परिचयाचेच आहेत. गेल्या पंचवीस तीस वर्षांत मराठी साहित्याच्या अभिवृद्धी साठीं जे प्रयत्न झाले, विशेषत ग्वाल्हेरकडून जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांत श्री. माकोडे यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला आहे. या संबंधींची त्यांची **महाराष्ट्र शारदा मंडळाची** योजना अत्यंत विचारपूर्वक व परिश्रमपूर्वक तयार केलेली आहे तींत मराठीखेरीज अन्य भाषीय साहित्यिक तसेंच विशिष्ट विषयाला वाहिलेल्या इतर तज्ज्ञांशीं व संस्थांशीं संपर्क ठेऊन परस्पर साहाय्य व सहकार्य करण्याविषयीं ज्या सूचना व योजना केल्या आहेत त्या अत्यंत महत्वपूर्ण आहेत. श्री. माकोडे यांच्या या **शारदा मंडळाच्या** योजनेला महाराष्ट्राच्याच केवळ नव्हे, तर अखिल भारतीय दृष्टीनेंही मोठें महत्व आहे. ही गोष्ट लक्षांत ठेऊन **महाराष्ट्र साहित्य परिषदेनें** या योजनेला कार्यवाहींत आणण्याचा अवश्य प्रयत्न करावा. व या कामीं श्री.माकोडे यांचा चांगला उपयोग करून घ्यावा.

येथें हेंही सांगणें अगत्याचें वाटतें कीं, ज्या तळमळीनें, ईर्षेनें व उत्साह भरानें ग्वाल्हेरकरांनीं या **महाराष्ट्र शारदा मंडळाच्या** योजनेवर आपलें सगळे लक्ष केंद्रित करून तिच्या संबंधींचा ठराव ग्वाल्हेर संमेलनाकडून अगदीं निरपवाद अशा

एक मतानें पास करून घेऊन तिला मूर्त स्वरूप देण्याची जबाबदारी मोठ्या हौशीनें व आनंदानें पत्करली, त्याच तळमळीनें, ईर्षेनें व उत्साहभरानें ग्वाल्हेरकरांनीं आतां, इतक्या उशीरानें कां होईना, ती आपल्या शिरावरील जबाबदारी पार पाडण्याचें आपलें कर्तव्य बजवावें. या कामीं ग्वाल्हेरकरांस त्यांचे तरुण, होतकरु व मराठी भाषा, वाङ्‌मय व संस्कृति यांच्याविषयीं जाज्वल्य अभिमान बाळगणारे **श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे** अलिजा बहादुर यांचें पूर्ण पाठबळ मिळेल असा आम्हांस भरंवसा वाटतो. "

× × ×

मध्य भारतांतील सुप्रसिद्ध कवि, आधुनिक मराठी काव्य सृष्टींतील नवयुगप्रवर्तक जे 'केशवसुत' कवि त्यांचे स्नेही, चरित्रकार व रसिक टीकाकार आणि 'शाकुंतल सौंदर्य' या सर्वोत्कृष्ट प्रबंधाचे लेखक **श्री. नरहर शंकर रहाळकर** म्हणतातः—

"मध्य भारतांतील एक नामांकित पंडीत कै. **कै. बळवंतराव कमळाकर** यांचे नामांकित चिरंजीव श्री. **गोविंद बळवंत माकोडे** यांनीं मराठी साहित्याच्या समुन्नति साठीं तयार केलेली **महाराष्ट्र शारदा मंडळ** नामक जी योजना ती त्यांच्या घराण्याच्या साहित्यिक लौकिकास सर्वथैव साजेशीच आहे. तीवरून श्री. माकोडे यांच्या अंगीं उत्कटत्वानें वसत असलेल्या कल्पकता, योजकता, दूरदर्शिता, परिश्रमशीलता इत्यादि गुण चांगलेच प्रतीत होतात. ही योजना मराठीसाठी जरी केलेली असली, तरी ती भारतांतील इतर भाषांनाही तितकीच लागू होण्या सारखी आहे. या दृष्टीनें पहातां या योजनेस सहजच सार्वभारतीय महत्व प्राप्त होतें. मराठी साहित्याचा उत्कर्ष घडवून आणण्या हेतूनें आजवर अनेकांचे अनेक रीतींनीं प्रयत्न झाले आहेत व होत आहेत. व ते आपापल्या परींनीं उपयुक्तच आहेत. पण इतक्या व्यापक व सर्वंकष स्वरूपाचा श्री. माकोडे यांचा हा प्रयत्न अद्वितीयच होय. आमच्या माहिती प्रमाणें श्री. माकोडे हे या विषयाचा आज पसतीस वर्षें सारखा विचार करीत आहेत. **महाराष्ट्र शारदा मंडळ** अस्तित्वांत आल्यास त्याचा पुढील कार्यक्रमही त्यांनीं आपल्याजवळ आंखून ठेवला आहे. तो ही नुकताच आमच्या पहाण्यांत आला आहे. त्यावरून त्यांची या कार्याविषयींची तळमळ व त्यांचा अदम्य उत्साह हीं चांगलीच प्रत्ययास येतात. '**महाराष्ट्र शारदा मंडळा**' सारख्या एकाद्या संस्थेची स्थापना झाल्याशिवाय मराठी साहित्याच्या

अभिवृद्धीसाठीं होणाऱ्या प्रयत्नांना एकरूपता, सूत्रबद्धता आणि स्थायिकता येणें अशक्य आहे. ग्वाल्हेरकरांनीं हें कार्य तडीस नेण्याची जबाबदारी एकदां पतकरली आहे. मध्यभारताचे **राजप्रमुख श्री जयाजीराव महाराज शिंदे** यांच्या पुढाकाराखालीं होळकर, गायकवाड, छत्रपति भोसले, पवार, पटवर्धन इत्यादि महाराष्ट्रीय संस्था निकांच्या सहाय्यानें व महाराष्ट्रांतील नामांकित साहित्यिकांच्या सहकार्यानें ग्वाल्हेरकर ही आपल्या शिरावरील जबाबदारी पार पाडतील अशी आम्हांस मोठी आशा वाटते

आमच्या मतें मध्यभारतांत महाराष्ट्रीयांचें एक प्रबळ सांस्कृतिक केंद्र असणें फार अगत्याचे आहे. **महाराष्ट्र शारदा मंडळाची** ग्वाल्हेरीस स्थापना झाल्यास हा हेतू पुष्कळ अंशीं सिद्ध होईल, व त्यायोगें ग्वाल्हेरचें महत्वही अनेक पटींनीं वाढेल हें निःसंय.

सरते शेवटीं श्री. माकोडे यांचे प्रयत्न सत्वर सुफलित होवोत असें आम्हीं मनःपूर्वक इच्छितों."

× × ×

दी राईट ऑनरेबल **डॉ. मुकुंदराव रामराव जयकर** पी. सी., एम्. ए., डी. सी., एल्., एल् एल् डी., पुणे विद्यापीठीचे कुलगुरु, म्हणतात:—

"आपल्या महाराष्ट्र शारदा मंडळाच्या पुस्तका वरून नजर फिरविली असतां मला असें आढळून आलें कीं, श्री. डॉ. मा. श्री. अणे, श्री. नारायण गोविंद चापेकर श्री. जनार्दन सखाराम करंदीकर आदि अधिकारी लोकांनीं व्यक्त केलेल्या मताशीं मीही सहमतच आहे. आपल्या प्रयत्नाला मी सुयश चिंतितों."

× × ×

भूतपूर्व केंद्रिय वीजमंत्री नामदार **न. वि. उर्फ काका साहेबगाडगीळ** म्हणतात:-

"**महाराष्ट्र शारदा मंडळाची** आपली योजना स्वागतार्ह आहे, व ती अधिकारी मंडळीपुढें ठेवल्यास जरूर तो पाठिंबा तीस मिळेल असें मला वाटतें."

20758

# अर्पण पत्रिका

श्रीमंत सरकार जयाजीराव महाराज शिंदे

आलिजाह बहादुर

राजप्रमुख

मध्यभारत गव्हर्नमेंट, ग्वाल्हेर,

यांस

त्यांची स्वधर्मनिष्ठा, स्वदेशभक्ति, स्वभाषाभिमान, विद्यानुराग, प्रजावात्सल्य, मुत्सद्दीपणा, कार्यकुशलता, दयाळुपणा, औदार्य, दानशूरत्व, सौजन्य, विनयशालित्व, इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन प्रस्तुत लेखकानें हें पुस्तक सादर समर्पित केलें आहे.

गोविंद बळवंत माकोडे

नोच्यार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामोलघुः
( Low aim, not failure, is crime )

# महाराष्ट्र शारदा मंडळ

उर्फ

## अखिल भारतीय तेराव्या मराठी साहित्य संमेलनाची

# भूमिका व वैशिष्ट्य

( पूर्वार्ध )

ग्वाल्हेर-राज्यस्थ किंबहुना मध्यभारतीय मराठी साहित्यिकांच्या संमेलनाचें हें दुसरें अधिवेशन आज आपण या ठिकाणीं हर्षोत्फुल्ल अंतःकरणानें साजरें करीत आहों, ही मोठ्या सौभाग्याची गोष्ट आहे. योगायोग असा कीं, बरोबर आठ वर्षांपूर्वी याच जागीं, याच दिवशीं याच संमेलनाचें पहिलें अधिवेशन मोठ्या थाटामाटानें साजरें झालें होतें. आजच्या या आनंदाच्या प्रसंगीं संमेलन विषयक त्या वेळच्या आणि इतरही अनेक आठवणी जागृत होणें प्रस्तुत लेखकाच्या बाबतींत तरी केवळ अपरिहार्य आहे. प्रस्तुत संमेलनाचें पहिलें अधिवेशन १९२७ सालीं भरविण्यांत आलें, त्यानंतर अखिल भारतीय महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें तेरावें अधिवेशन १९२८ च्या एप्रिल महिन्यांत येथें भरविण्यांत आलें. या गोष्टी खऱ्या असल्या तरी ग्वाल्हेरीस संमेलन भरविण्याच्या कल्पनेचा जन्म या काळाच्या बराच मागें जातो. स्वराज्यांत संमेलन भरविण्याची प्रथा पाडण्याचा मान बडोदेकरांनीं प्रथम पटकाविला. १९०९ सालीं बडोद्यास भरलेलें महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें सहावें अधिवेशन हें स्वराज्यांत भरविण्यांत आलेलें पहिलें अधिवेशन होय. त्यानंतर १९१७ सालीं इंदुरास भरविण्यांत आलेलें संमेलनाचें नववें अधिवेशन हें स्वराज्यांत भरलेलें दुसरें अधिवेशन होय. यापुढचें स्वराज्यांत भरलेलें तिसरें अधिवेशन म्हणजे बडोदेकरांनीं बारा वर्षांच्या विश्रांतिनंतर १९२१ सालीं

भरविलेलें संमेलनाचें दहावें अधिवेशन होय. बडोद्यास हें संमेलनाचें अधिवेशन दुसऱ्यानें भरविण्याचें घाटत असतांनाच तें अधिवेशन ग्वाल्हेरीस भरविण्याचा विचार येथल्या कांहीं मंडळींच्या मनांत आला व लागलीच तसा थोडा प्रयत्नही करण्यांत आला. ही गोष्ट येथें पुष्कळ लोकांस माहीतही नसेल. पण अनेक अप-रिहार्य अडचणीमुळें तें भाग्य ग्वाल्हेरला त्यावेळीं लाभलें नाहीं. आणि विशेष दुर्दैवाची गोष्ट ही कीं, परमपूज्य कै. सर माधवराव महाराज यांना ही संमेलन भरविण्याची कल्पना पूर्णपणें पसंत पडूनही त्या वेळच्या कांहीं विशिष्ट परिस्थिती-मुळें या बाबतींत त्यांचा अगदीं निरुपाय झाला. कै. सर माधवराव महाराजांच्या समोर हा संमेलनाचा योग घडून आला असता तर त्यांची अचूक दूरदृष्टि, अमोघ कार्यकौशल्य, अप्रतिम धडाडी इ. त्यांच्या अंगीं वसत असलेल्या अनेक दुर्मिळ गुणांचा चांगला उपयोग होऊन मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृध्दीसाठीं केल्या जाणाऱ्या प्रयत्नांस त्यांची बहुमोल मदत झाली असती. १९२१ सालीं प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्तें पुणें मुक्कामीं श्री शिवछत्रपतींचा पुतळा बसविण्याच्या कामीं कै. महाराजांनीं जी महनीय कामगिरी बजाविली तीवरून त्यांच्या स्वर्गवासामुळें संमेलनाचें व त्याबरोबर मराठी भाषेचें व साहित्याचें केवढें नुकसान झालें असेल पाहिजे, याची पुष्कळ अंशीं कल्पना येऊं शकेल. महाराजांची ही अतृप्त राहिलेली इच्छा त्यांच्या ठिकाणीं निस्सीम भक्ति असलेल्या ग्वाल्हेरकरांच्या अंतःकरणांत सारखा घोळ घालीत राहून त्यांनां कधीं चैन पडूं देत नसे. कै. महाराजांच्या वियोगामुळें होणाऱ्या दुःखाचें ओझें तसेंच रेटून नेत असतांही त्यांनीं कै. महाराजांच्या इच्छेच्या तृप्तीच्या कार्यास मोठ्या धैर्यानें हात घातला आणि कै. महाराजांची स्मृति कायम रहावी व त्यांच्या स्फूर्तिदायक स्मृतीनें कार्यकर्त्यांच्या मनांत कर्तव्य जागृतीची ज्योत सतत पाजळत रहावी या हेतूनें श्रीमाधव मराठी वाङ्मय मंडळाची ग्वाल्हेर येथें स्थापना करण्यांत आली. आपल्या मातृभाषेच्या व राजभाषेच्या उत्कट अभिमानानें प्रेरित होऊन या माधव मंडळानें आपल्यासमोर जें ध्येय ठेविलें होतें तें ग्वाल्हेरच्या नांवलौकिकास सर्वथैव साजेसेंच होतें. ग्वाल्हेर राज्यांत ज्या ज्या ठिकाणीं मराठ्यांची म्हणजे मराठी-भाषकांची वसति असेल, त्या प्रत्येक ठिकाणीं मराठी वाचनालयें व ग्रंथालयें उघडून लोकांत साहित्याभिरुचि निर्माण करणें, वक्तृत्वोत्तेजक सभा स्थापून मराठी भाषेंत परिणामकारक रीतीनें आपले विचार

व्यक्त करण्यास लोकांस उत्तेजन देणें; बोलण्याप्रमाणेंच मराठींत लिहिण्याची कला हस्तगत करतां यावी म्हणून साहित्यसेवाविषयक सभांची म्हणजेच **श्री माधव मराठी वाङ्मय मंडळाच्या** शाखांची स्थापना करणें; या कामीं उत्पन्न होणाऱ्या अडचणींच्या निवारणासाठीं परस्पर सल्लामसलत, सहाय्य आणि सहकारिता करतां यावी आणि मराठी भाषा विषयक अभिवृद्धीच्या या प्रयत्नास जोम व तेज चढावें ह्मणून परस्परांत प्रेममूलक अहमहमिका लागावी, या हेतूनें असल्या प्रकारच्या संमेलनांचीं अधिवेशनें भरविणें आणि तद्वारा या बाबतींत होणाऱ्या आपल्या प्रगतीची सालोसाल मोजदाद करून पुढील वर्षांतील प्रगतीचा कार्यक्रम आंखणें; पूर्वेतिहासावर प्रकाश पाडण्याच्या उद्देशानें संशोधनाचें कार्य चालू करणें; या कामीं मदत व्हावी म्हणून पुराण वस्तूंचा संग्रह करणें; आणि या सर्व चळवळींत चैतन्य उत्पन्न होऊन स्फूर्तीचा झरा अखंड वाहत रहावा, या हेतूनें साहित्य, शास्त्र आणि कला या क्षेत्रांत अपूर्व यश मिळविलेल्या व्यक्तींच्या छायाचित्रांनीं वा तैलचित्रांनीं सुशोभित झालेली अशीं नररत्नमंदिरें यथाशक्य निर्माण करणें अशा प्रकारच्या विद्यमान व्यक्तींचीं यथावसर व्याख्यानें करविणें; इत्यादि नानाविध कार्यांच्या रूपानें ग्वाल्हेर राज्याच्या कोनाकोपऱ्यांतूनही मराठी भाषा आणि साहित्य यांच्या उत्कर्षाच्या दुंदुभीचा नाद सतत वर्षभर दुमदुमत रहावा म्हणून पडेल तो प्रयत्न आणि लागेल तो स्वार्थत्याग करण्याचा ग्वाल्हेरनें त्या वेळीं चंगच बांधला होता. या कार्याचा उठाव एका जूटीनें व एका हाकेनें एकदम सर्वत्र करतां यावा ह्मणूनच प्रस्तुत संमेलनाचें पहिलें अधिवेशन वर सांगितल्या प्रमाणें आठ वर्षांपूर्वीं नक्की याच दिवशीं, याच स्थळीं आणि याच प्रसंगीं भरविण्यांत आलें होतें. या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान जगविख्यात पंडित, ग्वाल्हेरचे माजी सरन्यायाधिश टिळक महाविद्यापीठाचे कुलगुरु रा. ब्र. चिंतामण विनायक वैद्य एम्.ए. एल-एल. बी. यांनीं मंडित केलें होतें, या एकाच गोष्टिवरून त्या वेळचें तें अधिवेशन किती यशस्वी झालें असेल, हें सांगावयास नकोच.

प्रस्तुत संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनाच्या अपूर्व यशानें ग्वाल्हेरचा उत्साह दुणावला असल्यास त्याचें आश्चर्य वाटावयास नको. अशा मनःस्थितींत ग्वाल्हेर येथें त्यानंतर भरविण्यांत यावयाच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचें तेरावें अधिवेशनही त्याच मानानें यशस्वी करून दाखविण्याच्या कामीं ग्वाल्हेरला केवढें

स्फुरण चढलें होतें, याची यथार्थ कल्पना त्या वेळचें तें रम्य दृश्य ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें असेल, त्यांसच होणें शक्य आहे. त्या उत्साहाच्या भरांत, मराठ्यांच्या सत्तेचा सूर्य आपल्या माध्यान्हींच्या प्रखर तेजानें सर्व भरतखंडभर तळपत असतांना मराठी साम्राज्याची आपल्याकडे आलेल्या पुढारीपणाची ग्वाल्हेरला आठवण होऊन आजकालच्या बौद्धिक युगांतही तसलेंच पुढारीपण साहित्यविषयक क्षेत्रांतही गाजविण्याची इच्छा ग्वाल्हेरला झाली असल्यास ती निदानपक्षीं क्षम्य तरी ठरेल. First deserve and then desire या न्यायानें पहातां ग्वाल्हेरची ही इच्छा किंवा ही हांव म्हणा, कितपत सयुक्तिक आणि सुसंगत होती, आणि ती सफल करून दाखविण्याचें सामर्थ्य वा पात्रता ग्वाल्हेरच्या अंगीं कितपत होती हे प्रश्न येथें साहजिकच उभे राहातात. त्यांचा योग्य तो परामर्श घेतल्याशिवाय पुढें जातां येणें शक्य नसल्यामुळें त्यांच्याविषयीं येथें विवेचन करणें अवश्य आहे.

ग्वाल्हेर आणि मराठी या दोन शब्दांचें साहचर्य बऱ्याच जणांना बुजवितें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. मराठीचा आणि ग्वाल्हेरचा संबंध त्यांना बादरायण संबंधाइतकाच जवळचा वा दूरचा वाटतो. पण ग्वाल्हेरप्रमाणेंच महाराष्ट्रांतून येऊन उत्तर हिंदुस्थानांत वसलेल्या बडोदे व इंदूर या ज्या दुसऱ्या दोन प्रमुख मराठी वसाहति, त्यांच्या बाबतींत मात्र मराठी संबंधीं त्यांना तसें वाटत नाहीं. याचें एक उघड कारण जें दिसतें तें हें कीं, जे शब्दप्रयोग व वाक्य प्रयोग इंदूर व बडोदे या ठिकाणीं मराठी भाषकांच्या तोंडीं वावरत असतांना कधींही कानीं पडत नाहीं, त्यांचा ग्वाल्हेरीस पहिल्या पासूनच भडिमार सुरु होतो. उदाहरणार्थ 'मामला,' 'तबादला,' 'तकरूरी,' 'तनख्वुली,' 'काबिलियत,' 'लिहाजा,' 'इसदाई,' वगैरे शब्दप्रयोग; 'जेर निगराणी' 'काबिल गौर' 'हस्ब मन्शाय,' 'मुंदर्जे बाला' इत्यादि पदसंघ; व "वल्दियत व सकूनत यांची वखवियत नसल्यानें कानूनी चाराजोई मुमकीन नाहीं" "मामले हाजात सरपरस्तानें इसदाईपासूनच दरपेश केलेल्या वजूहाती खिलाफ़ कानून पावल्या गेल्या" अशा प्रकारचे वाक्यप्रयोग यांचा ग्वाल्हेरच्या मराठी भाषकां खेरीज इतरांस काय बोध होणार ? अशा प्रकारच्या मराठीला मराठी हें नांव तरी देतां येईल काय ? अशा स्थितींत ग्वाल्हेरसंबंधीं वरील समजूत प्रचलित असलेली आढळल्यास त्यांत काय आश्चर्य ? जमीन, महसूल, जमाखर्च खानगी, हीं ग्वाल्हेर राज्याचीं शुद्ध मराठी म्हणून मोडलीं जाणारीं खातीं, यांत आजही असल्याच प्रकारची मराठी भाषा रूढ आहे. ही वस्तुस्थिति

कितपत इष्ट आहे याचा आपणच विचार करावा. सर्व सामान्य जनतेच्या तोंडीं रूढ न झालेल्या परकीय भाषेंतील शद्वांना विभक्ति प्रत्यय अथवा अव्यय जोडल्यानें त्यांचें मराठीकरण होईल कीं काय हा एक प्रश्नच आहे. आमच्या मतें मराठी करणाचें मुख्य लक्षण म्हणजे सर्व सामान्य जनतेच्या तोंडी साहजिकपणें व स्वाभाविकपणें रूढ होणें, हें होय. परकीय भाषेंतील शद्वांचें मराठीकरण करण्याचा हाच एक नैसर्गिक उपाय आहे. अशिक्षित समाजाला, विशेषत: त्यांतील स्त्रियांना जे प्रयोग सरास सहज समजू शकतात त्यांना मराठींत गणावयाप्त अनमान करण्याचें कांहींच कारण नाहीं. मग ते कोणत्याही भाषेंतील असोत. असो. एकीकडे ग्वाल्हेर आणि दुसरीकडे इंदूर व बडोदे यांच्यांत हा जो भाषाविषयक आणि इतरही कांहीं गोष्टींत विलक्षण फरक आढळतो त्यांचीं कारणेंही पण उघड उघड दिसणारीं अशीं आहेत. बडोदे तर महाराष्ट्राला चिकटलेलें, निदान चिकटल्यासारखेंच आहे म्हटलें तरी चालेल. त्यामुळें महाराष्ट्राशीं त्याचें दळणवळण अविरतपणें चालूच असतें. बडोदे हें महाराष्ट्राला इतके निकट आहे कीं, त्याला महाराष्ट्राचें सीमा-प्रांतीय ठाणेंच म्हटलें तरी शोभेल. इंदूरची गोष्ट याहून थोडी भिन्न आहे. इंदूर व महाराष्ट्र यांच्या दरम्यान विंध्य, सातपुडा आणि नर्मदा आदि नैसर्गिक अडथळे आहेत ही गोष्ट खरी. पण लोहमार्गाच्या सोयीमुळें हे अडथळे असून नसल्यासारखेंच झाले आहेत. कारण या अडथळ्यांमुळें इंदूरच्या महाराष्ट्राशीं असलेल्या दळणवळणामध्यें विशेषसा फरक पडल्याचें दिसत नाहीं. यास्तव इंदूर व बडोदे यांनीं महाराष्ट्राच्या सांनिध्यामुळें व संगतिमुळें मराठीविषयींच्या मोठमोठ्या चळवळी देखील हातीं घेणें स्वाभाविक वाटते. पण तेंच ग्वाल्हेरनें मराठीविषयीं कांहीं विशेष गोष्ट करण्याचें मनांत आणणेंही धाडसाचेंच वाटतें. कारण ग्वाल्हेरची स्थिति इंदूर व बडोदे या दोहोंहून अगदी वेगळीं आहे. एक तर, तें महाराष्ट्रापासून अत्यंत दूर पडलें. दुसरें, असें कीं, पंजाब, राजपूताना, बुंदेलखंड व रोहिलखंड यांसारख्या विसदृश व परस्पर भिन्न संस्कृतीच्या लोकांनीं तें वेढलें गेलें आहे. किंबहुना, या बाबतींत तें एक प्रकारच्या कोंडींतच सांपडल्यासारखें झालें आहे. तिसरें, असें कीं, आरंभापासूनच दिल्लीच्या राजकारणाशीं खेळत व झुंजत राहण्याचें प्रसंग पडल्यामुळें साहजिकच यावनी संस्कृतीच्या संस्कारांत तें वाढत गेलें. या साऱ्या गोष्टी मराठी संस्कृति आणि मराठी भाषा यांना त्या कालीं मारकच होत्या आणि आजही या संमेलनप्रसंगीं त्या तशाच आहेत. परिस्थितीची अशी सर्व बाजूंनीं प्रतिकूलता असतानाही मराठी

विषयक कामगिरीची ग्वाल्हेरनें ईर्षा धरावी, ही अमळ विलक्षणच वाटण्यासारखी गोष्ट असली, तरी तीमुळें ग्वाल्हेरची मराठीविषयींची आस्था व कळकळ हीं अधिकच उठून दिसतात. मराठीविषयक प्रस्तुत चळवळ हातीं घेण्याच्या मूळाशीं याच भावनांची प्रेरक शक्ति कार्य करीत होती हें उघड आहे.

परकीय मुलखांत स्वसंस्कृतीचें संरक्षण करणें किती कठिण, किंबहुना अशक्य असते, याची कल्पना घरीं बसलेल्यांना म्हणजे स्वभूमींतल्या लोकांना होणें दुरापास्तच असते. वर सांगितल्याप्रमाणें बिकट परिस्थितींत सांपडल्यामुळें ग्वाल्हेरच्या मूठभर महाराष्ट्रीयांपुढें आपल्या संस्कृतीच्या संरक्षणाचा प्रश्न किती तीव्र स्वरूपांत उभा राहिला असेल, याची कल्पना, जावें त्याच्या वंशा, तेव्हांच कळे. भाषेनें, धर्मानें, संस्कारांनीं व आचारविचारांनीं सर्वस्वी विसदृश, किंबहुना विरोधी अशा लोकसमुदायांत वावरणें किती गैरसोयीचें आणि जिकीरीचें असते, हें, आजच्या धर्माच्या आणि समाजबंधनाच्या शैथिल्याच्या काळांतही, जेव्हां आपण परप्रांतांत जातो, तेव्हां जाणवतें. मग ज्या वेळीं हीं बंधनें अगदीं कडकपणें पाळलीं जात होतीं, त्या वेळीं किती त्रास व कष्ट भोगावे लागत असतील, हें कोणीं सांगावें! पुन्हां, जिज्ञासु किंवा हौशी प्रवासी म्हणून परमुलुखांत जाणें निराळें आणि जेते, शासक किंवा शत्रु म्हणून जाणे व वावरणें निराळें. या दोहोंत जमीन अस्मानाचें अंतर असतें, ही गोष्टही लक्षांत घ्यावयास पाहिजे. यांतच पुन्हां प्रतिस्पर्ध्यांच्या आक्रमणशील वृत्तीची भर पडल्यामुळें ओढवणाऱ्या अनर्थपरंपरेचें वर्णन करणें शक्य तरी आहे काय? याशिवाय संख्याबळाचाही विचार कमी महत्वाचा असतो असें नाहीं. अशा परिस्थितींत आपला निभाव काढून घेणें म्हणजे केवढें दिव्य असेल याची आजच्या शांततेच्या काळांत काय कल्पना होणार? अशल्या दिव्यांतून पार पडतां येण्यासाठीं अंगीं तसेंच कांहीं अलौकिक गुण, अलौकिक सामर्थ्य आणि अलौकिक धैर्य असल्याखेरीज निभाव लागणें अशक्यच आहे. पण, ज्याअर्थीं ग्वाल्हेरचे महाराष्ट्रीय या सर्व दिव्यांतून तावून सुलाखून सहीसलामत बाहेर पडले आहेत, त्याअर्थीं त्यांच्या अंगीं तसेच अलौकिक गुण निःसंशय वास करीत असले पाहिजेत ही गोष्ट उघड, नव्हे, स्वयंसिद्धच आहे. खास महाराष्ट्रांत, वरील वस्तुस्थितीच्या अभावीं, यापैकीं एकाही संकटाची यथार्थ कल्पना होणें शक्यच नाहीं. अशा स्थितींत स्वधर्म, स्वभाषा आणि स्वसंस्कृति यांचें रक्षण करणें हाही एक अचाट पराक्रमच होय. आणि हाच अचाट पराक्रम

ग्वाल्हेरनें करून दाखविला आहे. यावरून त्याचें नैतिक आणि अध्यात्मिक अधिष्ठान किती कणखर, किती जोमदार आणि किती चिवट व जिवट असलें पाहिजे, हें सहज समजून येईल.

ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे ग्वाल्हेर येथें मराठी संतांच्या ज्या इतक्या संस्था आहेत, त्या कां, याचा उलगडा होतो. निरनिराळ्या प्रकारच्या या महाराष्ट्रीय धार्मिक संस्थांना जें इतकें महत्व आणि जी इतकी लोकप्रियता प्राप्त झाली आहे, ती कां, याविषयींचें कोडें उलगडतें. या गोष्टीचें मूळ ग्वाल्हेरच्या उपरीनिर्दिष्ट परिस्थितींतच सांपडतें. ग्वाल्हेरला दरसाल जे अनेक भंडारे वगैरे होतात, त्यांच्या स्वरूपाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असेंच आढळून येतें कीं, मनुष्याच्या मनांत निसर्गतःच जी धर्मबुद्धि वास करीत असते, तिची केवळ परिपूर्ती करणें हा एकच उद्देश त्यांच्या बुडाशीं नाहीं. कारण तसें असतें तर मराठ्यांच्या इतर अनेक वसातींतही अशा संस्थांचा उदय एवढ्याच मोठ्या प्रमाणावर खास झाला असता. पण ज्याअर्थीं हा प्रकार एवढ्या मोठ्या प्रमाणांत दुसऱ्या कोठेंही झालेला आढळून येत नाहीं, त्याअर्थीं ग्वाल्हेरची विशिष्ट परिस्थितीच त्याच्या उदयास कारणीभूत झाली असली पाहिजे हें उघड आहे. अगदींच विसदृश किंबहुना विरोधी व आक्रमणशील यावनी संस्कृतीच्या कोंडींत सांपडल्यामुळें तिच्या प्रतिकारासाठीं स्वसंस्कृतीच्या संरक्षणाचा कोट जितका बळकट आणि भरभक्कम करतां येईल, तितका तो करणें भागच होतें. ग्वाल्हेरला ज्या या निरनिराळ्या प्रकारच्या धार्मिक व सामाजिक संस्था किंवा प्रथा आहेत, त्यांचा जन्म याच भावनेच्या पोटीं झालेला स्पष्ट दिसतो. परकीयांच्या प्रतिकारार्थ परिपुष्ट झालेलें ग्वाल्हेरचें धार्मिक व सामाजिक वातावरण मराठ्यांच्या इतर कोणत्याही वसाहतींत, किंबहुना, तीर्थस्थानें सोडलीं तर खास महाराष्ट्रांतील प्रमुख ठिकाणींही इतक्या दृढ स्वरूपांत आढळणें कठिण आहे. पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या मराठ्यांच्या धार्मिक व सामाजिक परंपरा जितक्या अविकृत स्वरूपांत ग्वाल्हेरीस आढळतील तितक्या त्या बृहन्महाराष्ट्रांत इतरत्र सांपडणें कठिणच वाटतें. इंदूर किंवा बडोदे यांच्या इतका पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव ग्वाल्हेरवर न पडण्याचें कारण तरी हेंच होय. ग्वाल्हेरच्या पुराणप्रियतेचें बीज प्रगतिपराङ्मुखतेंत नसून स्वधर्म व स्वसंस्कृतीच्या च्युतीच्या भयांत आहे. यावरून अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतही आपल्या धर्माचे, आपल्या परंपरेचें ग्वाल्हेरच्या

मराठ्यांनीं जें इतक्या कडवेपणानें रक्षण केलें आहे, त्याबद्दल ग्वाल्हेरकरांस अभिमान व इतरांस कौतुकच वाटावयास पाहिजे.

स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें संख्याबळाच्या विचाराला आपोआप महत्त्व चढतें, हें वर सांगितलेंच आहे. विजिगीषू राष्ट्राला तर संख्याबळाचा विचार पहिलें करावा लागतो. विजिगीषा आणि आत्मरक्षण वा स्वसंस्कृतिरक्षण या दुहेरी विचारानें संख्याबळाच्या वृद्धीकडे विशेषच लक्ष पुरविण्यांत आलें असले पाहिजे, यांत शङ्का नाहीं. ग्वाल्हेरच्या महाराष्ट्रीय वसाहतीच्या मध्यकाळांत येथल्या महाराष्ट्रीयांची संख्या बरीच मोठी असली पाहिजे हें सांगावयास नकोच. बदललेल्या परिस्थित्यनुरूप विजिगीषेच्या आणि स्वसंस्कृतिसंरक्षणाच्या कार्याच्या तीव्रतेंत जसजशी शिथिलता उत्पन्न झाली असेल, तसतसा हा संख्याबळाचा विचार मागें मागें पडत गेला असेल. आमचा असा अजमास आहे कीं, आजच्या काळाच्या जसजसें मागें जाण्याचा प्रयत्न होईल तसतशी ग्वाल्हेरीस महाराष्ट्रीयांची संख्या अधिकाधिक असलेली आढळून येईल. आणि असें मागें जातां जातां मराठ्यांची सत्ता या प्रांतांत पूर्णपणें प्रस्थापित झाल्याचा बिंदु ज्या वेळीं लागेल, त्या काळीं येथल्या मराठ्यांच्या संख्येची परिसीमाही झालेली आढळून येईल. हा विषय जितका मनोरंजक तितकाच उपयुक्त आणि आवश्यक असल्यानें या विषयासंबंधीं शास्त्रीय रीत्या संशोधन होणें अगत्याचें आहे. या विषयाचे स्वाभाविकपणेंच दोन भाग पडतात. मराठ्यांच्या या प्रांतांतील वसाहतीच्या आरंभापासून १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर स्थिरस्थावर होईपर्यंत म्हणजे १८६० पर्यंतचा कालविभाग हा पहिला भाग होय, आणि १८६१ पासून आजतागायतचा कालखंड हा दुसरा भाग होय. भारताची पहिली शिरोगणना १८६१ सालीं झाली. तेव्हांपासून आतांपर्यंत एकंदर आठ शिरोगणना झाल्या. या शिरोगणनांमुळें तर दुसऱ्या कालखंडाचें काम बरेंच सुलभ झालें आहे. मराठ्यांच्या या प्रांतांतील स्थित्यंतराचा हा इतिहास अनेक दृष्टींनीं बोधप्रद आणि मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाहीं. हें अंमळ विषयांतर झालें खरें, पण तें अनिवार्य आणि अवश्यही होतें. असो.

या संख्याबलसंवर्धनाचा साहजिकपणेंच असा एक परीणाम झाला कीं, सबंध उत्तर भारतांत ग्वाल्हेर हें मराठ्यांचें सर्वप्रमुख असें ठाणेंच होऊन बसलें.

असलाच तर याला कदाचित् काशीचाच अपवाद असूं शकेल. मराठ्यांचें धार्मिक व सामाजिक या दृष्टींनीं एक प्रबल असें केंद्र या नात्यानें पुण्याच्या खालोखाल ग्वाल्हेरची गणना होत असे. व हें आपलें स्पृहणीय पद ग्वाल्हेरनें चालू शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत तरी निदान अविच्छिन्नपणें टिकविलें होतें, यांत शंका नाहीं.

स्वधर्म, स्वभाषा आणि स्वसंस्कृति यांच्या संरक्षणासाठीं ग्वाल्हेरनें जसा संतपरंपरेचा संग्रह केला, तसाच त्यानें संस्कृत विद्याविषयक पांडित्यपरंपरेचाही संग्रह केला. ग्वाल्हेर राज्याच्या ' खाजगी ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खात्यांत ' आश्रित ' या नांवाचा जो वर्ग आहे, तोच या पांडित्यपरंपरेचा सध्यां शिल्लक उरलेला अवशेष होय. श्री आणि सरस्वती यांच्या परस्पर भेटीचे कपिलाषष्ठीवत् योग विक्रम, हर्ष, मुंज, भोजादि प्राचीन काळच्या राजांच्या दरबारांतच घडून आलेले ऐकण्यांत आहेत. तसेंच ते अर्वाचीन काळीं ग्वाल्हेरच्या राजदरबारांतही घडून आलेले आहेत. श्री आणि सरस्वती यांच्या परस्पर सहवाससुखाच्या नानाविध विलासांच्या उपभोगाचें भाग्य ग्वाल्हेरनें अर्वाचीन काळींही मनमुराद लुटलेलें आहे. येथल्या पांडित्यपरंपरेचे जे तुरळक अवशेष आजही येथें दृष्टीस पडतात, त्यावरून वरील विधानाचा पडताळा पहाण्यास कोणासही अडचण पडणार नाहीं. येथें संस्कृत विद्येच्या वेदवेदांगें, न्याय, मीमांसा, व्याकरण, ज्योतिष, धर्मशास्त्र, साहित्य, सांख्य वेदान्तादि निरनिराळ्या शास्त्रांतील पारंगततेच्या ज्या परीक्षा घेतल्या जात, त्यांचा लौकिक काशीपासून रामेश्वरापर्यंत दुमदुमत असे. या परीक्षा घेणाऱ्या पंडितांची संख्या इतर संस्कृत विद्येच्या केंद्रांतील पंडितांच्या संख्येपेक्षां जरी कदाचित् कमी असली, तरी विद्वत्तेंत इतर ठिकाणच्या त्या त्या शास्त्रांतील पंडितांपेक्षां येथले पंडित कोणत्याही रीतीनें कमी नसत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ग्वाल्हेरनें या प्राचीन पांडित्याच्या बाबतींत, हजारोहजार वर्षांपासून जिची आज त्रिखंड कीर्ति गाजत आहे त्या विश्वेश्वराच्या प्रत्यक्ष काशीशीं दीर्घकालपर्यंत अत्यंत यशस्वितेनें स्पर्धा चालविली होती. ही पांडित्यपरंपरा कमी अधिक प्रमाणानें व प्रभावानें ग्वाल्हेरनें आजपर्यंत टिकवून ठेविली आहे, ही गोष्ट ग्वाल्हेरीस मोठी भूषणावह आहे, यांत शंका नाहीं. जी गोष्ट पांडित्याची तीच गायनादि कलांचीही. आतां या परंपरांचें पुनरुज्जीवन होऊन त्यांना शक्य तितक्या लवकर पूर्वीचें तेजस्वी आणि स्पृहणीय स्वरूप प्राप्त होईल अशी व्यवस्था होणें जरूर आहे. असो.

वरील सर्व विवेचनाचें तात्पर्य हें कीं, स्वसंस्कृति संरक्षणाचा जो जो उपाय दिसला त्याचा ग्वाल्हेरनें मोठ्या आस्थेनें आणि उत्साहानें आजवर पुरस्कार आणि अंगीकार केलेला आहे. अशा स्थितींत मराठी साहित्य संमेलनाच्या पुरस्काराच्या बाबतींतही ग्वाल्हेरची हीच वृत्ति प्रकट झाली असल्यास त्याचें आश्चर्य वाटावयास नको. मराठीच्या अभिवृद्धीसंबंधांत ग्वाल्हेरनें संकल्पिलेल्या विशाल योजनाच मराठी विषयक त्याची आस्था व तळमळ व्यक्त करितात. ग्वाल्हेरच्या मराठीच्या अवकळेच्या जाणीवेच्या पोटींच त्या विशाल योजनांचा जन्म झाला आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे अवकळेच्या प्रतिक्रियारूप योजनांचें महत्व कोणासही सहज पटेल. ग्वाल्हेरनें ज्या योजना संमेलनाच्या संमतिसाठीं मांडल्या, व त्यांची उपयुक्तता पटवून ज्या त्याजकडून संमतही करून घेतल्या त्यांचा उगम बृहन्महाराष्ट्रांतच कां व्हावा त्याचा याप्रमाणें उलगडा होतो. आपण संकल्पिलेल्या योजनांच्या भवितव्यतेविषयीं ग्वाल्हेरनें तात्विक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंनीं पूर्ण विचार करून ठेवला होता. व या बाबतींत स्वतःवर येणाऱ्या जबाबदारीची जाणीवही त्यास तीव्रतेनें झाली होती. त्या योजनाप्रीत्यर्थ ग्वाल्हेरकडून संमेलनप्रसंगीं दाखविण्यांत आलेला उत्साह हा त्या जाणिवेचाच परिणाम होता. हा सारा इतिहास ज्यांना ठाऊक आहे त्यांना ग्वाल्हेरच्या संमेलन विषयक वृत्तींत व वर्तनांत विसंगत असें कांहींच आढळून येणार नाहीं. संमेलन म्हणजे बुद्धिविलासाची केवळ रंगभूमि या दृष्टीनें ग्वाल्हेरनें त्याकडे कधींच पाहिलें नाहीं. आपल्या बुडत्या मायभाषेला सुरक्षिततेच्या व पुढें उत्कर्षाच्या बंदरावर पोंचविणारें तारू, हीच ग्वाल्हेरची संमेलनाकडे पहाण्याची दृष्टि होती. संमेलन हें बुद्धिचापल्याचें क्रीडांगण नसून आपल्या मायभाषेचें तें माहेरघर आहे अशीच ग्वाल्हेरची संमेलनविषयक भावना होती. ग्वाल्हेरनें संमेलनाची जी तयारी चालविली ती याच दृष्टीनें व भावनेनें. इष्ट गोष्टीच्या प्राप्तीसाठीं कराव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागाची ग्वाल्हेरनें पूर्ण तयारी केली होती. अशा प्रकारचा स्वार्थत्याग करणें हें ग्वाल्हेरच्या आज कित्येक पिढ्यांपासून अंगवळणींच पडलें होतें. या गोष्टीचें प्रत्यंतर म्हणजे ग्वाल्हेरीस आपला संसार सुखानें चालवीत असलेल्या वर उल्लेखिलेल्या महाराष्ट्रीयांच्या विविध प्रकारच्या धार्मिक व सामाजिक अनेक संस्था होत. त्यामानानें मराठीला येथें उत्कर्षसोपानावर चढविण्याच्या कार्यांत ग्वाल्हेरला करावा लागणारा स्वार्थत्याग थोडा मोठा असला तरी तो एरवीं देखील ग्वाल्हेरच्या मनावर यत्किंचितही सळ उत्पन्न करणारा नव्हता. सारांश, या साऱ्या गोष्टींचा विचार केला तर मराठी

२०९५८ वि. ... नों: दि. ...

विषयक जें धोरण, ज्या आशा-आकांक्षा ग्वाल्हेरच्या मनांत उत्पन्न झाल्या होत्या त्या त्याच्य मराठीविषयक विशिष्ट परिस्थितीचा स्वाभाविक असा परिणामच होता. ग्वाल्हेरला दिसून येणाऱ्या मराठीच्या अवकळेचें स्वरूप जितकें भयानक व निराशाजनक होतें, त्याच मानानें तिच्या उद्धाराचाही प्रयत्न होणें अगत्याचें होतें व हाच प्रयत्न करण्याचें ग्वाल्हेरनें मनांत आणिलें होतें. परकीय मुलखांत आपल्या भाषेचें व संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीनें ग्वाल्हेरला शारदामंडळाच्या योजनेचा पुरस्कार करण्याची आवश्यकता वाटावी हें क्रमप्राप्तच होय. कारण वाङ्मय-संवर्धनाइतकें संस्कृतिसंरक्षणाचें प्रभावी साधन दुसरें कोणतें असणार ! यावरून ग्वाल्हेर कडून झालेल्या शारदामंडळाच्या पुरस्काराचा विचार ही एक त्याच्या मनांत उठलेली प्रासंगिक लहर नसून त्याच्या विशिष्ट परिस्थितीमुळें उद्भवणाऱ्या विचारांचा तो परिपाक होता, असें दिसून येईल. वर सांगितलेल्या इतर अनेक गोष्टींच्या मूळाशीं स्वभाषा, स्वधर्म आणि स्वसंस्कृतिसंरक्षण यांच्या दृढीकरणाविषयीं वसत असलेली जी भावना, तीच प्रस्तुत प्रसंगीं कालभेदानुरूप शारदामंडळाच्या पुरस्काराच्या स्वरूपांत रूपांतर पावली, असें म्हटल्यास तें वस्तुस्थितीस अधिक धरून होईल.

याशिवाय, या बाबतींत ग्वाल्हेरचा इतिहासही थोडा लक्षांत घेणें जरूर आहे. अचाट कृत्यें हातीं घेण्याचें आणि तीं धडाडीनें पार पाडण्याचें ग्वाल्हेरला जणूं काय बाळकडूच पाजलें गेलें आहे. 'सतां सिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे' हाच न्याय ग्वाल्हेरला लागू पडणारा आहे. पराक्रमी पुरुष साधनांची चिकित्सा अथवा काथ्याकूट कधींच करीत बसत नाहींत. अमुक एक गोष्ट करावयाचीच असें एकदां ठरलें म्हणजे ती केल्यावांचून त्यांस कधींच चैन पडत नाहीं. मग किती कां संकटें आडवीं येईनात. स्वतःच्या अंगीं वसत असलेल्या सामर्थ्याच्या बळावरच पराक्रमी पुरुष विजयश्रीला भुरळ पाडून वश करितात. अशा पुरुषांना अशक्य असें काय आहे ? आणि ज्याला कांहींच अशक्य नाहीं, त्याच्या बाबतींत साहसासाहसाचा प्रश्नच कुठें उपस्थित होतो ! साधनसामुग्रीची चिकित्सा, शक्याशक्यतेचा विचार, मागेंपुढें पाहून पाऊल टाकण्याचें धोरण, अनुकूल कालाची प्रतीक्षा इत्यादि साऱ्या गोष्टींचा विचार सामान्य माणसांच्या बाबतींत उत्पन्न होतो. वीर पुरुषांना या गोष्टी लागूच पडत नाहींत.

या दृष्टीनें पाहिलें तर ग्वाल्हेरला आज कोणत्या गोष्टीची उणीव आहे ?

पहिली गोष्ट अशी कीं, ग्वाल्हेरचें राजकीय ऐश्वर्य, त्याचा राजकीय दर्जा एवढा मोठा आहे कीं, त्याला कोणतीही गोष्ट अशक्य अशी नाहींच. ग्वाल्हेर जें जें मनांत आणील तें तें तडीस नेण्याचें पूर्ण सामर्थ्य ग्वाल्हेरच्या अंगीं आहे. आपल्या या मध्य हिंदुस्थानांत विस्तार व वैभव या दृष्टींनीं पाहिलें असतां ग्वाल्हेरची बरोबरी करील असें दुसरें कोणतेंच संस्थान नाहीं. इतकेंच काय, पण मराठी राज्य या दृष्टीनेंही पाहिलें असतां सबंध हिंदुस्थानांत ग्वाल्हेरराज्याइतकें मोठें मराठी राज्य दुसरें कोणतेंच नाहीं. बडोदें कदाचित् या गोष्टीला अपवाद म्हणून दाखवितां येईल. पण ग्वाल्हेर राज्याच्या अफाट विस्ताराकडे बोट दाखवून त्याहि अपवादाचें निराकरण करतां येतें. याशिवाय, संख्येनें व वैभवानें येथल्या सरदार जहागीरदारां-इतके सरदारजहागीरदार तर, निझामाचा एक अपवाद सोडला तर, सबंध हिंदुस्थानांतल्या दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकास दाखवितां येणार नाहींत. शितोळे, आंग्रे, जाधव, राजवाडे, फाळके, महाडिक इत्यादि अनेक घराणीं आज येथें राज्यैश्वर्यानें झळकत व मिरवत आहेत. या सरदारांपैकीं एकएकटा सरदारही मराठी विषयक अनेक कामें अंगावर घेऊन तीं तडीस लावूं शकतो. एवढें या प्रत्येकाचें स्वतंत्र सामर्थ्य आहे. ग्वाल्हेरचा एकएकटा सरदार मनांत आणील तर, केवढें चमत्कार करून दाखवूं शकेल, या गोष्टींचें प्रत्यंतर पटवून देण्यासाठीं दक्षिणेंतील एका चिमुकल्या संस्थानाकडे बोट दाखविल्यानें काम भागेल. युरोपांत जसें बेल्जम तसें हें भारतांत, आपल्या महाराष्ट्रांत, आदर्श संस्थान आहे. त्याचा विस्तार आणि उत्पन्न पाहिलें तर ग्वाल्हेरच्या आंग्रे, शितोळे इत्यादिकांच्या इतकें तरी असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. या इवल्याशा संस्थानानें एका महनीय कार्यासाठीं महाराष्ट्रांतील एका नामांकित संस्थेस एक लक्ष रुपयांची देणगी द्यावी, या एकाच गोष्टीवरून त्याच्या स्पृहणीयत्वाची आणि कुतुहलोत्पादकत्वाची कल्पना येईल. अशा अनेक लोकोपयोगी कार्यांना व चळवळींना या संस्थानाकडून सदासर्वकाळ सारखा हातभार लागतच असतो. या संस्थानासंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं बाहेरच्या पुढाऱ्यांचा आपल्या संस्थानांत मोठा आदरसत्कार करून व त्यांना चांगल्या चांगल्या देणग्या देऊन त्या कीर्तीच्या बळावर आपल्या प्रजाजनांवर नानाप्रकारचे जुलुम करून त्यांचा द्रव्यशोष करणाऱ्यांपैकीं हें संस्थान नव्हे. या संस्थानानें महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यालाही मुक्त हस्तानें भरभक्कम साहाय्य केलें आहे. असो.

जेथल्या सरदारांचें हें ऐश्वर्य तेथल्या राजघराण्याच्या ऐश्वर्याचें कोण आणि किती वर्णन करणार ? शिंद्यांचें राजघराणें हें आपल्या समकालीन अशा क्षत्रिय घराण्यांत अनेक दृष्टींनीं केवळ अद्वितीय असेंच आहे. मराठ्यांच्या साम्राज्याच्या उत्कर्षासाठीं तरण्याबांड शूर वीरांची एकामागून एक आहुति देण्याची तत्परता जी शिंदे घराण्यांत दिसून आली, तशी ती इतर सजातीय घराण्यांत क्वचित्च आढळते. तसेंच आज सार्वभौमत्वाचा सुखानें उपभोग घेत असलेली आणि अहंगंडानें पछाडलेली जी इंग्रजी राजसत्ता, तिलाही ज्या वीरानें आपल्या बुद्धिबळानें व बाहुबळानें पायबंद घालून कांहीं काळ दिङ्मूढ केलें होतें, त्या नरवीर महादजी ऊर्फ पाटीलबाबासारखें नररत्न याच शिंदेकुलाच्या खाणींतून निर्माण झालें होतें. या पाटीलबाबांचें नांव घेतांच ज्यांचें अंतःकरण प्रेमभरानें व अभिमानानें उचंबळून येत नाहीं, तो खरा मराठा म्हणजे महाराष्ट्रीयच नव्हे; व ज्याच्या अंगरख्याचे बंद वीरश्रीच्या उद्रेकानें तटातट तुटत नाहींत, तो अस्सल क्षत्रियच नव्हे. सत्तावन सालच्या स्वातंत्र्ययुद्धाची भारतभर जी लाट उसळली, तिनें हाय खाऊन सार्वभौमत्वाचा टेंभा मिरवणारी जी इंग्रजी राजसत्ता तिनें ज्याची शरणागति पत्करली ते उदारमनस्क आणि विविध-गुणी-जन-कुल-वेष्टित जयाजीराव महाराज, शिंदे-कुलभूषणच नव्हते काय ? प्रखर प्रकृतीच्या, न्यायनिष्ठुर स्वभावाच्या आणि सूक्ष्म व भेदक दृष्टीच्या राजवाड्यासारख्या प्रतिभासंपन्न पंडितानेंही पहिल्या प्रतीचे युद्धकलाविशारद म्हणून ज्यांचा गौरव केला ते परमपूज्य कै. सर माधवराव महाराज याच शिंदे कुलाला ललामभूत होऊन गेले ना ? सांप्रतचे आमचे अत्यंत प्रजाप्रिय आणि प्रजावत्सल श्रीमंत जयाजीराव महाराज, कीं जे आपल्या बालसुलभ निरागसतेनें, कुलविदग्ध सौजन्यानें आणि विनयांकित राज्यैश्वर्यानें ग्वाल्हेरकरांच्या अंतःकरणांत भावि सौख्यसंपन्नतेच्या नानाप्रकारच्या आशालहरींचा आज कल्लोळ उठवीत आहेत, त्यांनांही आपल्या अवतारकृत्याच्या सफलतेसाठीं याच शिंदे कुलांत जन्म घेण्याचा मोह पडावा, यापेक्षां अधिक शिंदे कुलाच्या थोरवीचा दुसरा कोणता पुरावा पाहिजे ? अशा या शिंदेकुलभूषणाला मराठीविषयक कोणतें कार्य अवघड वा अशक्य असें आहे ?

पण मराठीविषयक कार्य करण्याला असें हें राजबळ किंवा एवढें हें राज्य-बळच तेवढें ग्वाल्हेरला अनुकूल आहे असें नाहीं. वर उल्लेखिलेली संस्कृत भाषा विषयक पांडित्यपरंपरा जशी ग्वाल्हेरच्या पाठिशीं आहे, तशीच मराठीविषयक

साहित्य परंपराही व तीही अत्यंत उज्ज्वल अशी, ग्वाल्हेरच्या पाठिशीं आहे. आणि आश्चर्याची व अभिमानाची गोष्ट ही कीं, ही मराठीभाषाविषयक साहित्य परंपरा थेट महादजी महाराज उर्फ पाटीलबाबापर्यंत मागें जातें, इतकी ती जुनी आहे. पाटीलबाबांची पद्यें अथवा कवनें ज्यांच्या वाचण्यांत आलीं असतील, ते त्यांना साहित्यिकांच्या वर्गांत घालावयास कधींही अनमान करणार नाहींत. इतकीं तीं साहित्यगुणांनीं मंडित आहेत. सद्भावनेचा सलील व सुंदर उद्रेक हें जें साहित्याचें मुख्य लक्षण तें पाटीलबाबांच्या पद्यांत भरपूर आढळतें. पाटीलबाबांचा नित्य व्यव-साय, त्यांची विशिष्ट संकुल परिस्थिति, आणि त्यांनीं गाजविलेलें अचाट पराक्रम, या गोष्टी लक्षांत घेतां पाटीलबाबांचें पद्यवाङ्मय पाहून तोंडांत बोटच घालावेसें वाटतें. आणि असेंही म्हणण्याचा मोह उत्पन्न होतो कीं, पाटीलबाबांना रणक्षेत्रावर पराक्रम गाजविण्याला अवसर मिळाला नसता तर त्यांनीं तसलेंच पराक्रम साहित्य-क्षेत्रांत निःसंशय गाजविले असते. पाटीलबाबानंतर दौलतराव महाराजांचीही कांहीं कविता उपलब्ध आहे, असें म्हणतात. दौलतरावमहाराजानंतर ग्वाल्हेरच्या राजघराण्याच्या सरस्वतीनें गयेच्या फल्गुनदीप्रमाणें जनकोजी व जयाजी महाराज यांच्या मानससरोवरांतून मार्ग काढीत काढीत पुढें एका बाजूनें कै. सर माधवराव महाराजांच्या विशाल हृदयांत विशालरूप धारण करून गणपत्युत्सवांतील भजनस्पर्धांच्या प्रसंगीं त्यांच्या मुखावाटे धो धो वाहूं लागली; तर दुसरीकडून कै. सर बळवंतराव भैयासाहेब यांच्या मुखावाटे शांत, सौम्य व प्रसन्न रूप धारण करून लोकांना आल्हाद देऊं लागली. स्वर्गीय बळवंतरावभैयासाहेबांच्या वाणींत रसाळता किती ओतप्रोत भरलेली आहे, हें निदान येथल्या रसिक जनांस तरी सांगावयास नकोच. कै. सर माधवराव महाराज यांच्या विषयीं काटेकोरपणानेंच बोलावयाचें झाल्यास त्यांनीं लिहिलेल्या पॉलिसींच्या प्रचंड खंडांकडे सहज बोट दाखवितां येण्यासारखें आहे. राजकारणाचा विषय जात्याच रुक्ष असला तरी पॉलिसींच्या वाळवंटांतून वाट काढीत असतां अकल्पित रीतीनें साहित्याची हिरवळ जागोजाग आढळते. तसेंच प्रस्तुतचे लोकप्रिय प्रभु श्रीमंत जयाजीराव महाराज यांचें अल्पच पण प्रासंगिक लेखन ज्यांच्या अवलोकनांत आलें असेल, त्यांना त्यांच्या त्या लेखनांत ठळकपणें प्रकट होणाऱ्या साहित्यगुणांचीं बीजें किती सकस आणि जोमदार आहेत, हें स्पष्ट करून सांगण्याची गरजच नाहीं.

यथा राजा तथा प्रजा या न्यायास अनुसरून राजघराण्याप्रमाणेंच साहित्यसेवेची परंपरा चालविणारे सरस्वतीचे अनेक भक्त ग्वाल्हेरच्या सर्वसामान्य जनतेतही आढळणें साहजिकच आहे. येथील नाथसंप्रदायी श्री ढोलीबुवामहाराज यांचीं पदें येथें सुप्रसिद्ध आहेत. यांपैकीं पुष्कळशीं पदें योगशास्त्रांचीं रहस्यें उकलून दाखविणारीं आहेत, ही गोष्ट तज्ज्ञांस ठाऊकच आहे. येथील वयोवृद्ध सरदार श्रीमंत रामराव कृष्णराव जटार यांचे ' अव्यक्त बोध ' आणि ' स्वानंदसाम्राज्य ' हे दोन तत्वज्ञानविषयक गहन ग्रन्थ तज्ज्ञांच्या चांगल्याच परिचयाचे आहेत. येथले दुसरे एक तरुण मराठे सरदार श्रीमंत आनंदराव भाऊसाहेब फाळके यांनीं ' शिंदेशाहीच्या इतिहासाचीं साधनें ' या नांवानें प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक पत्रांच्या खंडांनीं मराठ्यांच्या उत्तर हिंदुस्थानांतील इतिहासावर, विशेषत: शिंदे घराण्याच्या कामगिरीवर, किती झगझगीत प्रकाश पाडला आहे हें इतिहासज्ञांस तरी सांगावयास नकोच. श्रीमंत फाळके साहेबांचा मराठेशाहीच्या इतिहासाचा व्यासंग केवढा दांडगा आहे, ही गोष्ट सदहू पत्रांच्या संपादनकौशल्यावरून सहज दृष्टोत्पत्तीस येते. कै. माधवराव व्यंकटेश लेले यांची विविध प्रकारची साहित्यसेवा महाराष्ट्रांत सर्वत्र सर्वमान्यच झालेली आहे. यांचे संस्कृत नाटकावरील ' सार व विचार', ' एक नष्टस्मृति साम्राज्य ' ( Sewell च्या Forgotten Empire चे भाषांतर ) आणि राजतरंगिणीचें भाषांतर यांनीं मराठी साहित्यांत किती महत्वाची भर घातली आहे हें कोणीहि सांगेल. कै. बळवंत राव कमळाकर माकोडे यांचा व्याकरणशास्त्र, धर्मशास्त्र, साहित्यशास्त्र आणि वेदान्त-शास्त्र यांत केवढा मोठा अधिकार होता, ही गोष्ट सर्वत्र सुप्रसिद्धच आहे. आपलें ' शास्त्रीय मराठी व्याकरण ' लिहिण्याची पूर्वतयारी म्हणून कै. प्रि. मोरो केशव दामले हे उज्जनीस असतां कै. बळवंतराव कमळाकर यांजपाशीं सतत सुमारें २ वर्षें नियमानें पाणिनीच्या ' अष्टाध्यायी' च्या अध्ययनासाठीं येत असत. त्याचाच परिपाक म्हणजे त्यांचें ' शास्त्रीय मराठी व्याकरण' व त्यांची 'मराठी शुद्धलेखनविषयक कामगिरी ' होय. गेल्या शतकाच्या अखेरच्या दशकांत करवीरच्या श्रीशारदा मठाच्या श्रींची स्वारी उज्जयिनीस आली असतां श्रींवर बळवंतरावजींच्या सर्वगामी पांडित्याचा इतका प्रभाव पडला होता कीं, त्यांचा आपल्याला अधिकांत अधिक सहवास मिळावा म्हणून श्रींनीं उज्जयिनीस आपलें वास्तव्य असें तोंपावेतों त्यांची सरकारी कामांतून सुटका करून घेतली होती. त्यांनीं आपल्या ' वैदिक धर्म' नामक मासिकांतून कीर्तीच्या आणि प्रभावाच्या अत्युच्च शिखरावर पोंचलेल्या स्पेन्सरवर खंड-

नात्मक जी लेखमाला चालू केली होती, तीवरून त्यांचा पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्वज्ञानाचा गाढ व्यासंग, त्यांचें वादकौशल्य आणि प्रतिस्पर्ध्याला निरुत्तर करणारा समर्पक कोटिक्रम यांची चांगलीच ओळख पटते. बळवंतरावजींच्या या लेखमालेबद्दल लोकमान्य टिळकांनाही बळवंतरावजींविषयीं मोठा आदर वाटत असे. त्यांचे साहित्यविषयक ग्रंथ आज सुमारें पन्नास साठ वर्षें निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून मराठीच्या बी. ए.; एम्. ए. या परिक्षांसाठीं नेमले जात आहेत, या एकाच गोष्टीवरून त्यांचा साहित्यांतील अधिकार व्यक्त होतो. याशिवाय ते कवीही होते. त्यांची बहुतेक कविता 'काव्यरत्नावली' तून प्रकाशित झाली आहे. यांची कविता सरस, अलंकृत, प्रौढ व प्रसादपूर्ण असते. यांच्या ठिकाणीं जुन्या नव्या विचारांचा मधुर संगम झाला होता. 'आमचा भिक्षुक वर्ग' म्हणून त्यांनीं एक लेख लिहिला होता. व त्यांत भिक्षुकवर्गाला नव्या काळाची जाणिव करून देऊन त्या काळाशीं मिळतें घेऊन आपल्या धर्माचें, संस्कृतीचें शुद्ध व उज्वल स्वरूप कसें टिकवून ठेवावयाचें याविषयींच्या व्यावहारिक सूचना भिक्षुकवर्गास केल्या होत्या हे दोन दोन तास अस्खलित संस्कृत बोलत असत आणि अर्धफूलस्कॅपचीं वीस वीस पृष्ठें एका बैठकींत संस्कृतमध्यें लिहून काढीत असत. आपली संस्कृत बोलण्याची, विशेषतः संस्कृत भाषण ऐकण्याची हौस भागवून घेण्यासाठीं जर्मन तत्वज्ञ पॉलड्युसेन हा आपल्या उज्जयिनीच्या मुक्कामांत कविश्रेष्ठ कै. भास्कर रामचंद्र तांबे ( जे त्यावेळीं विद्यार्थी दशेंत होते ) यांच्या द्वारा बळवंतरावजीस मुद्दाम भेटण्यास आला होता. ( ही गोष्ट स्वतः तांबे यांनींच आम्हांस सांगितली. ) यांचेच समकालीन व स्नेही, तत्वचिंतनांत नित्य निमग्न असणारे, अत्यंत प्रसिद्धीपराङ्मुख असे रामचन्द्र बळवंत डोंगरे यांची प्राच्यतत्वज्ञानविषयक प्रगाढ विद्वत्ता, 'योगरहस्य' आणि ज्ञानेश्वरांच्या अनुभवामृतावरील त्यांची टीका, या त्यांच्या दोन ग्रंथांवरून सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. हे दोन्ही ग्रंथ महाराष्ट्रीय विद्वन्मंडळांत उत्तम प्रकारची मान्यता पावलेले आहेत. तत्वज्ञानविषयक ग्रंथांत टिळकांच्या गीतारहस्यानंतर इतका सुरस आणि सुबोध तत्वज्ञानविषयक दुसरा ग्रंथ दाखविणें कठिणच आहे. हा अनुभवामृतावरील टीकात्मक ग्रंथ जितका गहन तितकाच सुगम आणि सरळ असल्यामुळें मराठींत अपूर्व आणि अद्वितीय असा झाला आहे. रामचंद्र बळवंत डोंगरे यांनी कै. बळवंतराव कमळाकर माकोडे यांच्या सहकार्यानें इंग्रजी आणि मराठी साहित्यशास्त्राची तुलना करणारा एक ग्रंथही

लिहिला होता. पण तो अप्रकाशितच राहिला आणि आजतर ता उपलब्धच नाहीं यांचेच सख्खे भाचे आणि आजच्या या आपल्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष भास्कर रामचंद्र तांबे यांच्या नुसत्या नांवाचा उल्लेख केला तरी त्यांच्या दैवीसंपत्तीची तेजाळ आणि रसरशीत मूर्ति आपल्या डोळ्यापुढें उभी राहते. पण तांबे हे केवळ कवीच नाहींत, ते मार्मिक टीकाकारही आहेत. आणि त्यांची वाणी तर इतकी रसाळ आहे कीं, श्रोत्यांना ती तासन् तास तल्लीन करून ठेवते. असेच आणखी एक ग्वाल्हेरस्थ उच्च प्रतीचे साहित्यिक म्हणजे गोपाळराव मुळे ( कानगो ) हे होत. यांची माहिती फारच थोड्या लोकांस आहे. हे एक चांगल्यापैकीं कवि असून रसिक असे काव्यमर्मज्ञही आहेत. यांचे मराठी व हिंदी भाषेवर चांगलेंच प्रभुत्व आहे. यांचा मृच्छकटिक नाटकाचा हिंदी अनुवाद अत्यंत सरस आणि मार्मिक असा उतरला आहे. पण तो अप्रकाशित आहे. या अनुवादाला जोडलेली प्रस्तावनाही त्यांच्या व्यापक व भेदक बुद्धीची चांगलीच साक्ष पटविते. याशिवाय आजचे आपले सन्मान्य अध्यक्ष प्रि. ताटके, डॉक्टर दिवेकर, प्रो. बोकील, प्रो. बापट प्रो. पराडकर, कै. इनामदार, प्रो. पंतोजी, कै. रा. ल. देसाई, इ. जुन्या पिढींतील साहित्यिक, आणि श्रीमंत रामचंद्रराव राजवाडे, श्री. रा. देसाई, के. वा. डांगे, शिरढोणकर इ. जे नव्या पिढींतील साहित्यिक यांची आपणा सर्वांस माहिती आहेच. याप्रमाणें ग्वाल्हेरची साहित्यपरंपरा आजवर अखंड चालू राहिलेली आहे. ग्वाल्हेरच्या साहित्यपरंपरेचें वैशिष्ट्य हें आहे कीं, येथील साहित्यिकांची संख्या मर्यादित असली तरी त्यांनीं केलेली साहित्यसेवा मात्र कांहीं कांहीं बावतींत इतक्या श्रेष्ठ दर्जाची आहे कीं मराठीच्या माहेरघरींही तिला तोड सांपडणें कठीणच आहे. ही गोष्ट ग्वाल्हेरीस जितकी भूषणास्पद तितकीच तीं अभिमानास्पदही आहे. या एकाच गोष्टीवरून ग्वाल्हेरकरांच्या साहित्यसेवाविषयक पात्रतेचा ठाम निर्णय लागतो. अशी उज्वल साहित्यपरंपरा पाठिशीं असलेल्या ग्वाल्हेरनें मराठी विषयक अपूर्व आणि महनीय अशी कामगिरी करून दाखविण्याची ईर्ष्या बाळगावी यांत वावगें किंवा विसंगत असें काय आहे ? ग्वाल्हेर संमेलनाच्या वेळीं प्रकट झालेल्या पण ग्वाल्हेरनें कित्येक दिवस पूर्वींपासून उराशीं बाळगून ठेवलेल्या मराठीविषयक आशा-आकांक्षा ग्वाल्हेरच्या या साहित्यपरंपरेस, इतिहासास आणि राजवैभवास सर्वस्वी साजेशाच होत्या याविषयीं आतां तरी कोणास शंका उरणार नाहीं.

## उत्तरार्ध

आतां आपण ग्वाल्हेरनें संमेलनविषयक ज्या कांहीं गोष्टी करावयाचें ठरविलें त्यांचा विचार करूं.

उत्कर्ष, उन्नती, अभ्युदय वा अभिवृद्धि या सर्व समानार्थक शब्दाना निश्चित असा कांहींच अर्थ असलेला दिसत नाहीं. आज ज्या बिंदूला उत्कर्ष असें नांव देतां येईल, तोच बिंदू कालांतरानें अपकर्षाचा ठरतो. म्हणजे असें होतें कीं, क्षितिजाला गांठण्यासाठीं जों जों आपण पुढें पुढें जात जावें, तों तों तें अधिकच मागें मागें सरकत जातें. आणि परिणाम हा होतो कीं, आपण कितीहि मार्ग क्रमून गेलों तरी तें कधींच हातीं लागत नाहीं. उत्कर्ष वा अभ्युदय, मनुष्याचा काय किंवा साहित्याचा काय, याच्या बाबतींत हाच अनुभव येतो. उत्कर्षाचा मार्ग हा कधींच न संपणारा असा असतो. याला शेवटचा असा मुक्काम म्हणजे terminus च नसतें. हे केवळ साक्षेप शब्द आहेत. म्हणून सगळी वाट चालून गेल्यानंतर प्रवासाचा शीण घालविण्याला शेवटीं एकादें विश्रांतिस्थान लागेल अशी आशाच नसतें. अशा स्थितींत साहित्याच्या अभिवृद्धीची कोणती कल्पना निश्चित ठरविणार ? आणि अशा कल्पनेच्या अभावीं संघटनात्मक, रचनात्मक कार्य तरी कोणतें करणार ?

ही गोष्ट खरी असली तरी उत्कर्षापकर्षाच्या अवस्था या वर म्हटल्याप्रमाणें सापेक्षतेनेंच ठरवावयाच्या असतात. मराठी साहित्याची अभिवृद्धि करावयाची म्हणजे आज आहे त्यापेक्षां अधिक चांगली स्थिति त्यास प्राप्त करून द्यावयाची आज त्याच्या ज्या ज्या गरजा असतील, त्या भागवावयाच्या, त्याच्यामध्यें ज्या ज्या उणीवा असतील त्या पूर्ण करावयाच्या. त्याचें आज जें स्वरूप असेल, तें अधिक रुचिर, अधिक मनोरम आणि अधिक स्पृहणीय करावयाचें. या दृष्टीनें पाहिलं म्हणजे मराठी साहित्याच्या अभिवृद्धीचें कार्य बरेंच सुकर होतें. आणि मग त्यासंबंधी योग्य व अवश्य ती संघटनाही करितां येते. एक एक पाऊल पुढें पुढेंच टाकीत जाणें, एकापुढें एक लागणारे खुणेचे दगड मागें मागें टाकीत जाणें, याचेंच नांव उन्नति, उत्कर्ष, अभ्युदय वगैरे. अशा प्रकारची मराठी साहित्याची अभिवृद्धि साधण्यासाठीं म्हणजे आज आहे त्यापेक्षां त्यास अधिक चांगली स्थिति प्राप्त करून देण्यासाठीं अवश्य त्या उपायांची योजनाही करतां येते.

मराठीसंबंधीं ही उपाययोजना ठरवितांना ग्वाल्हेरनें जें ध्येय आपल्यापुढे ठेविलें होतें, तें हें कीं, ज्ञान, विज्ञान, कला आणि हस्तकौशल्य इत्यादि नागर-(Civic) शास्त्रासंबंधीं कोणतीही गोष्ट हातीं घेतांना मराठीला दुसऱ्या ह्मणजे परकीय भाषांच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग येऊं नये. शास्त्रीय वा ललित ह्मणजे कलात्मक कार्यासाठीं मराठीला पूर्णपणें स्वावलंबी करावयाचें ह्मणजे इंग्रजी, फ्रेंच; जर्मन या भाषांची आज जी स्थिति आहे व त्यांच्या अंगीं जें सामर्थ्य आहे, ती स्थिति आणि तें सामर्थ्य मराठीला शक्य तितक्या लवकर प्राप्त होईल अशी व्यवस्था करावयाची. आणि हीच गोष्ट मनांत बाळगून ग्वाल्हेरनें आपल्या योजना आंखल्या व कार्याला सुरुवात केली. त्यावेळीं मराठी साहित्याची जी स्थिति होती, तीच बव्हंशीं आजही कायम असल्यामुळें ती येथें लक्षांत घेणें अवश्य आहे. ह्मणून तिचा थोडा येथें प्रपंच केला आहे.

मराठींतील छापील लिखाणांची रास दरवर्षीं फुगत चाललेली दिसत असली तरी तिच्या योगानें मराठी साहित्याला आरोग्यमूलक धष्टपुष्टतेचें स्वरूप येत चाललें आहे, असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. मराठी वाङ्मयाची सांप्रतची स्थिति लक्षांत घेतां हें धष्टपुष्टतेचें स्वरूप नसून रोगमूलक सूजेचेंच स्वरूप आहे, असेंच मोठ्या कष्टानें व दुःखानें ह्मणावें लागतें. कारण, या राशींत तेजस्वी प्रतिभेनें स्फुरलेलें, सुरुचिर लालित्यानें सजलेले, गाढ अध्ययनानें थबथबलेले, आत्मप्रत्ययानें रसरसलेलें असे कण फारच तुरळक हातीं लागतात. अशा पुस्तकांच्या या हृदयविदारी दुष्काळा-मुळें मराठी वाङ्मयाला जणूं काय ॲनिमियाचाच रोग जडला आहे कीं काय, असें वाटूं लागते. वाङ्मयात्मक जीवनपोषक अशा पुस्तकांच्या ऐवजीं आत्मप्रत्ययहीन, कृत्रीम, नीरस, पिळ्ळर, अल्पजीवी व परभाषापुष्ट अशा पुस्तकांचाच भरणा वाढत आहे. अशा पुस्तकांच्या समृद्धीवरूनच मराठी साहित्याची अभिवृद्धि होत आहे, असें म्हणणें हें जितकें अज्ञानाचें तितकेंच तें आत्मवंचनेचेंही लक्षण आहे. आजच्या या ज्ञानवृद्धीच्या युगांत आणि ज्ञानविज्ञानादिकांच्या समृद्धिपोषक साधनांच्या सुलभतेच्या काळांत इतर देशांप्रमाणें आपणा महराष्ट्रीयांसही ज्ञानविज्ञानादि क्षेत्रांत अभिनव आणि अद्भुत पराक्रम करून दाखविण्याचा मार्ग खुला असतां आपण परकीयांचा उच्छिष्टावरच मिटक्या मारीत डौल मिरवावा हें कशाचें द्योतक समजावयाचें ! स्वतंत्र पराक्रम तर राहोच, पण अन्यप्रांतीय असले तरी आपल्याच देशबांधवांनीं जे अजब शास्त्रीय शोध लावून त्रिखंड कीर्ति मिळविली

किंवा आपल्या प्राचीन इतिहासावर अभूतपूर्व असा प्रकाश पाडून जगाचे डोळे दिपविले, किंवा आपल्या प्राचीन कलांचा उद्धार करून व त्यांत नवजीवन भरून त्यांना जगाच्या मानास व आदरास पात्र केले, त्यांची मराठी वाङ्मयास ओझरती तरी ओळख आहे काय ? या विविध विषयांसंबंधीं सुबोध व सुसंगत माहिती देणारीं कितीशीं पुस्तकें मराठींत आढळतील ? जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र रॉय, चंद्रशेखर रमण, सर्वेवल्ली राधाकृष्णन्, कृष्णस्वामी अयंगार, कालिप्रसाद जायस्वाल, हरप्रसाद शास्त्री, जीवनजी मोदी, आशुतोष मुकर्जी, प्राणनाथ–विद्यालंकार, डॉ. हिरालाल, गौरीशंकर ओझा, ब्रजेंद्रनाथ सील, विमलाचरण, लॉ, राधाकुमुद मुकर्जी, राधाकमल मुकर्जी, रामानुजम्, जयचन्द्र विद्यालंकार इत्यादि अनेकानेक भारतीय पंडितांनीं ज्ञानविज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांत अप्रतिम भर घालून जगन्मान्यता मिळविली, त्यांच्या कार्यांचें सविस्तर तर राहूंच द्या, पण अल्पविस्तर वर्णनाच्या संकलनात्मक पुस्तकांची कितीशी भर मराठी वाङ्मयांत पडलेली आढळते? यापेक्षांही शरमेची गोष्ट म्हणजे आपलेच महाराष्ट्रीय बांधव शङ्करराव भिसे, शंकरराव गोखले, कोकटनूर, रँ. परांजपे, धर्मानंद कोसंबी, महाजनी, नारळीकर, गोडबोले आळतेकर, लिमये इ.नीं जे शास्त्रीय व वाङ्मयीन पराक्रम गाजविले आहेत त्यांची तरी कितीशीं ओळख महाराष्ट्राला वा मराठी वाङ्मयाला आहे ? आपल्याच प्रांतांतील व देशांतील लोकांच्या बाबतींत आपली जर ही स्थिति आहे तर परदेशांत होणाऱ्या शोधांच्या बाबतींत आपल्या मराठी वाङ्मयांत त्यांचा मागमूसही लागत नसला, तर त्यांत काय आश्चर्य? अशा स्थितींत न्यूटनचें आसन गदगदा हलविणारा आइन्स्टीन, अथवा शंकराचार्यांशीं स्पर्धा करण्याची हांव बाळगणारा बर्गसन, यांची ओळख मराठी वाङ्मयाला कशी होणार ? हें तत्वज्ञानाचें रेताड रान सोडलें, आणि इतिहासाच्या हिरवळीवर बिहार करण्यासाठीं तोंड फिरविलें तरी आपली केवढी निराशा होते ती पहा ! युनिव्हर्सिट्यांच्या स्थापनेपासून इंग्रजांचें म्हणा, अथवा इंग्रजीचें म्हणा, शिष्यत्व पत्करून आम्ही आज कमीत कमी पाऊणशें वर्षें इतिहासभूगोलाचे पाठ घोकीत आहोंत. पण इतिहास व भूरचना यांचा नित्यप्रतीत होणारा अभेद्य संबंध आणि ऐतिहासिक घटनांची अनिवार्यता या सिद्धांतांची सत्यता पटविणारा बकल, तत्वविचार व इतिहास यांच्या सीमा परस्परांशीं भिडविणारा अॅक्टन, ऐतिहासिक घटनांच्या मूळांशीं हात घासणारा ब्राइस, लोकसमुदायाच्या अंतःकरणाचा ठाव घेऊन इतिहासांची घडण उकलून दाखविणारा ग्रीन, गतकालांतील प्रसंगांचे चलच्चित्रपट उभे करणारा फ्रूड, जागतिक

८०२

इतिहासाच्या अविभाज्यत्वाचे तत्व प्रस्थापित करणारा फ्रीमन, इतिहासांत कादंबरीचा आस्वाद ओतणारा मॉमसेन, ऐतिहासिक साधनांच्या संशोधनावर दिव्य दृष्टि टाकणारा रँक, इत्यादि जे प्रथितयश आणि आपापल्या क्षेत्रांत केवळ अद्वितीय अशा या अभिजात इतिहासकारांची मराठी वाङ्मयास कितीशी ओळख आहे ? पण इतिहास हा अमळ करमणुकीचा विषय आहे, तो कांहीं इतका जिव्हाळ्याचा विषय नाहीं, असें यावर कोणी म्हणेल तर तेंही क्षणभर खरें धरून चालण्यास हरकत नाहीं. पण, शिशु-शिक्षण हा तर जिव्हाळ्याचा विषय आहे ना ? मग या विषयावर तरी मराठी साहित्यांत कितीशीं पुस्तकें आहेत ? फ्रोबेल, पेस्टॉलाझी, रूसो हे शिशुशिक्षणप्रणेते शिळे म्हणून सोडले तरी डाल्टन, सायमन, बेनेट, बाळर्ड, सिरिल बर्ट, मांटिसोरी आदि नवयुगीन शिक्षणप्रणेत्यांचे तरी मराठी वाङ्मयानें कितीसें स्वागत केलें आहे ! अशीं आणखी किती तरी उदाहरणें देतां येतील. सारांश हा कीं, ज्ञानविज्ञानादिकांच्या अशा कित्येक शाखा आहेत कीं, त्यांचें वारेसुद्धां मराठी वाङ्मयाला लागलेलें नाहीं. तरी हीं आपण मराठी वाङ्मयाची अभिवृद्धि होत आहे म्हणून म्हणावें हें विलक्षण नाहीं काय ? असल्या प्रकारच्या आत्मवंचनेनें मराठी साहित्याची अभिवृद्धि कधीं तरी होईल काय ? या सर्व विवेचनाचा इत्यर्थ हा कीं, ज्ञानविज्ञानादिकांच्या ज्या अनंत शाखा आहेत, त्या सर्वांत सवडीसवडीनें पण निश्चितपणानें मराठी साहित्य समृद्ध होत जाईल अशी कांहींतरी चिरस्थायी स्वरूपाची योजना होणें अगत्याचे होते व आहे व हीच योजना हातीं घेण्याचें ग्वाल्हेरनें ठरविलें.

पण अशी नुसती योजना करूनच भागण्यासारखें नाहीं. समर्थ अशा साहित्यिकांच्या अभावीं अशी योजना सफल होणें शक्य नाहीं. येथें सुशिक्षित या शब्दाऐवजीं साहित्यिक हा शब्द जाणूनबुजूनच वापरण्यांत आला आहे. आणि त्याचें कारणही पण उघड आहे. पण तें सांगण्यापूर्वीं सुशिक्षित व साहित्यिक या शब्दांचा येथें कोणत्या अर्थानें उपयोग केला गेला आहे, हें सांगणें अवश्य आहे. विद्यापीठीय संस्कारांनीं जे मंडित झाले आहेत ते सुशिक्षित असें येथें मानलेलें आहे. आणि विद्यापीठीय संस्कारांचें भाग्य ज्यांना लाभलेलें नाहीं म्हणजे सारे पदवीहीन लोक त्यांना अशिक्षितांत गणले आहे. पण या अशिक्षितांपैकीं ज्यांच्या अंगीं जिज्ञासु वृत्ति अथवा अभ्यासाची प्रवृत्ति अथवा विद्याव्यासंगाची आवड हीं दिसून येतें, व तिच्या परिणामस्वरूप म्हणून निवळ मनोरंजनाचा हेतू सोडून केवळ ज्ञानार्जनाच्या लालसे-

मुळेंच लिहिण्यापुसण्याची हौस ज्यांच्या अंगीं असते, ते सगळे साहित्यिक असें येथें गृहीत धरलेलें आहे. ही हौस पुष्कळांच्या अंगीं अगदीं उपजतच असलेली म्हणजे शिक्षणविषयक कोणतेही संस्कार न झाल्यांच्याही अंगीं दिसून येते. खरें म्हटलें तर विद्येचे संस्कार ज्यांच्या मनावर व्यवस्थितपणें झालेले आहेत असे जे सुशिक्षित आणि वर उल्लेखिलेलें साहित्यिक यांची स्वाभाविकपणेंच समव्याप्ति असावयास पाहिजे म्हणजे सुशिक्षित आणि साहित्यिक हे दोन्ही शब्द समानार्थकच असावयास पाहिजे पण आपल्या या दुर्दैवी परतन्त्र देशांत ज्या कित्येक अनैसर्गिक गोष्टी आढळून येतात त्यांपैकींच ! हीही एक गोष्ट आहे. वास्तविक रीतीनें पहातां सुशिक्षण आणि साहित्यसमाराधन यांची फारकत कधींच होऊं नये. पण वस्तुस्थिति जी आहे ती ही आहे. तिच्याकडे डोळेझांक करून कसें चालणार ? ज्ञानदान आणि ज्ञानाभिवृद्धि हेंच केवळ ज्यांचें व्रत आहे, त्या विद्यापीठाच्या ( सु ? ) संस्कारांनीं मंडित झालेल्या लोकांतही ज्ञानार्जनविमुखता आढळावी यापेक्षां आणखी विपरीत तें काय असूं शकतें ? कित्येक वर्षेपर्यंत समुद्रांत सारख्या गटंगळ्या खात राहूनही पुन्हा कोरडेच्या कोरडेच राहण्यांतला हा प्रकार नाहीं काय ? यावरून सध्याची आपली शिक्षणपद्धति किती अनिष्ट आणि आक्षेपार्ह आहे, हें सहज लक्षांत येईल. या वरील विवेचनावरून आम्ही सुशीक्षित व साहित्यिक असें दोन निरनिराळे वर्ग कां कल्पिले तें आतां वाचकांच्या सहज लक्षांत येईल. वर सांगितल्याप्रमाणें ज्ञानार्जनाची हौस ही पुष्कळ लोकांच्या ठायीं नैसर्गिकच असलेली आढळून येत असल्यामुळें असेंही दृश्य पुष्कळदां पहाण्यांत येतें कीं, अत्यंत सुशिक्षित मनुष्य हा जितका साहित्यपराङ्मुख असूं शकतो, तितकाच एखादा अशिक्षित मनुष्य साहित्यप्रवीण, किंबहुना साहित्य-प्रवीणही असूं शकतो. आपल्या या मराठीच्या बाबतींत तरी अशा या अशिक्षित लोकांनींच तिचे पुष्कळसे पांग फेडलेले आहेत, ही गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तात्पर्य हें कीं, सुशिक्षित मनुष्य साहित्यिक असतोच असें जसें मानतां येत नाहीं, तसेंच अशिक्षित मनुष्य साहित्यविमुख असतो असेंही समजण्याचें कांहीं कारण नाहीं. म्हणूनच हा सुशिक्षित व अशिक्षित या दोन दक्षिणोत्तर ध्रुवांना परस्परांशीं भिडविणारा साहित्यिकांचा स्वतंत्र वर्ग कल्पावा लागतो. आणि याच साहित्यिकांच्या बळावर साहित्याचा उत्कर्ष वा अपकर्ष मुख्यत्वेंकरून अवलंबून असतो.

या ठिकाणीं एक धोक्याची सूचना देऊन ठेवणें अगत्याचें वाटतें. आजकाल वाहत असणाऱ्या मराठी वाङ्मयाच्या प्रवाहाकडे पाहतां असें आढळून येतें कीं, त्यांत एक विषारी धाराप्रवाह जोरावत असलेला दिसून येतो. मतस्वातंत्र्य इत्यादिकांसारख्या गोंडस नांवाखालीं समाजविघातक स्वैराचाराला प्रोत्साहन देणें म्हणजेच अद्यावततेचा डौल मिरविणें होय. काळाच्या ओघाबरोबर परंपरागत आचारविचारांत बदल होत जाणें कितीही इष्ट, अवश्य आणि अपरिहार्य असेल तरी तो बदल समाजस्थैर्याच्या मूळावर घाव घालणारा असा कधींच नसतो व नसला पाहिजे. नाविन्य आणि इष्टता यांची नेहमीं समव्याप्ति असते असें नाहीं. नाविन्याचा मोह अनावर होत असला म्हणून अनिष्ट गोष्टींवर इष्टतेचें पांघरूण घालून त्यांना चित्ताकर्षक स्वरूपांत समाजापुढें मांडणें, हें अत्यंत आत्मघातकीपणाचें लक्षण होय. उच्छृंखलपणा किंवा बेछूट वागणूक म्हणजेच स्वातंत्र्य असा स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ बनत चालला आहे. आत्मसंयमन किंवा अनिष्ट अशा मनोविकारांवर बंधन घालणें अथवा त्यांना आळा घालणें म्हणजेच मानसिक गुलामगिरीचे पाश अधिकाधिक आवळत जाणें होय, अशी या नवोदित नवमतवाद्यांची शिकवण असते. आणि या शिकवणीचा प्रचार इतक्या अट्टाहासानें करण्यांत येत असतो कीं, हा प्रकार असाच चालू राहिल्यास आधींच खिळखिळित झालेला आपला समाज लवकरच उच्छिन्न होण्याचें फार भय आहे. पोटभरू, धंदेवाईक, आणि निसर्गतःच उच्छृंखल वृत्तीचे समाजकंटक यांच्यापलिकडे या नवमतवादाची झळ पोंचलेली नाहीं, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची व सुदैवाची गोष्ट आहे.

साहित्य हें नेहमींच सद्भावनापोषक असतें. मानव्याचा परमोत्कर्ष साधणें हेंच साहित्याचें एकमेव लक्ष्य असतें. सुख, स्नेह, समाधान, शांति, उल्हास, उत्साह यांचें वातावरण निर्माण करणें हाच त्याचा एकमेव उद्देश असतो. अभ्यूदयमूलक शांततेच्या व समाधानाच्या शीतलतेंत मानवाला निःश्रेयसाच्या मार्गावर नेऊन परमात्म स्वरूपाचें ज्ञान करून देणें हें साहित्याचें अंतिम ध्येय असतें. सामर्थ्यमूलक संयम, ऐश्वर्यमूलक त्याग व कर्तव्यमूलक भोग, यांचा मानवाच्या ठिकाणीं परिपोष करण्यासाठींच साहित्याची निर्मिति व्हावयास पाहिजे. साहित्य हें व्यक्तिगत सद्गुणांचा अंतर्मुख स्वरूपाच्या अध्यात्मिक उत्कर्षाचा आविष्कार असतें. साहित्य हें वैयक्तिक तेज व ओज यांचा स्वयंस्फूर्त आविर्भाव असतें. आत्मप्रत्ययाचें तें निसर्गप्रेरित प्रकटन किंवा

आविष्करण असतें. मानव्याच्या परमोच्च समाधींत निमग्न असतांना दुर्दम पण सहज, सलील व सुखसंवेदनात्मक जे उद्रेक त्याचें नांव साहित्य. असें साहित्य बाजारू असें कधींच होऊं शकत नाहीं. अव्याज पण अबोध, तेजस्वी पण आल्हादकारक, सहज सुंदर पण सद्भावनापोषक, असें एकाद्या सतीचें स्वरूप, आणि हीन मनोविकारांनीं बरबटलेलें, कृत्रीम अलंकारांनीं नटलेलें आणि पशुतुल्य वृत्तींना भडकविणारें असें एकाद्या वारांगनेचें स्वरूप, या दोहोंत जितकें अंतर तितकेंच वर सांगितल्या प्रकारच्या आत्मस्फूर्त साहित्यांत आणि बाजारू साहित्यांत अंतर असतें आणि आपणांस जें साहित्य हवें आहे व निर्माण करावयाचें आहे, तें उपरोक्त पहिल्या प्रकारचें साहित्य होय.

वास्तविक पाहिलें तर अशा प्रकारचें सात्विक साहित्य निर्माण करण्याचें सामर्थ्य अंगीं असलेल्या साहित्यिकांची संख्या मराठींत कांहीं कमी नाहीं. पण दुर्दैवाची गोष्ट हीच कीं, अशा साहित्यिकांना एकत्र आणून, त्यांना समान ध्येयानें प्रेरित करून, त्यांचे सुव्यवस्थित व संघटित संघ निर्माण करून विविध अंगांनीं मराठीचा उत्कर्ष साधण्याचा एकमुखी प्रयत्न अद्याप व्हावा तसा झालेला नाहीं त्यामुळें मराठी साहित्यांत बराच विस्कळितपणा व गोंधळ माजलेला आढळतो, मराठींत आज जें अल्पस्वल्प साहित्यकार्य होत असलेलें दिसतें, तें पुष्कळ अंशीं केवळ स्वयंस्फूर्तीच्या वैयिक्तिक प्रयत्नांचेंच फळ आहे. याशिवाय, जीं थोडीबहुत सामुदायिक स्वरूपाचीं संघटित अशीं साहित्यविषयक कार्यें चालू असलेलीं आपल्याला दिसून येतात, त्यांचेंही सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें तर त्यांच्या बुडाशींही कांहीं विवक्षित अशा प्रभावशाली व्यक्तींची स्फूर्ति व प्रेरणाच असल्याचें आढळून येईल. विचारशीलतेच्या आणि प्रज्ञापरिणततेच्या दृष्टीनें समकक्ष अशा साहित्यिकांचे समान ध्येयानें प्रेरित झालेले संघटित संघ आजही दुर्मिळच आहेत. मराठी साहित्याची निरनिराळ्या अंगांनीं रेखीव पद्धतशीर, नियमित आणि सारखी वाढ व्हावयाची वा करावयाची झाल्यास समकक्ष व परिणतप्रज्ञ अशा पंडितांची सुसंघटित अशी एकमुखी संस्था निर्माण होणें वा करणें अगत्याचें आहे. अशा संस्थेच्या अभावीं मराठी वाङ्मयाची दुर्दशा नाहींशी होऊन तें प्रगतीच्या पंथाला लागेल अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच मराठी भाषा व वाङ्मय यांच्या सर्वांगीण प्रगतीला साधक व पोषक अशा अकेडेमीच्या स्वरूपाच्या महाराष्ट्र शारदा मंडळासारख्या मध्यवर्ती संस्थेच्या योजनेचा ग्वाल्हेरनें पुरस्कार

करून तिला मूर्त स्वरूप देण्याचा संकल्प केला. आणि या दृष्टीनें मराठी साहित्य-संमेलनाची नेटानें तयारी चालविली. या **महाराष्ट्र शारदा मंडळा**सारख्या मध्यवर्ती संस्थेच्या योजनेचा पुरस्कार करण्याच्या कामीं ग्वाल्हेरकरांनीं दाखविलेला उत्साह या कार्याप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या त्यागासाठीं त्यांनीं दाखविलेली तत्परता, व **महाराष्ट्र शारदा मंडळा**ला शक्य तितक्या लवकर मूर्त स्वरूप येऊन त्याचें कार्य निर्वेध व निर्धोकपणें चालत राहावें या बुद्धीनें ग्वाल्हेरनें केलेली पूर्व तयारी, या गोष्टीं लक्षांत घेतां ग्वाल्हेरनें योजिलेले बेत व जाहीर केलेले संकल्प पूर्ण विचारांतींच ठरविलें होतें हें उघड दिसतें. ग्वाल्हेरच्या केवळ एका सरदारानेंच या **महाराष्ट्र शारदा मंडळा**च्या योजनेच्या कार्यासाठीं पांच हजार रुपयांची देणगी देण्याचें जाहीर केलें होतें. हे सरदार ह्मणजे महाराष्ट्राला सुपरिचित असलेले श्रीमंत चंद्रोजीराव आंग्रे हेच होत. या एकाच गोष्टीवरून वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. संमेलनाला अलिकडे जें एक निर्जीव साच्याचें स्वरूप आलें आहे. त्या प्रकारच्या संमेलनानें ग्वाल्हेरकरांचें समाधान मुळींच होण्यासारखें नव्हते. म्हणूनच त्यांनीं पूर्वींच्या इतर सर्व संमेलनाहून अगदीं भिन्न असा मार्ग पत्करून आपलें ध्येय निश्चित केलें व त्यास अनुसरूनच आपलें कार्य चालविलें. मराठी भाषा व वाङ्मय या संबंधींच्या निरनिराळ्या प्रश्नांना निश्चित स्वरूपांत मांडून तद्विषयक महाराष्ट्रीय पंडितांच्या विचारांना जोराची चालना देण्याचें श्रेय केवळ ग्वाल्हेरकरांसच आहे, ही गोष्ट कोणाही पक्षरहित विचारवंतास नाकारतां येण्याजोगीं नाहीं. मराठीच्या उत्कर्षासाठीं सतत वर्षभर अविश्रांतपणें काम करणारी **महाराष्ट्र शारदा मंडळा**सारखी एखादी संस्था भरभक्कम अशा पायावर स्थापिली गेल्याशिवाय मराठी भाषेची व वाङ्मयाची इष्ट दिशेनें व इष्ट रीतीनें प्रगति होणें शक्य नाहीं, ही गोष्ट ग्वाल्हेर-करांस पूर्णपणें पटली होती. म्हणून अशी संस्था सर्व महाराष्ट्रीयांच्या संमतीनें व सहायानें स्थापण्याचें एकमेव ध्येय ग्वाल्हेरकरांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेविलें होतें. व त्यावरच आपली सर्व शक्ति त्यांनीं एकवटली होती. हा इष्ट हेतु साधण्यासाठीं ग्वाल्हेरकरांनी काय काय केलें तें आतां सांगावयाचें.

**महाराष्ट्र शारदा मंडळा**सारख्या मध्यवर्ती संस्थेची स्थापना करावयाची तर तिला महाराष्ट्रांतील सर्व पक्षोपक्षांतील विद्वानांची संमती आणि सहाय्य असणें अपरिहार्य होतें. या कामासाठीं ग्वाल्हेरहून श्रीमंत सरदार चंद्रोजीराव आंग्रे हे **माधव मराठी वाङ्मय मंडळा**च्या वतीनें महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं म्हणजे खास

पुण्यास ठाण मांडून बसले होते, आणि एकेका दिवशीं एकेका गटांतील साहित्य-प्रमुखांना चहापानाचें आमंत्रण देऊन त्यांच्याशीं यासंबंधीं साधक बाधक चर्चा व विचारविनिमय करीत होते. अशा रीतीनें त्यांनीं बहुतेक सर्व गटांतील साहित्यिकांची संमती मिळवून त्यांच्या सहाय्याचें व सहकार्याचें आश्वासनही मिळविलें होतें. अशा रीतीनें आपल्या भावी कार्याच्या योजनेचा पाया भरभक्कम भरून ठेविल्यावर ते ग्वाल्हेरीस परत आले. या कामीं सरदार साहेबांस सहाय्य करण्यासाठीं प्रस्तुत लेखक ही त्यांच्या बरोबर पुण्यासच होता. याशिवाय आरंभापासून शेवटपर्यंत संमेलनाच्या साहित्यविषयक सर्व बाबीं कार्यकारी मंडळानें प्रस्तुत लेखकाकडे सोंपविल्या होत्या.

पुणें केंद्राचें कार्य जरी अशा रीतीनें यशस्वी झालें असलें, तरी इतर ठिकाणच्या साहित्यिकांचीही या कार्यास अनुकूलता मिळविणे प्राप्त होतें. शिवाय या सर्व प्रचाराला लेखबद्धतेचें निश्चित स्वरूप यावयास पाहिजे होतें. हें कार्य साहित्यिकांच्याच बळावर व्हावयाचें असल्यानें ग्वाल्हेरकरांनीं निरनिराळ्या ठिकाणच्या नामवंत साहित्यिकांची शिरोगणना करण्याचा कसून प्रयत्न केला. त्यासाठीं खाजगी रीतीनें व वृत्तपत्रद्वारा हवी ती माहिती पुरविण्याविषयीं विनंतीपत्रकें हीं काढलीं. त्यांचा अत्यंत उपयोग झाला. अशा प्रकारें सुमारें दीड हजार विद्यमान साहित्यिकांचीं नांवें व पत्ते मिळवून व त्यांच्या वर्णानुक्रमानें नामपरत्वें व स्थळपरत्वें अशा दोन सूचीही तयार केल्या. हें एकच काम कितीं किचकट व केवढ्या व्यापाचें होतें हें पुढील वृत्तांतावरून सहज लक्षांत येईल. या एकाच कामासाठीं चार पांच युनिव्हर्सिट्या, स्वपरप्रांतांतील सुमारें पन्नासपंचावन्न कॉलेजें, पंचवीस तीस सार्वजनिक संस्था आणि स्वदेशपरदेशां-तील निरनिराळ्या ठिकाणच्या सुमारें चारशें व्यक्ति, इतक्याशीं पत्रव्यवहार करावा लागला. व मागच्या तीन वर्षांतील निरनिराळ्या प्रमुख वृत्तपत्रांचे व नियतकालिकांचे अंक चाळावे लागले. याशिवाय वृत्तपत्रांतून जीं जाहीरपत्रकें काढण्यांत आलीं तीं निराळींच. इतक्या ठिकाणाहून संकलित केलेल्या माहितीचे वर्णानुक्रमानें नामपरत्वें व स्थळपरत्वें वर्गीकरण करण्याच्या कामीं दहा बारा पगारी माणसें दररोज आठ दहा तास याप्रमाणें सतत एक महिनाभर खपत होतीं. या सर्व खटाटोपाच्या मुळाशी हा हेतु होता कीं, विद्यमान साहित्यसेवकांपैकीं शक्य तोंवर कोणतीही महत्वाची व्यक्ति वगळली जाऊं नये. या साहित्यसेवकामध्यें स्त्रियांचाही अर्थात् समावेश करण्यांत आला होता.

अशा रीतीनें शक्य तेवढ्या विद्यमान साहित्यिकांची नामावली तयार झाल्यानंतर त्यांतून निरनिराळ्या विषयांच्या तज्ज्ञांची नामावली तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. हें काम वरील कामापेक्षां बरेंच कठीण व जबाबदारीचें होतें. अमुक विषयांत अमुक मनुष्य तज्ज्ञ आहे हें ठरवायचें कोणी ? ही जबाबदारी कोण पत्करणार ? यांसाठीं मग निराळाच मार्ग काढावा लागला. तो असा कीं, महाराष्ट्रांत व बृहन्महाराष्ट्रांत निरनिराळ्या अनेक विद्यापीठांतून आणि कॉलेजांतून अध्यापनाचें कार्य करीत असलेले सर्व महाराष्ट्रीय हे आपापल्या विषयापुरते तज्ज्ञ समजावयाचे, असें ठरविलें आणि अशा अध्यापकांची म्हणजे प्रोफेसरांची आपापल्या पदव्या व विषय यांसहित एक स्वतंत्र नामावली तयार करण्यांत आली याशिवाय निरनिराळ्या विषयासंबंधीं सर्वमान्य व प्रमाणभूत असे ग्रंथ निर्माण करणाऱ्या पण वरीलप्रमाणें अध्यापक नसलेल्या लोकांची आणखी एक यादी तयार करण्यांत आली. आणि या दोन्ही प्रकारच्या याद्यांची मिळून एक तिसरी यादी तयार करण्यांत आली. याप्रमाणें भिन्न भिन्न विषयांचे मिळून एकंदर सुमारें पांचशें तज्ज्ञांची यादी तयार झाली. या यादींत परदेशांतहि साहित्यविषयक वा भौतिक शास्त्रविषयक जे महाराष्ट्रीय संशोधन करीत होते, त्यांचीही मोठ्या कसोशीनें माहिती मिळवून त्यांचाही समावेश करण्यांत आला होता. **शारदा मंडळ** विषयक पुढील सर्व कार्यासाठीं या सुमारें पांचशें तज्ज्ञांचा एक मतदार संघच तयार झाला होता. यानंतर या सर्वसामान्य मतदार-संघांतून अथवा तज्ज्ञमंडळांतून ह्मणा, एकेका विषयाचे स्वतंत्र असे अनेक पोट-मतदारसंघ अथवा विषयपरत्वें तज्ज्ञांचीं पोटमंडळें निर्माण करण्यांत आलीं. यांतील हेतु असा कीं, सर्वसामान्य गोष्टींसाठीं सर्वसामान्य तज्ज्ञमंडळाचा व विशिष्ट ( technical ) स्वरूपाच्या गोष्टींसाठीं विशिष्ट पोटतज्ज्ञमंडळाचा सल्ला घेणें सुलभ व्हावें.

यानंतरचें महत्वाचें कार्य ह्मणजे या निरनिराळ्या विषयांच्या पोटमंडळांकडून त्या त्या विषयांत सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या अशा पांच पांच तज्ज्ञांची निवड करण्यांत आली. ह्मणजे असें कीं, कोणत्या तरी एका विषयाच्या तज्ज्ञाकडून कोणत्या तरी दुसऱ्या एका विषयाच्या तज्ज्ञाबद्दल अभिप्राय वा मत न मागवितां प्रत्यक्ष त्या त्या विषयांत काम करणाऱ्या तज्ज्ञाकडूनच वरील सर्वश्रेष्ठ पांच पांच तज्ज्ञांची निवड करविण्यांत आली. या बाबतींत एकंदर खुलाशासह व विषयांच्या यादीसह पांच पांच तज्ज्ञासाठीं पांच पांच रकानें वेगळे काढून एक मतदानपत्रिकाच

छापवून घेऊन तींवरच सर्वांचे अभिप्राय वा मतें मागविण्यांत आलीं होतीं. याप्रमाणें मराठी साहित्याच्या अभिवृद्धीचें कार्य ज्यांच्या बळावर घडून यावयाचें अथवा घडवून आणावयाचें त्यांची शक्य तितकी व्यापक आणि होईल तितकी पूर्ण अशी शिरोगणनाच करण्यांत आली. हा एक भाग झाला.

पण **महाराष्ट्र शारदा मंडळा**च्या पूर्व तयारीचें काम एवढ्यानेंच भागण्यासारखें नव्हतें. त्यास द्रव्यबळाचीही आवश्यकता होती. द्रव्याभावीं हे कार्य हातीं घेणार तरी कसें ! म्हनून या बुद्धिबळाला द्रव्यबळाची जोड देतां यावी ह्मणून जेवढीं ह्मणून लहान मोठीं महाराष्ट्रीय संस्थानें आहेत, सरदार जहागीरदार आहेत, इनामदार-वतनदार आहेत, अथवा इतर अनेक प्रकारचे धनिक आहेत, त्यांपैकीं मिळेल तेवढ्या लोकांची कसोशीनें आणि नेटानें माहिती मिळवून व त्यांस प्रस्तुत कार्याचें स्वरूप समजाऊन सांगून त्यांच्याजवळ सहानुभूतीची व द्रव्यसहाय्याची विनंती करण्यांत आली. आणि अत्यंत संतोषाची व समाधानाची गोष्ट ही कीं, यांपैकीं बहुतेक सर्वच लोकांनीं केवळ शाब्दिक सहानुभूतीच नव्हे, तर आपापल्या शक्त्यनुसार उदार मनानें आर्थिक सहाय्यही देण्याचीं आश्वासनें दिलीं. या बाबतींत मौनात्मक उत्तरें अत्यंत अपवादभूत अशींच होतीं. याप्रमाणें **शारदा मंडळा**च्या उभारणीसाठीं लागणाऱ्या द्रव्यबळाचीही पूर्वतयारी करून ठेवण्यांत आली. याप्रमाणें हा दुसरा भाग झाला.

आतां साहित्याच्या दृष्टीनें जें कार्य पुढें करावयाचें त्याच्या पूर्वतयारीचा विचार येथें उत्पन्न होतो. त्यासाठीं मराठी साहित्याचा निरनिराळ्या अंगांनीं आढावा घेणें ( stock-taking ) प्राप्त होतें. कारण, सध्यां आपल्या जवळ काय काय आहे याची छाननी झाल्याशिवाय, आपल्याजवळ कोणकोणत्या गोष्टींची उणीव आहे, याचा उलगडा कसा व्हावयाचा ! म्हणून संमेलनासाठीं जे लेख मागविण्यांत आले, त्यांची या दृष्टीनें विषयवार स्वतंत्र यादीच तयार करण्यांत आली व त्या विषयावर लेख मागविण्यांत आले. या यादींत सुमारें चाळीस विषयांचा समावेश करण्यांत आला होता. या यादीचें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं तिच्यांतील कांहीं विषयांचा येथें निर्देश करणें इष्ट व अवश्य वाटतें. मराठी संबंधीं पहिल्यानें साहजिकपणेंच जो विषय आपल्या डोळ्यापुढें उभा राहतो, तो म्हणजे ' मराठी भाषेची उत्पत्ति व विकास ' हा होय. याशींच संबद्ध असा दुसरा विषय म्हणजे ' मराठीचे भाषाभेद ' यांच्याच अनुसंधानानें

सोडवावयाचे मराठी विषयक दुसरे प्रश्न ह्मणजे ' मराठी भाषेचें शुद्धीकरण व शुद्ध-लेखन ' हे होत. यानंतर असाही प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, या मराठी वाङ्मयाचा हा एवढा आटाट हवा तरी कशाला ? या प्रश्नाचें समर्पक उत्तर पुढील विषयाच्या विवेचनांत सांपडण्याजोगें आहे. ते विषय ह्मणजे ' राष्ट्रीय जीवनाशीं वाङ्मयाचा संबंध प्रस्थापित झाल्यानंतर पुढें राष्ट्रीय संस्कृतीच्या स्वरूपाचा व कार्याचा प्रश्न उभा राहतो. अर्थात् महाराष्ट्रीयांच्या बाबतींत ' महाराष्ट्र संस्कृतीचें स्वरूप व कार्य ' या रूपानें हा प्रश्न मांडावा लागतो. यानंतर साहजिकच जो प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं, महाराष्ट्राबाहेर जे महाराष्ट्रीय गेले आहेत, व ज्यांनीं तेथें आपल्या वसाहति कायम केल्या आहेत, त्यांनीं तेथें आपल्या संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन कसें करावयाचें ? म्हणून तो प्रश्न ' महाराष्ट्राची संस्कृति व बृहन्महाराष्ट्राची जबाबदारी ' या स्वरूपांत मांडण्यांत आला. या बृहन्महाराष्ट्रीयांतही आपल्या मराठी वाङ्मयाची अप्रतिम सेवा केलेले असे अनेक लोक आहेत. त्यांची सर्वांस माहिती होणें इष्ट व अवश्य आहे. म्हणून हा विषय 'बृहन्महाराष्ट्रीयांची साहित्य सेवा ' या रूपानें मांडण्यांत आला. असे आणखी किती तरी इष्टकार्य सहायक विषय साहित्यिकांपुढें मांडले होते.

यानंतर मराठी वाङ्मयाच्या भाण्डाराची तपासणी करावयाची म्हणजे निरनिराळ्या विषयांच्या बाबतींत हें भाण्डार आहे तरी केवढें हें पहावयाचें म्हणून ' मराठी वाङ्मयांतील ग्रंथसंपत्ति ' या नांवाखालीं तिचा अजमास लावला जावयाचा. यानंतर या ग्रंथसंपत्तींत बहुमोल अशा कोणकोणत्या वस्तु आहेत तें पहावयाचे. तें अर्थात् 'मराठींतील अभिजात ग्रंथांचें विहंगमावलोकन ' या रूपानेंच करतां येणें शक्य आहे. यापुढें जागतिक दृष्टीनें आपल्या मराठी वाङ्मयाचें मोल तरी काय हें जाणण्याची इच्छा प्रबळ होते. म्हणून ' मराठी वाङ्मयाची गुणाढ्यता आणि विस्तार, म्हणजे quality and quantity या दोन्ही दृष्टींनीं त्याची किंमत ठरवावयाची. यानंतर आजकाल जें वाङ्मय निर्माण होत आहे, त्याचा प्रवाह कोणीकडे वाहत आहे, त्याचा ठाव घ्यावयाचा व त्यांत दुसरे कोणकोणते प्रवाह येऊन मिसळले आहेत तें पहावयाचें. यासाठीं 'मराठी वाङ्मयाचे अंतःप्रवाह' असा एक विषय योजिला गेला. पण मराठी ही कांहीं स्वयंभू भाषा नाहीं. ती महाराष्ट्रीची पुत्री असून संस्कृत भाषेची पौत्री आहे. अर्थात् आई व आजीचे कोणकोणते गुण घेऊन ती आली आहे, हें पहाणें जितकें मनोरंजक तितकेंच

इष्ट व अवश्यही आहे. तसेंच इंग्रजीशीं मराठीचें दळणवळण दिवसेंदिवस वाढतच असल्यामुळें इंग्रजीनें मराठीला कोणकोणत्या देणग्या दिल्या, हें पहाणें ओघानेंच येतें म्हणून 'इंग्रजी वाङ्मयाचा मराठी वाङ्मयवर झालेला परीणाम' शोधावा लागतो. असेंच आणखी कित्येक विषय स्पष्ट शब्दांत मांडलेले आहेत. यानंतर मराठीविषयीं संघटनात्मक कोणकोणत्या गोष्टी होणें अवश्य आहेत, त्यांच्याकडेही साहित्यिकांचें लक्ष वेधलें आहे. उदाहरणार्थ, 'महाराष्ट्र विद्यालयाचें स्वरूप व कार्य,' 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचें कार्यक्षेत्र,' 'मराठी साहित्यविषयक परीक्षांचें ध्येय व स्वरूप,' वगैरे वगैरे. याप्रमाणें ही यादी अत्यंत विचारपूर्वक तयार करण्यांत येऊन तिच्यांतल्या वर निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या विषयांवरील विद्वानांचे संमेलनांत वाचण्यासाठीं लेख मागविण्यांत आले होते. (परिशिष्ट १ पहा)

या यादीप्रमाणेंच दुसरीही आणखी एक यादी तयार करण्यांत आली होती. मराठींत ज्या शास्त्रीय वाङ्मयाची अत्यंत उणीव आहे, त्याच्याकडे विद्वानांचें विशेष रीतीनें लक्ष जावें व या बाबतींतली उणीव अंशतः तरी दूर व्हावी, या हेतूनेंच या यादींतल्या विषयांची निवड करण्यांत आली होती. पण त्याबरोबरच असेंही धोरण ठेवण्यांत आलें होतें कीं, हे शास्त्रीय विषय सर्वसामान्य जनतेस रुक्ष व कंटाळवाणे न वाटतां त्याविषयीं त्यांना स्थूल पण स्पष्ट कल्पना यावी व त्या विषयाची अधिक माहिती करून घेण्याची तिच्यांत जिज्ञासा उत्पन्न व्हावी. या हेतूनें लेखकांस यासंबंधीं स्पष्ट व निःसंदिग्ध सूचनाही देण्यांत आल्या होत्या. लेखकांनीं म्हणजे तज्ज्ञांनीं आपापले लेख या सूचनास अनुसरूनच लिहावयाचें असें ठरविण्यांत आलें. त्या सूचनांचा सारांश असा. ज्या शास्त्रासंबंधीं लेख असेल त्या शास्त्राच्या सामान्य स्वरूपाचें पहिल्यानें विवेचन करावयाचें; नंतर त्या शास्त्राच्या वाढीचा अथवा विकासाचा इतिहास द्यावयाचा; त्या नंतर ज्या ज्या व्यक्तींनीं त्या त्या शास्त्रासंबंधीं महनीय अशी कामगिरी बजाविली असेल तिच्या सामान्य स्वरूपाचें व महत्वाचें वर्णन करावयाचें; त्यानंतर सध्यां जगांत त्या शास्त्रसंबंधीं कार्य करीत असलेल्या कोणकोणत्या संस्था आहेत त्यांची माहिती द्यावयाची; व त्या शास्त्रासंबंधीं त्या संस्था कोणत्या प्रकारचें कार्य करीत आहेत, म्हणजे त्यांच्या कार्याचें वैशिष्ट्य काय तें सांगावयाचें; आणि हें सगळें सांगून झाल्यावर त्या शास्त्राला अद्याप न उलगडलेली कोणकोणतीं प्रमेयें आहेत त्यांचा खुलासा करावयाचा; व शेवटीं त्या

शास्त्राच्या प्रगतीनें मानव जातीचें कोणतें कल्याण होण्यासारखें आहे, व तें साध्य होण्याची त्या शास्त्राला आज कितपत आशा आहे याचें विवेचन करावयाचें. याप्रमाणें तज्ज्ञांस दिल्या गेलेल्या सूचनांचें स्वरूप होतें.

याशिवाय मराठी वाङ्मयाला अपरिचित अशा कांहीं ताज्या विषयासंबंधींही मुद्दाम लेख मागविण्यांत आले होते. उदाहरणार्थ, ' आइन्स्टीनचा सापेक्षता वाद, ' ' बर्गसनचें तत्वज्ञान, ' ' जगदीशचंद्र बोस यांच्या शोधांचें स्वरूप ' इ. इ.

याशिवाय, ॲक्टन, फ्रीमन, बकल, फ्रूड, ब्राइस, स्लीमन, ग्रीन आदि इतिहासकारांच्या कामगिरीसंबंधीं, तसेंच आधुनिक काळीं प्रचलित झालेल्या डाल्टन वेनेट, माटसोरी आदींच्या निरनिराळ्या शिक्षणपद्धतींविषयीं, तसेंच आणखी कांहीं अशाच उपयुक्त विषयासंबंधींही विवेचनात्मक लेख मागविण्यात आले होते. ( परिशिष्ट २ पहा )

त्याप्रमाणें विशिष्ट क्षेत्रांत काम करणाऱ्या ज्या स्वतंत्र संस्था सबंध हिंदुस्थानांत आहेत त्यांच्याविषयीं आणि त्यांच्या कार्याविषयीं अधिकृत रीतीनें महाराष्ट्रीय विद्वानांस माहिती व्हावी, व महाराष्ट्र शारदा मंडळाच्या दृष्टीनें त्यांच्याशीं सहकार्य करण्याची संधि जुळवून आणून मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीच्या कामीं त्यांचा उपयोग करून घेण्यास कितपत वाव आहे, याची यथार्थ कल्पना व्हावी म्हणून ग्वाल्हेरीस होणाऱ्या मराठी संमेलनास आपल्या वतीनें प्रतिनिधी पाठविण्याविषयीं त्या संस्थास मुद्दाम आमंत्रण दिलें होतें. व त्यांच्या प्रतिनिधींना संस्थेच्या कार्या-संबंधीं व्याख्यानें वगैरे देण्याची सवडही त्यांस ठेविली होती. या संस्थांच्या बाबतींतही ग्वाल्हेरकरांस उत्साहवर्धक असाच अनुभव आला.

मराठींत शाहिरी वाङ्मयाचें एक स्वतंत्र स्थान आहे. मराठी साम्राज्याच्या स्वतंत्र वातावरणांतलें ते तेजस्वी व स्वयंस्फूर्त असें वाङ्मय आहे. त्या वाङ्मयांत तत्कालीन सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेचें अंतरंग ठळकपणें उमटलेलें आहे. ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीनेंही त्याचें मोल व महत्व फार मोठें आहे. जातिवंत मराठी बाणा अथवा मराठमोळा त्यांत ओतप्रोत रसरसलेला आहे. अशा वाङ्मयाचा त्याकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळें जो नाश व्हावयाचा तो थांबवावा व त्याचा उद्धार होऊन त्याची परंपरा अव्याहतपणें पुढेंही चालू रहावी, या हेतूनें महाराष्ट्रीय विद्वानांचें

त्याकडे बुद्धिपुरःसर लक्ष वेधण्यांत आलें. त्यासाठीं नामांकित शाहिरी संस्थांची व शाहिरांची शोधपूर्वक माहिती मिळवून त्यांस ग्वाल्हेरसंमेलनासाठीं खास आमंत्रण दिलें होतें. या कामीं या शाहिरी संस्थांनीं व शाहिरांनींही चांगलीच उत्सुकता दाखविली.

श्री आणि सरस्वती यांचें वैर अनादि कालापासून प्रसिद्धच आहे. सरस्वतीचें वाढतें वैभव जणुं काय श्रीला सहनच करवत नाहींसें दिसतें. जों जों एखाद्या पंडिताची विद्वत्ता अधिक तों तों दारिद्र्याची तिच्याशीं स्पर्धाच लागलेली आढळून येतें, आपल्या मराठी भाषेंत तरी असला दैवाचा दुर्विलास नियमितपणेंच आढळतो. मराठी साहित्यसंमेलनासारख्या सरस्वतीच्या सोहळ्याच्या प्रसंगीं तिला ललामभूत होणाऱ्या पंडितांना केवळ श्रीच्या अवकृपेमुळें उपस्थित होतां आलें नाहीं, तर असल्या संमेलनांत काय ' राम ' असणार ? ही गोष्ट लक्षांत घेऊन अशा पंडितांना सत्कारपूर्वक अवश्य तें आर्थिक सहाय्य देऊन मुद्दाम पाचारण करण्यांत आलें होतें. हेंहि एक ग्वाल्हेरसंमेलनाचें अपूर्व असें वैशिष्ट्य होय.

महाराष्ट्र शारदा मंडळासारख्या विशाल व व्यापक स्वरूपाच्या संस्थेच्या कार्याच्या उपक्रमास सर्व महाराष्ट्रीयांची सहानुभूति व संमति असावी म्हणून जगभर पसरलेल्या आपल्या बुद्धिवान्, कर्तृत्ववान्, कलावान् आदि महाराष्ट्रीय बंधूंस ग्वाल्हेरकर विसरले नाहींत. जपान, जर्मनी, अमेरिका, आफ्रिका, इंग्लंड, फ्रान्स वगैरे परदेशांत आपापल्या कामीं मग्न असणाऱ्या महाराष्ट्रीयांस, त्यांचे संमेलनास उपस्थित होणें उघड उघड अशक्य दिसत असतांही, स्मरणपूर्वक निमंत्रित करण्यांत आलें होतें.

पण हा सगळा विचार मराठी व महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें झाला. पण महाराष्ट्र झाला तरी भारताचाच एक घटक असल्यामुळे मराठीला इतर ज्या प्रांतीय भारतीय भाषा त्यांच्याशीं फटकून वागतां येत नाहीं. इतकेंच नव्हे तर राष्ट्रैक्याच्या दृष्टीनें आपल्या भारताच्या भिन्न भिन्न भाषीय लोकांत परस्पर बंधुभाव, सद्भाव व सहकार उत्पन्न व्हावा, त्यांचें साहित्यिक दृष्टीनें परस्पर दळणवळण आणि संघटण वाढावें व त्यांच्यांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना दृढ व्हावी या हेतूनें इतर प्रांतीय भाषांच्या प्रतिनिधींसही या संमेलनानें निमंत्रण केलें होतें, व त्याचप्रमाणें ते ग्वाल्हेरसंमेलनास आलेही होते.

अनुक्र. २०९५८ दि: ३/११ ...
क्रमांक ६५४ नों: दि: १०/१०/९५



या सर्व खटाटोपावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं ग्वाल्हेरकरांची साहित्य विषयक दृष्टि किती व्यापक स्वरूपाची होती. साहित्य हें राष्ट्रबल संवर्धनाचें एक प्रबल साधन आहे अशीच त्यांची भावना होती व आहे. साहित्याच्या द्वारा राष्ट्राला सामर्थ्यसंपन्न करणें, त्याच्या निरनिराळया घटकांत परस्पर आत्मीयभाव निर्माण करणें, भारतीयत्वाच्या भूमिकेवरून त्या घटकांतील सांस्कृतिक सजातीयत्वाची किंबहुना सांस्कृतिक एकरूपतेची भावना पुष्ट करणें इत्यादि हेतू मनांत धरून ग्वाल्हेरकरांनीं '**अखिल भारतीय साहित्य परिषदे**' चीहि योजना तयार केली ( परिशिष्ट ३ पहा ) व ती संमेलनापुढें मांडून तिची संमेलनाकडून स्वीकृतिही करून घेतली. ही भाविष्यभेदक दूरदृष्टि ग्वाल्हेरकरांनींच प्रथम दाखविली, ही गोष्ट इतिहासांत नमूद करण्यासारखी आहे, ग्वाल्हेरकरांनंतर चार वर्षांनीं श्रीमंत सयाजी राव महाराज गायकवाड यांनीं या कल्पनेचा पुरस्कार केला व श्रीमंत सयाजीराव महाराजांनंतर तीन वर्षांनीं म्हणजे गेल्या वर्षीं नागपुरास महात्माजींच्या अध्यक्षते-खालीं ही परिषद् अस्तित्वांत आली.

या वरील वृत्तान्तवरून संमेलनासाठीं आणि तन्निमित्तानें विशेषेंकरून **महाराष्ट्र शारदा** मंडळाच्या स्थापनेसाठीं पूर्वतयारी म्हणून ग्वाल्हेरनें केवढे परिश्रम केले होते याची आतां कोणासही स्पष्ट कल्पना होण्याजोगी आहे. यावरून ग्वाल्हेरकरांची मातृभाषा सेवेविषयींची आस्था, उत्सुकता, कळकळ व धडाडी ही निःसंदिग्ध रीतीनें दिसून येतील. याप्रमाणें ग्वाल्हेरकरांनीं आपली सेवा अखिल महाराष्ट्रीय जनतेस तसेंच सर्व भारतीय बंधूंच्या सेवेस सादर केली आहे. ती फलप्रद ठरो हीच आशा व आकांक्षा. ( परिशिष्ट ४ पहा. )

आजही ग्वाल्हेरनें ही मराठी साहित्यविषयक परंपरा शारदोपासक मंडळाच्या द्वारें चालविली आहे, हें त्यास भूषणावह आहे. या शारदोपासक मंडळानें आतां-पर्यंत तीन सुंदर पुस्तकांची मराठी भाषेंत भर घातलेली आहे. तीं पुस्तकें म्हणजे **१ तांबे यांचा साहित्यविषयक पत्रव्यवहार, २ नाट्यचर्चा** आणि **३ पदन्यास** या शारदोपासक मंडळासंबंधीं आम्हांस असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, ही नव्या नांवानें नवी संस्था काढण्यापेक्षां जुन्या **श्रीमाधव मराठी वाङ्मय मंडळाचाच उद्धार** केला असतां तर अधिक चांगलें झालें असतें. अजूनही तसें करण्यास कांहीं अडचण असेलसें वाटत नाहीं. असें झाल्यास परमपूज्य कै. **श्रीमंत माधवराव महाराज** यांचीं प्रोत्साहक स्मृति त्यायोगें सतत ताजी राहण्यास मदत झाली असती.

परिशिष्ट १ लें

## वाङ्मयीन विषयांची यादी

ॐ

पत्रक्रमांक————

**श्रीमाधव मराठी वाङ्मय मण्डळ,**
संभाजी विलास, ग्वाल्हेर.
ता.————१९२८.

रा. रा.————
————
————

सा. न. वि वि. आपल्या मराठी वाङ्मयाची स्थिति असावी तशी समाधानकारक नाहीं, ही गोष्ट सर्वमान्यच आहे. पण ही स्थिति सुधरावी म्हणून कोणत्या उपायांची योजना करावी हा आपणां सर्वांपुढें मोठा प्रश्न आहे. अशा रीतीनें विचार करूं लागले असतां आपल्या भाषेसंबंधीं अनेक प्रश्न उभे राहतात. त्यांचा सर्व बाजूंनीं सांगोपांग विचार होणें अत्यन्त अगत्याचें आहे. आणि हा अधिकार जसा आपल्यासारख्या विद्वानांचाच आहे, तसाच यासाठीं योग्य प्रसंग म्हणजे विद्वज्जनांचें भरणारें साहित्य संमेलनच होय. येत्या ईस्टरच्या सुटींत **श्रीमाधव मराठी वाङ्मय मंडळा**तर्फे भरणाऱ्या संमेलनांत यासंबंधी शक्य तितका विचार व्हावा आणि पुढील कार्याची रूपरेषा निश्चित करण्याच्या कामीं सहाय्य व्हावें म्हणून यासोबत एक विषयांची यादी जोडली आहे. त्यांपैकीं आपणांस इष्ट वाटतील त्या एका किंवा अनेक विषयांवर आपले विचार लेखरूपानें प्रकट करण्याची कृपा करावी अशी आपणांस आग्रहाची विनंति आहे. ती आपण मान्य कराल अशी आशा आहे.

यादींत नसलेल्या पण त्यासारख्या, किंवा अन्य प्रसंगोचित विषयावर लेख धाडल्यास त्यांचाही साभार स्वीकार केला जाईल.

आपल्या प्रत्येक लेखाबरोबर त्या लेखाचा स्वतंत्र सारांशही अवश्य देण्यांत यावा.

या यादीपैकीं किंवा अन्य आपण कोणता विषय पसंत केला आहे व आपला लेख अजमासें किती दिवसांत मिळेल हें कळविण्याची कृपा करावीं.

लेख ता. १५ फेब्रुआरीचें आंत इकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

कळावें लोभ असावा हे विनंति.

आपला

**गोविंद बळवंत माकोडे.**

अध्यक्ष, प्रसिद्धी मंडळ,

तेरावें मराठी साहित्य संमेलन, ग्वाल्हेर.

विषयांची यादी

१ मराठी भाषेची उत्पत्ति व विकास

२ मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचें सामान्य स्वरूप

३ मराठीवाङ्मयांतील ग्रंथसंपत्ति

४ मराठींतील अभिजात ग्रंथांचें विहंगमावलोकन

५ मराठी वाङ्मयाच्या गरजा

६ मराठी भाषेचें शुद्धीकरण व त्याचीं तत्वें

७ प्रस्तुत शालोपयोगी पुस्तकांचें स्वरूप

८ उच्च (Collegiate) शिक्षणाची मराठींतील ग्रंथसामुग्री

९ मराठी वाङ्मयाची गुणाढ्यता व विस्तार

१० मराठींतील अप्रसिद्ध वाङ्मय सेवक

११ मराठीचे भाषाभेद (Dialects of Marathi)

१२ मराठी वाङ्मयावरून प्रतीत होणारा महाराष्ट्राचा इतिहास

१३ राष्ट्रीय जीवनाशीं वाङ्मयाचा संबंध

१४ आधुनिक मराठी वाङ्मयाचें अंत:प्रवाह

१५ संस्कृत वाङ्मयाचा आधुनिक मराठी वाङ्मयावर झालेला परीणाम

१६ इंग्रजी वाङ्मयाचा आधुनिक मराठी वाङ्मयावर झालेला परीणाम

१७ मराठीतील अभिजात संगीत वाङ्मय

१८ मराठींतील अभिजात गायन शास्त्रविषयक वाङ्मय

१९ मराठींतील अभिजात शिल्पकला विषयक वाङ्मय

२० शिक्षणक्रमांतील चित्रकलेचें स्थान

२१ शिक्षणक्रमांतील गायन कलेचें स्थान
२२ शिक्षणक्रमांतील नृत्यकलेचें स्थान
२३ शिक्षणक्रमांतील धर्माचें स्थान
२४ महाराष्ट्र साहित्य परिषदेचें कार्यक्षेत्र
२५ महाराष्ट्र शारदामंडळाचें स्वरूप व कार्य
२६ मराठी साहित्य विषयक परीक्षांचें ध्येय व स्वरूप
२७ महाराष्ट्र विश्वविद्यालयाचें स्वरूप व कार्य
२८ महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचें स्वरूप व कार्य
२९ महाराष्ट्र साहित्य संग्रहालयाची आवश्यकता
३० महाराष्ट्र साहित्य संस्थांचें संहतिकरण
३१ महाराष्ट्र संस्कृतीचें उर्फ महाराष्ट्र धर्माचें स्वरूप व कार्य
३२ बृहन्महाराष्ट्रीयांची साहित्य सेवा
३३ महाराष्ट्रीय संस्कृति व बृहन्महाराष्ट्रीयांची जबाबदारी
३४ संपादकीय कर्तव्यें
३५ टीकाकारांची जबाबदारी
३६ आदर्श साहित्यसेवी
३७ ग्रंथकार व ग्रंथप्रकाशक यांचा परस्पर संबंध इ. इ.

---

परिशिष्ट दुसरें

## शास्त्रीय विषयांची यादी

ॐ

पत्रक्रमांक ——————

श्रीमाधव मराठी वाङ्मय मण्डळ
संभाजी विलास, ग्वाल्हेर.

तारीख —————— १९२८

रा. रा. ——————————
——————————
——————————

सा. न. वि वि. येत्या ईस्टरच्या सुटींत येथें भरणाऱ्या अखिल भारतीय तेराव्या मराठी साहित्य संमेलन प्रसंगी वाचण्यासाठी आपल्यासारख्या पंडितांचा आपल्या आवडीच्या एकाद्या विषयावर लेख अथवा निबंध असणें अत्यन्त अगत्याचें आहे. इतर विषय वगळले तरी —————— विषयाबद्दल आपला लौकिक सर्वदूर विश्रुतच आहे. तरी यासंबंधीं आपल्याकडून निदान एकादा तरी लेख आल्यास फार उपकार होतील. आपल्याकडून येणारे लेख आपल्या विद्वत्तेस व लौकिकास साजेसेच असतील यांत शंका नाहीं. परन्तु त्या विषयासंबंधी कोणत्या प्रकारची माहिती मिळाली असतां विशेष उपयोग होण्यासारखा आहे, याची कल्पना यावी म्हणून त्याविषयीं एक यादी देण्यांत येत आहे. ती अशीः—

१ —————— शास्त्राचें सामान्य स्वरूप
२ —————— शास्त्राच्या विकासाचा इतिहास
३ —————— शास्त्रविषयक चिरस्मरणीय अशा व्यक्तींचें कार्य
४ —————— शास्त्रविषयक प्रत कार्य करीत असलेल्या जगांतील सर्वमान्य संस्था व त्यांच्या कार्याचें स्वरूप
५ —————— शास्त्रविषयक प्रस्तुत प्रगति
६ —————— शास्त्रांतील अद्याप न सुटलेलीं प्रमेयें
७ —————— शास्त्राचें अंतिम ध्येय व त्याच्या भावी आशा.

याशिवाय खालीं दिलेल्या विषयांसंबंधीं माहिती होणं अवश्य आहे. म्हणून त्याविषयीं शक्य असल्यास विचार व्हावा. ते विषय असे:—

१ सर जगदीशचंद्र बोस यांच्या शोधांचें स्वरूप
२ सर जगदीशचंद्र बोस यांच्या शोधांमुळें इतर शास्त्रांवर होणारे परिणाम
३ आइन्स्टाईनच्या सिद्धान्ताचें स्वरूप
४ न्यूटन व आइन्स्टीन यांची तुलना
५ बर्गसनच्या तत्वज्ञानाचें स्वरूप
६ भारतीय तत्वज्ञान व बर्गसनचें तत्वज्ञान यांतील साधर्म्य व वैधर्म्य
७ पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींतील ठळक भेद
८ मोहनजोदारो व हरप्पा येथें उपलब्ध झालेल्या अवशेषकालीन संस्कृतीचें स्वरूप
९ इतिहास हें शास्त्र आहे काय?
१० इतिहासकार व तत्वज्ञ यांच्या कार्यक्षेत्रांतील भेद
११ इतिहास व भूगोल यांचा नित्यप्रतीत होणारा संबंध (हिंदुस्थानांतील उदाहरणांसह)
१२ ॲक्टनच्या इतिहासविषयक कल्पना
१३ फ्रीमनच्या इतिहासविषयक कल्पना
१४ बकलची ऐतिहासिक दृष्टि
१५ मॉमसेनचें इतिहासविषयक कार्य
१६ रँकची कामगिरी
१७ ग्रीनचें वैशिष्ट्य
१८ ब्राइसची Holy Roman Empire मधील अंतर्भेदी दृष्टि
१९ शिशुशिक्षण विषयक कल्पनांचा विकास
२० फ्रोबेल, पेस्टॉलाझी व रूसो
२१ मॉंटेसोरी पद्धतीचीं मूलभूत तत्वें व सामान्य स्वरूप
२२ डाल्टन पद्धतीचीं मूलभूत तत्वें व सामान्य स्वरूप
२३ बुद्धिमापनाचे (Measurement of Intelligence) प्रयोग व त्यांची यशस्विता
२४ शिक्षणाचे हेतु व कार्य

२५ शिक्षकाचें ध्येय व कार्य

२६ मानस शास्त्राचे व्यावहारिक उपयोग

२७ मानसशास्त्राची प्रगति

२८ जर्मनींतील शिक्षणपद्धति:—

(१) प्राथमिक ( Primary )

(२) दुय्यम (Secondary )

(३) कला विषयक (Technical)

(४) विश्वविद्यालयांचें स्वरूप व कार्य इ. इ.

आपल्या लेखाचा सारांशही अवश्य देण्यांत यावा; व आपल्या विषयासंबंधीं सर्वमान्य (Standard) अशा मराठी व इंग्रजी ग्रंथांची यादि (Bibliography) देण्यांत यावी.

आपल्याकडून अजमासें किती दिवसांत लेख मिळेल हें कळविण्याची कृपा करावी.

लेख तारीख २० मार्चच्या आंत इकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

कळावे लोभ असावा हे विनंति.

आपला

**गोविंद बळवंत माकोडे**

अध्यक्ष, प्रसिद्धि मंडळ

तेरावें मराठी साहित्य संमेलन, ग्वाल्हेर.

परिशिष्ट ३ रें

# ग्वाल्हेरच्या संमेलनांत पास झालेले मुख्य ठराव

## १ महाराष्ट्र शारदा मंडळाचा ठराव

महाराष्ट्रीयांची वाङ्मयनिर्मिति आणि व्यासंग व सार्वत्रिक ज्ञानप्रसार हे हेतू शीघ्र सिद्धीस जाण्याकरितां एक सुव्यवस्थित व सर्वमान्य योजना करून ती कृतींत आणणारी एक मध्यवर्ती संस्था 'अखिल महाराष्ट्रीय शारदामंडळ' (Academy) स्थापण्यांत यावें असें या संमेलनाचें मत आहे. या संस्थेचें स्वरूप सामान्यतः श्री माधव मराठी मंडळानें प्रसिद्ध केलेल्या योजनेंतील आराखड्याप्रमाणें असावें. वरील आराखड्याप्रमाणें तयार केलेली योजना प्रसिद्ध करून साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत यावा आणि मंडळाची स्थापना करण्यांत येऊन कार्यास प्रारंभ व्हावा म्हणून हें संमेलन पुढील गृहस्थांचें मंडळ नेमीत आहे.

## २ संमेलन भरविल्याबद्दल राजघराण्याचें अभिनंदन

हें संमेलन प्रगतिप्रिय ग्वाल्हेर दरबारच्या कृपाछत्राखालीं भरत आहे. म्हणून ही सभा श्रीमंत महाराज जयाजीराव शिंदे, उभयता राजमाता व येथील राजसंस्था (कौंसिल) यांचें सादर साभिनंदन करीत आहे. आणि हें संमेलन या राज्याची व राजघराण्याची अभिवृद्धि चिंतितें.

## ३ ग्वाल्हेर दरबाराचें अभिनंदन

ग्रंथकारांस उत्तेजन व आश्रय देण्याकरितां ग्वाल्हेर दरबारनें प्रतिवर्षी पांच सहस्र रुपये देऊं केले आहेत. व त्याचा विनियोग करण्याचें काम येथील माधव मंडळावर सोंपविले आहे. याकरितां ही सभा दरबारचें अभिनंदन करीत आहे.

## उत्तर-हिंदुस्थानांत पूर्णपणें मराठी वृत्तपत्राची आवश्यकता

उत्तर हिंदुस्थानांत अनेक मोठमोठीं मराठी राज्यें असतांही एकही पूर्णपणें मराठी पत्र नाहीं; तरी ही उणीव उत्तर हिंदुस्थानांतील महाराष्ट्रीयांनीं शक्य तितक्या लवकर भरून काढावी अशी या संमेलनाची अत्यंत आग्रहाची सूचना आहे, या कामीं उत्तर हिंदुस्थानांतील मराठी संस्थानांनीं अवश्य तो हातभार लावून आपल्या मातृभाषेची कळकळ व्यक्त करावी अशी या सभेची विनंती आहे.

परिशिष्ट ४ थें.

## महाराष्ट्र शारदा मण्डळाची योजना

ॐ

नोच्चार्यो विफलोऽपि दूषणपदं दुष्यस्तुकामो लघुः

अनावृत पत्र

---

**श्रीमन्त सरकार सयाजीराव महाराज गायकवाड**
अध्यक्ष, सतरावें मराठी साहित्य सम्मेलन
कोल्हापूर.

विज्ञापना विशेष., शारदामहोत्सवाच्या या मंगल प्रसंगीं आपणाला अध्यक्षपदीं विराजमान होतांना पाहून प्राचीन काळच्या मुंजभोजादिप्रभृति विद्यावैभवसंपन्न भारतीय भूपतींचें मनोहर दृश्य डोळयापुढें उभें राहणें अगदी स्वाभाविक आहे. राजाश्रयावांचून कोणत्याही विद्येचा उत्कर्ष व्हावा तसा होत नाहीं, हेंच तत्व इतिहास आजवर कंठरवानें सांगत आला आहे. राजाश्रयावांचून कोणतेंही कार्य फिकें आणि पंगूच पडतें. आपल्यासारख्या स्वतः विद्वान, दानशूर व मातृभाषाभिमानी श्रेष्ठ प्रतीच्या महा-राजांचा मराठीला आज आश्रय लाभला हें तिच्या भा ी भाग्योदयाचें अचूक लक्षण आहे. 'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' त्यांतलाच हा प्रकार आहे.

अशा प्रसंगीं मराठी भाषेच्या सर्वांगीण अभिवृद्धीची एक योजना मीं आपल्यापुढें मांडण्याची परवानगी घेतों. तिचा आपण योग्य तो विचार कराल अशी दृढ आशा आहे. ही योजना १९१७ सालीं इंदूर येथील संमेलनप्रसंगीं प्रथम पुढें आली. त्यानंतर १९१७ च्या डिसेंबरांत महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंतून ती चर्चेस निघाली. नंतर १९२६ सालीं मुंबई येथील संमेलनाध्यक्षांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत मुक्तकण्ठानें हिचा गौरव केला व ती आपल्या भाषणास जोडून सर्व महाराष्ट्रीय पंडितांपुढें विचारार्थ मांडिली. तेव्हा त्याच संमेलनानें ठरावाच्या रूपानें हिचा एकमतानें उत्साहपूर्वक पुरस्कार केला. १९२८ सालच्या नाशिक-जिल्हा-शिक्षणपरिषदेच्या अध्यक्षांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत हिला जोराचा पाठिंबा,

दिला. व त्याच सालच्या ग्वाल्हेर येथील संमेलनानें हिचा सन्मानपूर्वक स्वीकार केला व हिची सुव्यवस्था लावण्याची जबाबदारी पत्करून तें काम महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख पुढाऱ्यांकडे सोंपविलें. त्यावेळीं या योजनेप्रीत्यर्थ हजारों, लाखों रुपयांचे संकल्प सुटले. मोठमोठे सरदार जहागीरदारही हिच्या अभिमानानें प्रेरित होऊन अहमहमिकेनें व तन-मन-धनानें हिच्या कार्यास प्रवृत्त झाले. पण इतकें सर्व होऊनही या योजनेच्या कार्याच्या दृष्टीनें आज जो पहिला दिवस आहे तो आहेच. तीच योजना संवर्धित व सुसंस्कृत स्वरूपांत आज आपल्यापुढें उपस्थित होत आहे. आपल्या अध्यक्षत्वानें अलंकृत व गौरवान्वित झालेलें हें संमेलन महाराष्ट्राच्या व मराठी भाषेच्या इतिहासांत चिरकाल संस्मरणीय व्हावें अशीच या प्रसंगीं सर्वांची इच्छा व अपेक्षा आहे हें उघड आहे. प्रस्तुत योजनेच्या भव्य प्रासादाची भरीव पायावर उभारणी व्हावी अशी व्यवस्था करून अल्प उपक्रमरूपानें त्याची कोनशिला स्थापण्याचें कार्य जरी आज आपल्या हातून घडलें तरी वरील हेतु बव्हंशीं साध्य होणार आहे.

शेवटीं, या कामीं माझ्याकडून ज्या ज्या सेवेची अपेक्षा केली जाईल ती करण्यास मी सदैव सिद्ध आहे, एवढें सांगून हें पत्र संपवितों. कळावें हे विज्ञापना.

कोहिया बजार,
ग्वाल्हेर,
२०-१२-१९३२

गोविन्द बळवन्त माकोडे.

नोद्धार्यो विफलोऽपि दूषणपदं दुष्यस्तुकामो लघुः।

## सतरावें महाराष्ट्र साहित्य संमेलन, कोल्हापूर
## १९३२

अध्यक्ष

### श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड

# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुनर्घटनेची योजना

(संयोजकः—गोविंद बळवंत माकोडे. ग्वाल्हेर.)

१ या संस्थेचें नांव महाराष्ट्र साहित्य परिषद् असें राहील. (यापुढें हिचा सर्वत्र परिषद् असा उल्लेख केला जाईल.)

२ मराठी भाषा व मराठी साहित्य यांच्या संरक्षण, संस्करण व संवर्धनरूप सर्वांगीण अभिवृद्धीसाठीं यथाशक्य व यथोचित प्रयत्न करणें हा या परिषदेचा उद्देश राहील.

३ या परिषदेचें स्थायिक कार्यालय येथें राहील.

४ या परिषदेचें वर्ष पासून पर्यंत राहील.

५ या परिषदेची यथाअवसर व यथाशक्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | सरस्वती मंडळ | (२) | कविमंडळ | (३) | साहित्यमंडळ |
| (४) | साहित्य परीक्षा | (५) | विद्यापीठ | (६) | साहित्य पत्रिका |
| (७) | संमेलन | (८) | प्रदर्शन | (९) | कोश |
| (१०) | ग्रंथालय | (११) | संग्रहालय | (१२) | मुद्रालय |
| (१३) | प्रकाशन कार्य | (१४) | वक्तृत्वोत्तेजन व | (१५) | शारदादिन |

अशीं अंगें राहतील.

६ मराठी भाषेविषयीं व साहित्याविषयीं अभिमान असणाऱ्या कोणाही इसमास या परिषदेचे सभासद होतां येईल.

७ परिषदेच्या सभासदांचे (१) साहित्यपोषक व (२) साहित्यसेवक असे दोन समूह गणले जातील. (पुढें यांचा पोषक व सेवक असाही उल्लेख केला जाईल.)

८ परिषदेचा सभासद होतेवेळीं पोषकाच्या वयाचीं एकवीस वर्षे व सेवकाच्या वयाचीं अठरा वर्षे पूर्ण झालेलीं असावीं लागतील.

**साहित्य पोषकः—**

९ परिषदेच्या पोषकांचे (१) आश्रयदाते (२) आजीवन समासद (३) देणगीदार व (४) वर्गणीदार असे चार प्रकार राहतील.

१० आश्रयदात्यांचे

| | |
|---|---|
| (१) संपोषक | ( रुपये किंवा अधिक देणारे ) |
| (२) संगोपक | ( ,, ,, ,, ,, ) |
| (३) संरक्षक | ( ,, ,, ,, ,, ) |
| (४) सहाय्यक | ( ,, ,, ,, ,, ) |
| (५) सहानुभविक | ( ,, ,, ,, ,, ) |

असे पांच वर्ग राहतील.

११ एकाच हप्त्याने रुपये देणारे ते आजीवन समासद.

१२ इतर कोणत्याही प्रकारच्या देणग्या देणारे ते देणगीदार.

१३ वार्षिक रुपये देणारे ते वर्गणीदार.

**साहित्य सेवकः—**

१४ साहित्यसेवेची आवड व हौस असणाऱ्या कोणाही इसमास साहित्य-सेवक होतां येईल.

१५ साहित्यसेवेच्या हौसेचे व औत्सुक्याचें गमक म्हणून स्वतः लिहिलेले पाच संपूर्ण लेख परिषदेस पसंत पडल्यास त्यास साहित्यसेवक करण्यांत येईल.

१६ या लेखांचें परीक्षणशुल्क म्हणून प्रत्येक उमेदवारास लेखाबरोबरच एक रुपया द्यावा लागेल.

१७ साहित्यसेवकास परिषदेची वार्षिक वर्गणी रुपये आगाऊ द्यावी लागेल

**सरस्वती मंडळः—**

१८ ज्ञान (Literature) विज्ञान (Science) व कला (Arts and Technology) यांतील अद्वितीय अशा विद्वानांसच सरस्वतीमंडळांत निवडून घेण्यास पात्र समजलें जाईल.

१९ सरस्वतीमंडळाचें समासदत्व आजीवन राहील.

२० सरस्वतीमंडळाच्या नवीन सभासदांची निवड निर्बाध व निरपवाद अशा ऐकमत्यानेंच केली जाईल.

२१ सरस्वतीमंडळाचें (१) आचार्य मंडळ (२) भट्टमंडळ व (३) सूरिमंडळ असे तीन विभाग राहतील

२२ आचार्य मंडळ, भट्टमंडळ व सूरिमंडळ या मंडळांच्या सभासदांच्या नांवामागें वा पुढें बहुमान दर्शक अशा अनुक्रमें **आचार्य, भट्ट** व **सूरि** या पदव्या लावण्यांत येतील.

**आचार्यमंडळः—**

२३ मराठी भाषेची अभिजात ग्रंथरूपानें अप्रतिम सेवा करणारासच आचार्य मंडळाचा सभासद निवडून येण्यास पात्र समजलें जाईल.

(**टीप**:–आचार्य मंडळाची पहिली निवड एका विशिष्ट मंडळींकडून विशिष्ट पद्धतीनें करण्यांत येईल. )

**भट्ट मंडळः—**

२४ मराठींतून आपले विचार व्यक्त करण्याचें ज्यांचे अंगीं सामर्थ्य आहे व जे विद्वत्तेनें आचार्य या पदवीस पूर्णपणें पात्र आहेत, पण ज्यांच्या हातून मराठी भाषेची अभिजात ग्रंथरूपानें अप्रतिम सेवा झालेली नाहीं, त्यांनाच या भट्टमंडळांत निवडून येण्यास पात्र समजलें जाईल.

(**टीप**:—आचार्यमंडळ अस्तित्वांत आल्यानंतर त्यांच्याकडूनच भट्टमंडळाचे पहिले सभासद निवडण्यांत येतील. )

(टीपः —आचार्य व भट्ट मंडळांत दिवगत विद्वानांचाही शोधपूर्वक समावेश करण्यांत येइल )

२५ भट्टमंडळाच्या नवीन सभासदांची निवड आचार्य व भट्टमंडळाच्या संयुक्त सभेकडूनच होत जाईल.

२६ विद्वत्तेनें व योग्यतेनें 'आचार्य' पदवीधरांशीं तुल्यबळ असे जे अन्यभाषीय पंडित असतील, त्यांस सूरिमंडळाचे सभासद निवडून येण्यास पात्र समजलें जाईल.

२७ सूरिमंडळाच्या सभासदांची निवड त्या त्या भाषांच्या सर्वमान्य संस्थांमार्फतच करण्यांत येईल.

**कविमंडळः—**

२८ कविमंडळांत अत्यंत उज्वल प्रतिभेच्या कवींचाच समावेश करण्यांत येईल व त्यांच्या नांवांमागें बहुमानदर्शक अशी 'कविशार्दूल' ही पदवी लावण्यांत येईल.

२९ कविमंडळांत समावेश करण्याबद्दलची शिफारस करण्याचा पुढें वर्णिलेल्या कोविद व वरिष्ठ पदवीधरांसच अधिकार राहील. ही शिफारस त्या कवीच्या समग्र काव्याचा सांगोपांग व निर्विकार अशा गुणदोषविवेचनात्मक निबंधरूपानेंच केलेली स्वीकारली जाईल.

३० हा निबंध परिषदेच्या पत्रिकेंत प्रसिद्ध झाल्यादिवसापासून बारा महिने-पर्यंत त्या कवीच्या काव्याची साधक-बाधक चर्चा करण्यास सवड राहील.

३१ या अवधीनंतर कोविद व वरिष्ठ पदवीधरांचीं लेखीं मतें मागविलीं जाऊन त्यापैकीं किमानपक्षीं तीनचतुर्थांश मतें अनुकूल पडल्यासच त्या कवीस कवीमंडळांत समाविष्ट करण्यांत येईल.

**साहित्य मंडळः—**

३२ **आचार्य, भट्ट** व पुढें वर्णिलेल्या **पंडित** व **विशारद** या पदव्या धारण करणारे परिषदेचे सर्व सभासद या मंडळाचे सभासद समजले जातील.

३३ साहित्यमंडळ हेंच या परिषदेचें कार्यकारी मंडळ समजलें जाईल.

३४ या मंडळाचे **एक अध्यक्ष दोन** उपाध्यक्ष, **एक** कार्याध्यक्ष, **तीन विश्वस्त** ( Trustees ) **दोन मंत्री, दोन आयव्ययपरीक्षक** अधिकारी राहतील.

३५ या मंडळाचा अध्यक्ष **आचार्यांपैकींच** निवडला जाईल.

३६ या मंडळाच्या अधिकाऱ्यांची निवडणूक दर दोन वर्षांनीं केली जाईल.

३७ मधेंच रिकामीं झालेली जागा पुढील निवडणुकीपर्यंत भरण्याचा या मंडळास अधिकार राहील.

३८ या मंडळाच्या सभा दर तीन महिन्यांनीं होत जातील.

३९ या मंडळाच्या सभेची सूचना प्रत्येक सभासदास कामाच्या टिपणा ( Agenda ) सह निदान पंधरा दिवस पूर्वी दिली जाईल.

४० कोणत्याही बाबीसंबंधीं सभासदानें आपला अभिप्राय व मत लिहून पाठविल्यास त्या बाबींपुरती ती उपस्थितीच समजली जाईल.

४१ **अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष,** व **मंत्री** हे खेरीज करून या मंडळाच्या सभासदांची गणसंख्या (Quorum) दहा राहील.

४१ **अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष,** यांच्यापैकीं एक जण व मंत्र्यांपैकीं एक जण उपस्थित असल्यावांचून या मंडळाच्या कोणत्याही सभेचें काम चालणार नाहीं.

४३ स्थगित झालेल्या सभेस गणसंख्येची गरज राहणार नाहीं.

४४ स्थगित झालेल्या सभेची सूचना आठ दिवस पूर्वी दिली जाईल.

४५ स्थगित झालेल्या सभेत पूर्वी जाहीर झालेल्या कामाखेरीज इतर कोणत्याही कामाचा विचार केला जाणार नाहीं.

४६ स्थगित झालेली सभा पुढील पंधरा दिवसाच्या आंत भरविली न गेल्यास ती अजीबाद वगळली गेली असें समजलें जाईल.

**विद्याशाखा** ( Faculties ):-

४७ **साहित्य मंडळाचें** सर्व काम निरनिराळ्या विद्याशाखामार्फत चालेल.

४८ **साहित्य** मंडळाच्या सभासदांतूनच निरनिराळ्या विषयांच्या तज्ञांच्या **विद्याशाखा** निवडण्यांत येतील.

४९ प्रत्येक विद्याशाखेंत किमानपक्षीं पांच तज्ञ राहतील.

५० कोणाही तज्ञास एका वेळीं एकापेक्षां अधिक विद्याशाखांत निवडून येतां येणार नाहीं.

५१ एकाच **विद्याशाखेंत** लागोपाठ तीन वर्षें राहिलेला तज्ञ त्या शाखेंतून आपोआप निवृत्त झाला असें समजलें जाईल, व त्याच्या जागीं नवीन **निवडणूक** केली जाईल.

५२ निवृत्त झालेल्या तज्ञास पुन्हां त्याच **विद्याशाखेंत** नव्यानें निवडून येण्यास प्रतिबंध राहणार नाहीं.

५३ प्रत्येक विद्याशाखा आपापला **अध्यक्ष** व **मंत्री** स्वतःच निवडून घेईल.

५४ प्रत्येक **विद्याशाखेस** आपापल्या कामाच्या सोयीसाठीं **परिषदेचे** उद्देश घटना व नियम यांशीं अविरोधी असे कोणतेही नियम करण्याचा अधिकार राहील. पण ते नियम कार्यवाहींत येण्यासाठीं साहित्य-मंडळाची अनुमति अनिवार्य राहील.

५५ प्रत्येक **विद्याशाखेस** आपापल्या विषयासंबंधींच्या **सूरिमंडळाच्या** सभासदांस व अन्यदेशीय अथवा अन्यभाषीय संस्थाच्या प्रतिनिधीस आपापल्या **विद्याशाखेचा विशेष सभासद** करून घेण्याचा अधिकार राहील.

५६ प्रत्येक **विद्याशाखा** गतमासांत झालेल्या आपापल्या कामाचा सा विस्तर वृत्तांत, त्याचप्रमाणें **विशेष सभासदांच्या द्वारें** त्या त्या भाषेंतील अथवा संस्थांतील आपापल्या विषयासंबंधींच्या कार्याचा आणि प्रगतीचा सविस्तर वृत्तांत जशाचा तसाच मराठींतून पत्रिकेंत प्रसिद्ध करीत जाईल.

५७ प्रत्येक **विद्याशाखा** आपापल्या विषयासंबंधींच्या, सर्वसामान्य जनसमूहाच्या निरनिराळया वर्गांतील प्रौढ स्त्रीपुरुष वाचकास सुबोध त्रासतील अशा लहान मोठ्या प्रमाणभूत ( Standard ) ग्रंथमाला सवडीनुसार प्रकाशित करीत जाईल.

५८ प्रत्येक **विद्याशाखा** आपापल्या विषयासंबंधीं अन्य भाषांतील प्रमाणभूत ग्रंथांचीं इष्टतेनुरूप **भाषांतरें** या **रूपांतरें** सवडीनुसार प्रकाशित करीत जाईल.

५९ प्रत्येक **विद्याशाखा** आपापल्या विषयासंबंधींच्या ग्रंथादिकांच्या परीक्षणाचें कार्य करीत जाईल. व त्यांच्या त्यांच्य योग्यतेनुरूप पदवी वगैरेबद्दल शिफारस करीत जाईल.

६० प्रत्येक **विद्याशाखा** आपापल्या विषयासंबंधींच्या वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या स्वपरभाषेंतील ग्रंथांची व लेखांची वर्णनात्मक सूची (याद्या) प्रतिमास प्रकाशित करीत जाईल.

६१ प्रत्येक **विद्याशाखा** आपापल्या विषयासंबंधीं मराठींतील प्रमाणभूत व अभ्यसनीय अशा निवडक पुस्तकांचे ( १ ) **प्राथमिक स्वरूपाचे**, व (२) **दुय्यम दर्जाचे** व (३) **प्रतीचे**, असे तीन वर्ग करून त्यांच्या सविस्तर वर्णनात्मक सूची प्रतिवर्षी मार्च महिन्यांत प्रकाशित करीत जाईल

६२ साहित्यसेवकाच्या आवश्यकतेप्रमाणें जगांतल्या निरनिराळया भाषांच्या वाङ्मयांतील कोणतीही माहिती साधार व सप्रमाण पुरविण्याची प्रत्येक **विद्याशाखा** शक्य तोंवर प्रयत्न करील.

**पदव्या:—**

६३ कोणाही इसमास योग्य तें परीक्षणशुल्क देऊन आपल्या **विद्वत्तेची, काव्यप्रतिभेची, कलानैपुण्याची** अथवा अन्य **गुणविशेषाची** वाङ्मयात्मक **प्रतवारी परिषदेकडून** ठरवून घेतां येत जाईल.

६४ परीक्षणशुल्काखेरीज अशा कोणत्याही प्रकारच्या लेखांचा स्वीकार केला जाणार नाहीं.

६५ ही प्रतवारी पदव्यांच्या रूपानें केली जाईल.

६६ या पदव्या (१) **साहित्य** (Literature) (२) **विज्ञान** (Science) व (३) **कला** ( Arts and Technology ) या तिन्ही प्रकारच्या शाखांत दिल्या जातील. व त्या त्या शाखेचे निदर्शक ह्मणून प्रत्येक पदवीमागें या पुढें अनुक्रमें **साहित्य, विज्ञान** आणि **कला** हीं पदें लावण्यांत येतील.

६७ पदवीला अनुरूप, लेखाची योग्यता नसल्यास पदवीबद्दल शिफारस केली जाणार नाहीं; किंवा परीक्षणशुल्कही परत केलें जाणार नाहीं. पण उम्मेद-वाराची इच्छा असल्यास पुढें यशस्वी होण्याविषयीं त्यास योग्य तो सल्ला दिला जाईल.

६८ पदवीसाठीं केल्या जाणाऱ्या अशा प्रत्येक प्रयत्नाचें परीक्षणशुल्क वेगवेगळें द्यावें लागेल.

६९ चढत्या श्रेणीनें गद्यात्मक वाङ्मयाच्या पदव्यांचा क्रम ( १ ) **निपुण** (२) **प्रवीण** (३) **कोविद** (४) **विशारद** व ( ५ ) **पण्डित** असा राहील. व काव्यविषयक पदव्यांचा क्रम (१) **शारदाभूषण** (२) **शारदालंकार** व **शारदा-रत्न** असा राहील.

७० प्रत्येक पदवीचें व इतर गोष्टींचें परीक्षणशुल्क **पारषदेच्या** सभासदांस तिच्य नियमाप्रमाणें द्यावें लागेल. इतरांस त्यांच्या दुप्पट द्यावें लागेल.

७१ साहित्यविषयक पदव्यांचें शुल्क, **निपुणास** पांच रुपये, **प्रवीणास** दहा रुपये, **कोविदास** पंधरा रुपये, **विशारदास** वीस रुपये व **पण्डितास** पंचवीस रुपये याप्रमाणें राहील. व काव्यविषयक पदव्यांचें शुल्क, **शारदाभूषणास** पांच रुपये, **शारदालंकारास** दहा रुपये, व **शारदारत्नास** पंधरा रुपये, असे राहील.

७२ पदव्याखेरीज इतर कोणत्याही प्रकारच्या गद्यपद्य लेखाचें परीक्षणशुल्क पांच रुपये राहील.

७३ असल्या प्रकारच्या लेखावर **परिषद्चा** लेखी अभिप्राय पाहिजे असल्यास त्याबद्दल दोन रुपये शुल्क निराळें द्यावें लागेल. अभिप्राय अनुकूल असला तरच तो दिला जाईल.

७४ वरील सर्व गोष्टींचे निर्णय वेळचेवेळीं त्या त्या लेखकास कळविण्यांत येतील. व त्याशिवाय तें **परिषदेच्या पत्रिकेंत, वृत्तपत्रांत, नियत कालिकांत,** व **संमेलन प्रसंगींही** जाहीर केले जातील.

पदव्यांचें गुणमान ( Standard ):—

७५ **निपुण** व **प्रवीण** या पदव्यांसाठीं उमेदवाराकडून सामान्यतः आपल्या आवडीच्या एकाद्या विषयाची अथवा कलेची उत्पत्ति, विकास व इतिहास यासंबंधीं अथवा त्या विषयाच्या एकाद्या विशिष्ट अंगोपांगासंबंधीं साधार व सप्रमाण लिहिलेल्या निबंधाच्या, अनुक्रमें, स्थूल व सूक्ष्म स्वरूपाच्या विवेचनाची अपेक्षा केली जाईल.

७६ **कोविद** या पदवीसाठीं उमेदवाराकडून आपल्या स्वतंत्र विचाराच्या - संशोधनात्मक निबंधाची अपेक्षा केली जाईल.

७७ **विशारद** या पदवीसाठीं उमेदवाराकडून आपल्या आवडीच्या एकाद्या विषयासंबंधीं इंग्रेजी, फ्रेंच व जर्मन या भाषेंतील सर्व प्रकाशित वाङ्मयाचा परामर्ष घेऊन लिहिलेल्या संशोधनात्मक व सांगोपांग विवेचनात्मक ग्रंथाची अपेक्षा केली जाईल.

७८ **पंडित** या पदवीसाठीं उमेदवाराकडून आपल्या आवडीच्या विषयासंबंधीं जगांतील सर्व अभियुक्त भाषांतील वाङ्मयाचा परामर्ष घेऊन लिहिलेल्या संशोधनात्मक व सांगोपांग सूक्ष्म विवेचनात्मक ग्रंथाची अपेक्षा केली जाईल.

**टीप नं. १:**—जगांतील अभियुक्त भाषा या सदराखालीं येथें पुढील भाषा अभिप्रेत आहेत:—

भारतीय—हिंदी, उर्दू, मराठी, बंगाली, गुजराथी, तामील, तेलगू, कानडी व मळायलम

बहिर्भारतीय—इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, डच, पोर्तुगीज, झेकोस्लो व्हाकियन, ग्रीक, लॅटिन, हिब्रू, पर्शियन, अरेबिक, चिनी व जपानी.

**टीप नं. २:**—परकीय भाषांतील मूळ उतार सोयीप्रमाणें पादटीपांत अथवा परिशिष्टांत देऊन त्यांचें बिनचूक भाषांतर अवतरण चिन्हांनीं अंकित करून ग्रंथाच्या मजकुरांत गोवण्यांत यावें.

**टीप नं. ३:**—प्रत्येक ग्रंथास व निबंधास आधारभूत ग्रंथांची संपूर्ण यादी देण्यांत यावी. याशिवाय मूळ शब्दांसह मराठींत घडलेल्या नवीन शब्दांची सूची परिशिष्टांत देण्यांत यावी.

**टीप नं. ४:**—प्रत्येक निबंधास वा ग्रंथास प्रस्तावना अवश्य यावी व तींत त्याचें प्रयोजन देऊन त्या विषयासंबंधीं आपण नवीन भर कोणती घातली आहे हें सार रूपानें सांगावें.

ग्रंथ संग्रहालय ... क्र. ८०

टीप नं. ५:—परीक्षणासाठीं आपला ग्रंथ देतांना त्यावर आपलें नांव न घालतां खुणेचें एकादें वाक्य किंवा श्लोकाचा एकादा चरण घालावा व आपल्या नांवासहित ती खूण एका निराळ्या पाकिटांत घालून त्यासह तो ग्रंथ परिषदेकडे पाठविण्यांत यावा.

पदकें:—

७९ पदकांचे (१) सुवर्णपदक व (२) रौप्यपदक असे दोन प्रकार राहतील.

८० शास्त्रीय विषयांखेरीज अन्य कोणत्याही विषयावर गद्य वा पद्य अशीं उपयुक्त व अभिजात पुस्तकें लिहिणारास पुस्तकाच्या योग्यतेनुरूप सुवर्ण वा रौप्य पदक दिलें जाईल.

पारितोषिकें व प्रमाणपत्रें ( Certificates of Merit ):—

८१ परिषद आपल्या सवडीनुसार वेळोवेळीं एकादा विषय जाहीर करून त्यावर निबंध अथवा ग्रंथ यांची चढाओढ लावील. या चढाओढींत यशस्वी होणारास पारितोषिक व द्वितीय व तृतीय प्रतीच्या उमेदवारास प्रमाणपत्रें दिलीं जातील.

८२ अशा चढाओढींत समान योग्यतेचे उमेदवार आढळल्यास त्या प्रत्येकास पारितोषिकें व प्रमाणपत्रें दिलीं जातील. पण अशा प्रसंगीं दोहोंपेक्षां अधिक उमेदवारांस पारितोषिक दिलें जाणार नाहीं, कालानुक्रमानें परिषदकडे ज्यांचे लेख अगोदर पोंचते झाले असतील त्यांनाच हीं पारितोषिकें देण्यांत येतील. इतरांस खास ( Special ) प्रमाणपत्रें देण्यांत येतील.

८३ चढाओढींत आलेल्या निबंधांची अथवा ग्रंथांची योग्यता अपेक्षेप्रमाणें नसल्यास पारितोषिकें किंवा प्रमाणपत्रें दिलीं जाणार नाहींत.

विद्यापीठ ( University ):—

८४ स्वसंस्कृतिनिष्ठ, सुसंस्कृत, आत्मविश्वासंपूर्ण, कार्यक्षम, स्वावलंबी, प्रागतिक, व्यवहारदक्ष, व व्यक्तिवैशिष्ट्यसंपन्न, असे नागरिक निर्माण करणें हेंच या विद्यापीठाचें सतत ध्येय राहील.

८५ बुद्धि (Intellect or Head) भावना (Emotion or Heart) व कामना (Will or Hand) या तिघांचा यथाप्रमाण व सारखा ( regular ) विकार होत जाईल, या गोष्टींकडे विद्यापीठाचें मुख्यत्वेंकरून लक्ष राहील.

८६ या विद्यापीठाकडे प्राथमिक, दुय्यम, उच्च व पदव्युत्तर संशोधनात्मक शिक्षणाचा संपूर्ण ताबा राहील.

८७ या विद्यापीठांत संपूर्ण शिक्षण केवळ मराठी भाषेंतूनच दिलें जाईल.

८८ या विद्यापीठांचा प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम प्रत्येकीं चार चार वर्षांचा राहील.

८९ साहित्यमंडळाच्या विद्याशाखा याच या विद्यापीठाच्या विद्याशाखा (Boards of studies) म्हणून समजल्या जातील.

९० विद्यापीठाच्या विद्याशाखा आपापले या विषयाचे अध्यापक (Professors) उपाध्यापक (Readers) व व्याख्याते (Lecturers) स्वत:च निवडून घेतील.

९१ विद्याशाखेंतील बाकी राहिले सभासद हे या विद्यापीठाचें त्या त्या विषयाचे सदस्य (Fellows) म्हणून समजलें जातील.

९२ अध्यापक, उपाध्यापक, व्याख्याते व सदस्य या सर्वांची मिळून होणारी जी सभा ती या विद्यापीठाची विद्या (ज्ञान) सभा (Senate) समजली जाईल.

९३ अध्यापक, उपाध्यापक, व व्याख्याते या सर्वांची मिळून होणारी जी सभा ती या विद्यापीठाचें कार्यकारी मंडळ (Syndicate) समजलें जाईल.

९४ विद्यासभेनें आचार्य मंडळांतून निवडलेला अध्यक्ष हाच या विद्यापीठाचा कुलगुरु (Vice-chancellor) समजला जाईल. व हाच विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचाही अध्यक्ष समजला जाईल.

९५ साहित्य मंडळाचा अध्यक्ष हाच या विद्यापीठाचा कुलपति (Chancellor) समजला जाईल.

९६ याशिवाय परिषदेच्या मूलभूत हेतूंशीं व नियमांशीं अविरोधी असे कोणतेही नियम वा व्यवस्था करण्याचा या विद्यापीठास पूर्ण अधिकार राहील. पण त्यांस साहित्यमंडळाची अनुमति अनिवार्य राहील.

**टीप:**—पुस्तकें, इमारती वगैरे यांप्रीत्यर्थ अनाठायीं खर्च होऊं नये म्हणून परिषदेचें व विद्यापीठाचें अशीं दोन्ही ग्रंथालयें व वाचनालयें एकाच संस्थेचीं अंगें असल्यामुळें तीं एकाच इमारतीत पण योग्य ती स्वतंत्र व्यवस्था करून ठेविलीं जातील.

**महाराष्ट्र साहित्य पत्रिकाः—**

९७ **परिषदेच्या** सर्व चळवळींचें प्रतिबिंबरूप तिचें एक स्वतंत्र **मासिक** राहील. व त्याचें नांव **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** असें राहील.

९८ या **पत्रिकेंत परिषदेच्या** निरनिराळ्या अंगोपांगांच्या गत मासांतील कार्याचा सविस्तर वृत्तांत प्रकाशित केला जाईल. याशिवाय निरनिराळ्या **विद्या-शाखां**कडून आलेले लेख वगैरेही प्रकाशित केले जातील.

९९ या **पत्रिकेंत** एका सर्वसामान्य (General) विभागाशिवाय निर-निराळ्या **विद्याशाखांचा** स्वतंत्र विभाग राहील. व त्या प्रत्येक विभागास स्वतंत्र पृष्ठांक दिला जाईल.

१०० प्रत्येक **विद्याशाखेचा अध्यक्ष** आपल्या विभागाच्या संपादनकार्या-बद्दल जबाबदार राहील. व **सम्पादक** म्हणून त्याचें नांव त्या त्या विभागावर दिलें जाईल.

१०१ **साहित्यमण्डळाचा अध्यक्ष** हाच या **पत्रिकेचा** सर्वसामान्य **प्रमुख सम्पादक** राहील.

१०२ **प्रमुख सम्पादक** व **विभाग सम्पादक** यांचीं नांवें **पत्रिकेच्या** मुखपृष्ठावर दिलीं जातील.

**प्रकाशनमण्डळ·—**

१०३ खास **परिषदेचे** व **परिषदेनें** पसंत केलेले सर्व ग्रंथ, निबंध, काव्यें वगैरे लेखकांच्या खर्चानें हें **प्रकाशनमण्डळ** प्रसिद्ध करीत जाईल.

१०४ छापणावळीचा खर्च देण्यास असमर्थ असलेल्या लेखकांस ती कर्जाऊ दिलेली रकम म्हणून समजली जाईल. व त्या रकमेची संपूर्ण फेड होईपर्यंत तिच्यावर दरमहा दर शेकडा दहा आणे प्रमाणें व्याज आकारण्यांत येईल.

१०५ संपूर्ण कर्जफेड होईपर्यंत लेखकाचा आपल्या पुस्तकावर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. तोंपर्यंत त्यावर सर्वप्रकारें परिषदेचीच मालकी राहील.

१०६ ग्रंथविक्रींतून कर्ज फेडीसाठीं जी रकम कमी पडेल तीबद्दल लेखकास कोणत्याही प्रकारें जबाबदार धरलें जाणार नाहीं.

१०७ ग्रंथ विक्रीवर जो फायदा होईल त्यापैकीं शेंकडा वीस इतकी रकम कापून घेऊन बाकीचा फायदा लेखकास देण्यांत येईल.

१०८ ग्रंथाला कोणाकडूनही जें बक्षिस वगैरे मिळेल त्यावर लेखकाचीच सर्वस्वी मालकी राहील. त्यावर या कर्जाऊ रकमेचें कोणत्याही प्रकारचें बंधन राहणार नाहीं.

## साहित्यसम्मेलनः-

१०९ परिषदेच्या देखरेखीखालीं दर दोन वर्षांनी एक साहित्य सम्मेलन भरविण्यांत येत जाईल.

११० दुसरीकडचें आमंत्रण नसल्यास परिषद स्वतःच हें सम्मेलन भरवीत जाईल.

१११ सम्मेलन ईस्टरच्या सुटींत भरविण्यांत येत जाईल.

११२ सम्मेलनाचा कार्यक्रम तीन दिवसांपेक्षां अधिक राहणार नाहीं.

११३ संमेलनाचें अध्यक्षपद आचार्यमंडळाच्या क्रमप्राप्त सभासदासच प्राप्त होत जाईल.

११४ सर्व साहित्यसेवक हे संमेलनाचे प्रतिनिधि समजले जातील.

११५ कोविद व वरिष्ठ पदवीधर हे विषयनियामकमंडळाचे सभासद समजले जातील.

११६ संमेलनापुढील ठरावावर मत देण्याचा अधिकार परिषदेच्या सर्व प्रकारच्या पदवीधरांसच राहील.

११७ संमेलनासाठीं इतर भाषांचे निरनिराळ्या ज्ञानशाखांचे तज्ञ पंडित त्या त्या भाषांच्या सर्वमान्य संस्थांमार्फत संन्मान्य प्रतिनिधि म्हणून बोलावण्यांत येत जातील.

११८ याचप्रमाणें विशिष्ट विषयास वाहिलेल्या संस्थांचेही प्रतिनिधि त्यांच्या त्यांच्या मार्फत बोलावण्यांत येत जातील.

टीपः—या सन्मान्य प्रतिनिधींस आपापल्या विषयासंबंधीं अथवा आपापल्या कार्याच्या प्रगतिविषयीं व्याख्यानें देण्याची सवड ठेविली जाऊन तीं संमेलनाच्या कार्यक्रमांत गोवण्यांत येईल.

११९ संमेलनासाठीं लेख, कविता, ठराव, योजना इत्यादि परिषदेच्या कार्यालयांत १५ आक्टोबरला किंवा अगोदरच पोंचत्या कराव्या लागतील.

१२० प्रत्येक लेखावर ' संमेलनासाठीं ' असें लिहून त्याबरोबर त्याचें

 अनुक्र. २०९५L दि: ३।१२ क्रमांक ८४५ नों: दि: ७।७।५५

भरपूर पोस्टेजशी पाठवावें लागेल. म्हणजे नापसंत लेख तावडतोब परत पाठविण्यांत येतील.

१२१ अनरजिस्टर्ड लेखां विषयीं परिषदेवर कोणत्याही प्रकारची जबावदारी राहणार नाहीं.

१२२ संमेलनापुढें मांडण्यासाठीं पसंत झालेले लेख, कविता, ठराव इत्यादिकांचें छापील पुस्तक परिषदेच्या सर्व सभासदांकडे १५ फेब्रुवारीच्या आंत पोंचतें केलें जाईल.

१२३ आपापल्या लेखादिकांच्या छपाईचा अर्धा खर्च पेजवारीनें लेखकांकडून वसूल करण्यांत येईल.

१२४ सम्मेलनासाठीं पसंत झालेल्या लेखांच्या छपाईसाठीं प्रत्येक लेखकास आपल्या लेखाबरोबर परिषदेकडे पांच रुपये अमानत ठेवावे लागतील.

१२५ नको असलेलीं किंवा छपाईचा खर्च भागून उरलेली अमानत रकम अमानतदाराच्या खर्चानें म. ऑ. नें परत केली जाईल. त्याचप्रमाणें छपाईच्या खर्चास कमी पडणारी रकम लेखकाकडून व्ही. पी. नें तावडतोब वसूल केली जाईल.

१२६ सम्मेलनापुढें मांडलेल्या कोणत्याही बाबीसंबंधीं कोणास कांहीं अनुकूल वा प्रतिकूल बोलावयाचें असल्यास त्यास आपल्या सर्व मुद्यांचें संक्षिप्त कथन १५ मार्चच्या आंत परिषदेकडे पोंचतें करावें लागेल.

१२७ असें कोणतेंही कथन पत्रिकेच्या दोन पृष्ठांपेक्षां अधिक असलेलें स्वीकारलें जाणार नाहीं.

१२८ अशा प्रत्येक कथनकारास आपल्या प्रत्येक कथनाबरोबर दोन रुपये छपाईखर्च द्यावा लागेल.

१२९ असें प्रत्येक कथन परिषदेच्या सर्व सभासदांकडे ता. १ एप्रिलच्या आंत पोंचतें केलें जाईल.

१३० स्वागताध्यक्ष व सम्मेलनाध्यक्ष यांची छापील भाषणें सम्मेलन सुरु होण्यापूर्वी केवळ पंधरा मिनिटें परिषदेच्या सर्व उपस्थित सभासदांच्या हातांत पडतील. इतरांस तीं विकत मिळतील.

१३१ सम्मेलनप्रसंगीं अनुपस्थित अशा परिषदच्या सर्व सभासदांकडे हीं दोन्ही भाषणें सम्मेलन आटोपतांच पाठविण्यांत येतील.

१३२ अर्ध्या तासांत आटोपतील इतकेच उतारे स्वागताध्यक्षाच्या भाषणांतील संमेलनापुढें वाचले जातील. व एक तासांत आटोपतील इतकेच उतारे अध्यक्षाच्या भाषणांतील वाचले जातील.

१३३ अध्यक्षाच्या भाषणानंतर पंधरा मिनिटांनीं लगेच विषय नियामक मंडळीच्या बैठकीस सुरुवात केली जाईल.

१३४ स्थानिक पोषकांत ज्यांचें स्थान सर्वांत श्रेष्ठ असेल त्यासच स्थानिक संमेलनाच्या स्वागतमंडळाचें अध्यक्षपद प्राप्त होईल.

१३५ किमानपक्षीं शंभर रुपये संमेलनासाठीं देणारासच स्वागतमंडळाचें उपाध्यक्ष निवडून येण्यास पात्र समजलें जाईल.

१३६ स्वागतमंडळाच्या उपाध्यक्षांची संख्या अकरापेक्षां केव्हांही अधिक असणार नाहीं.

१३७ पोषकांस द्याव्या लागणाऱ्या स्वागतमंडळाच्या वर्गणीचें किमानपक्षीं प्रमाण, संपोषकास पंचवीस रुपये, संगोपकास वीस रुपये, संरक्षकास पंधरा रुपये, सहाय्यकास दहा रुपये, सहानुभाविकास पांच रुपये, आजीवन सभासदास चार रुपये व वर्गणीदारास दोन रुपये व इतरांस किमानपक्षीं तीन रुपये याप्रमाणें राहील.

१३८ साहित्यसेवकांस संमेलनाप्रीत्यर्थ द्याव्या लागणाऱ्या वर्गणीचें किमान-पक्षीं प्रमाण आचार्यास सात रुपये, भट्टास सहा रुपये, पंडितास पांच रुपये, विशारदास चार रुपये, कोविदास तीन रुपये, प्रवीण व निपुण यांस दोन रुपये त्याच-प्रमाणें कविशार्दूलास पांच रुपये शारदारत्नास चार रुपये, शारदालंकारास तीन रुपये, व शारदाभूषणास दोन रुपये, असे राहील. इतर सर्व साहित्यसेवकांस किमानपक्षीं एक रुपया संमेलनवर्गणी द्यावी लागेल.

१३९ परिषदेच्या सर्व सभासदांस संमेलनवर्गणी अनिवार्य राहील.

१४० प्रतिनिधींच्या राहण्याची, चहाफराळाची व भोजनाची सोय स्वागत-मंडळाकडून केली जाईल.

१४१ एक वेळच्या चहाफराळाबद्दल माणशीं दोन आणे, व एकवेळच्या भोजनाबद्दल माणशीं दहा आणे, यापेक्षां अधिक खर्च प्रतिनिधींस आकारला जाणार नाहीं.

१४२ चहाफराळाची व भोजनाची वेगवेगळीं कुपनेंच विकण्यात येतील तीं प्रत्येकास आपापल्या गरजेप्रमाणें हवीं तितकीं विकत घेतां येतील.

१४३ संमेलन खर्च वजा जातां जी शिल्लक उरेल तिचे दोन सारखे वांटे केले जातील व ते अनुक्रमें परिषदेच्या व तिच्या स्थानिक शाखेच्या शाश्वत निधींत जमा केले जातील.

**प्रदर्शनः—**

१४४ संमेलनाबरोबरच एक साहित्यविषयक प्रदर्शन भरविण्यांत येत जाईल.

१४५ या प्रदर्शनांत सर्व प्रकारचे मराठी हस्तलेख, शिलालेख, ताम्रपट कवि, शाहीर, ग्रंथकार इत्यादिकांची तैलचित्रें व फोटो, गेल्या तीन वर्षांत प्रकाशित झालेले निवडक वाङ्मय, चालू वृत्तपत्रांचें व नियतकालिकांचे क्रमबद्ध तीन तीन अंक, त्यांचे खास अंक, व इतर साहित्यविषयक प्रश्नांवर प्रकाश पाडणाऱ्या गोष्टी या मांडण्यांत येतील.

१४६ इतर भारतीय भाषांच्या प्रगतीशीं मराठीची तुलना करतां यावी म्हणून त्या त्या भाषांचें गेल्या तीन वर्षांत प्रकाशित झालेलें निवडक वाङ्मयही या प्रदर्शनांत ठेवण्यांत येईल. त्याचप्रमाणें त्यांतील वृत्तपत्रांचे व नियतकालिकांचे क्रमबद्ध तीन तीन अंक व त्यांचे **विशेषांक** हेही मांडण्यांत येतील.

१४७ **प्रदर्शन** संमेलनाच्या दिवसांत व अगोदर आणि नंतर, तीन तीन दिवस उघडें ठेवण्यांत येईल. त्यांपैकीं एक दिवस खास स्त्रियांसाठीं राहील.

१४८ **प्रदर्शनांत** पाठवावयाच्या वस्तू मालकांस आपल्या खर्चानें पाठवाव्या लागतील. त्या सुरक्षितपणें परत करण्याचा खर्च संमेलनाकडून केला जाईल.

१४९ **प्रदर्शनांत** बुकसेलर्स व प्रकाशक यांना दुकानें काढण्याची परवानगी देण्यांत येईल.

१५० प्रत्येक दुकानाबद्दल पांच रुपये भाडें पडेल.

१५१ संमेलनाच्या चालकांस पसंत नसलेलीं पुस्तकें वगैरे दुकानांत ठेवतां येणार नाहींत.

**शाखासभाः—**

१५२ चढत्या श्रेणीनें परिषदेच्या ( १ ) **साहित्य समाज**, (२) **साहित्य-सदन** व ( ३ ) **साहित्य सभा** अशा तीन प्रकारच्या शाखा राहतील.

**१५३ समाज, सदन** व **सभा** यांत किमानपक्षीं अनुक्रमें पांच, दहा व पंधरा साहित्य सेवक राहतील.

१५४ **समाज, सदन** व **सभा** यांस अनुक्रमें पांच, दहा व पंधरा रुपये **दरसाल** वार्षिक फी द्यावी लागेल.

१५५ **समाज, सदन** व **सभा** यांस किमानपक्षीं अनुक्रमें तिसऱ्या दुसऱ्या व पहिल्या प्रतीचें **ग्रंथालय** व **वाचनालय** ठेवावें लागेल, व त्यांत परिषद् ठरवील त्याप्रमाणें वेळोवेळीं भर घालावी लागेल.

१५६ एका वर्षांतील या भरीच्या किंमतीची कमाल मर्यादा, **समाज, सदन** व **सभा** यांस अनुक्रमें तीस, साठ व शंभर रुपये, अशी राहील.

१५७ प्रत्येक शाखेस वरिष्ठ शाखेंत आपलें **रूपांतर** करून घेण्याचा सवड राहील.

१५८ **संमेलन** भरविण्याचा अधिकार **सभा** या शाखेसच राहील.

**ग्रंथालयः—**

१५९ परिषदेचें एक मध्यवर्ती ग्रंथालय राहील. व त्याचें नांव **महाराष्ट्र ग्रंथालय** असें राहील.

१६० या **ग्रंथालयांत** मराठींतील सर्व प्राचीन व अर्वाचीन, मुद्रित व अमुद्रित, गद्य व पद्य अशा सर्व पुस्तकांचा संग्रह करण्यांत येईल.

१६१ तसेंच मराठी भाषेसंबंधीं इतर भाषेंतील पुस्तकांचाही संग्रह करण्यांत येईल. याशिवाय अभियुक्त परकीय भाषांतील **साहित्य, विज्ञान** व **कला** या विषयांवरील प्रमाणभूत ( Standard ) अशा निवडक ग्रंथांचाही संग्रह केला जाईल.

१६२ या **ग्रंथालयाचा** सर्व **साहित्यसेवकांस** उपयोग करतां येईल.

**साहित्यसंग्रहालय ( Literary Museum ):—**

१६३ **परिषदेचें** एक मध्यवर्ती पदार्थसंग्रहालय राहील. व त्याचें नांव **महाराष्ट्र साहित्य संग्रहालय** असें राहील.

१६४ या **साहित्य संग्रहालयांत** मराठी भाषेशीं संलग्न अशा उपयुक्त व कुतूहलोत्पादक सर्व वस्तूंचा व पदार्थांचा संग्रह करण्यांत येईल.

**साहित्यद्रव्यनिधिः—**

१६५ **परिषदेचा** एक शाश्वत द्रव्यनिधि राहील. व त्याचें नांव **महाराष्ट्र साहित्य द्रव्यनिधि** असें राहील.

१६६ शंभर रुपयांवरील सर्व रकमा या द्रव्यनिधींत जमा करण्यांत येतील.

१६७ या द्रव्यनिधीच्या व्याजांतून शेंकडा वीस इतकी रकम परिषदेच्या स्वतंत्र इमारतीसाठीं म्हणजे **महाराष्ट्र शारदा मंदीर** यासाठीं वेगळी काढून ठेवण्यांत येईल. व उरलेली रकम परिषदेच्या चालू खर्चाच्या कामीं येईल.

**मुद्रणालयः—**

१६८ परिषदेचा एक स्वतंत्र छापखाना राहील. व त्याचें नांव **महाराष्ट्र मुद्रणालय** असें राहील.

१६९ या मुद्रणालयांत परिषदेच्या छपाईचें सर्व काम चालेल.

१७० सवडीनुसार बाहेरच्या छपाईचेंही काम यांत चालेल.

१७१ या मुद्रणालयांत परिषदेच्या सभासदांचें सर्व काम सवलतीच्या दरानें छापून दिलें जाईल. इतरांकडून योग्य तो आकार घेतला जाईल.

**वक्तृत्वोत्तेजक मण्डळः—**

१७२ परिषदेचें **महाराष्ट्र वक्तृत्वोत्तेजक मण्डळ** म्हणून एक अंग राहील.

१७३ या मंडळाकडून दरवर्षी मराठीच्या वक्तृत्वाच्या परीक्षा घेतल्या जातील, व त्यांत यशस्वी होणारास वाक्पाटवानुरूप वक्तृत्वविषयक पदव्या दिल्या जातील.

१७४ चढत्या श्रेणीनें त्या पदव्यांचा क्रम (१) **वाक्पटु** (२) **वाग्वीर** (३) व **वाग्धुरंधर** असा राहील.

१७५ या पदव्यांची परीक्षा फी **वाक्पटूस** चार रुपये, **वाग्वीरास** सात रुपये व **वाग्धुरंधरास** दहा रुपये अशी राहील.

१७६ वक्तृत्वाचीं निरनिराळीं अंगें पृथक्त्वानें पण महत्वानुक्रमानें विचारांत घेऊन त्यांचें (१) **अनिवार्य** ( essential ) (२) **उपोद्बलक** ( helpful ) आणि (३) **अनुकूल** ( favourable ) असे तीन वर्ग करून त्यापैकीं अनुकूल वर्गांतील एक गुण कमी असल्यास **वाग्धुरंधर**, दोन गुण कमी असल्यास **वाग्वीर**, व तीन गुण कमी असल्यास **वाक्पटु** अशा पदव्या उमेदवारास देण्यांत येतील.

शारदादिनः—

आपल्या मराठी भाषेच्या नांवानें वर्षांतून एक दिवस स्वतंत्रपणें पाळला जाणे अनेक दृष्टीनें इष्ट व अवश्य आहे; याबद्दल कोणाचा मतभेद होईल असें वाटत नाहीं. पण हा दिवस कोणता ठरवावा हें काम सर्व विद्वानांचें आहे. जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणीं एक तरी महाराष्ट्रीय वास करीत आहे त्या प्रत्येक ठिकाणीं हा दिवस महोत्सवासारखा पाळण्यांत यावा. मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ होणाऱ्या प्रत्येक प्रयत्नासाठीं हा दिवस श्रेष्ठतम मुहूर्ताप्रमाणें गणण्यांत यावा. याचा एक विशिष्ठ कार्यक्रम ठरवून तोच शक्य तोंवर सर्वत्र पाळण्यांत यावा. या दिवशीं मराठीसाठीं दानें वगैरे देण्यांत यावीं व तीं परिषदेस देण्यांत यावी. वर्गणीही गोळा करण्यांत यावी. सारांश, हा दिवस अत्यन्त पवित्र मानला जाऊन यांत आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना उत्साहानें भाग घेण्याची सवड असावी.

इति शम्।

# महाराष्ट्र शारदामंडळ

उर्फ

## महाराष्ट्र-साहित्य परिषद्

| १ म० सरस्वतीमंडळ. | २ म० कविमंडळ (कविशार्दूल) | ३ म० साहित्य मंडळ |
|---|---|---|
| १ आचार्यमंडळ, २ भट्टमंडळ, ३ सूरिमंडळ | | |

| क्रमांक | अंग व शाखा. | जबाबदार कामदार | ग्रंथालय | साहित्य संग्रहालय | मुद्रालय | महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका | म. सा. संमेलन | कामगारांची पदवी | पदवीचे गुणमान | अभ्यास वर्षे | वय. परीक्षेसाठीं | वय. जबाबदारीसाठीं | पगार | विमा | मृत्युनिधि | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १ | परिषद | साहित्याध्यक्ष | ग्रंथालयाध्यक्ष | संग्रहाध्यक्ष | मुद्रालयाध्यक्ष | पत्रिकाध्यक्ष | संमेलनाध्यक्ष | पण्डित | स्वतंत्र संशोधनयुक्त ग्रंथ. | ३ | २७ | ४० | १५० | ४००० | परिषदेचा सभासद मृत झाला असतां त्याच्या कुटुंबियास मदत म्हणून इतर सर्व सभासदांनी एकेक रुपया वर्गणी देणें, व या जमलेल्या रकमेतून खर्चासाठीं दहा टक्के रकम कापून बाकीची मृत सभासदाच्या वारसास देणे. | |
| २ | सभा | सभाधिपति | ग्रंथालयाधिपति | संग्रहाधिपति | मुद्रालयाधिपति | पत्रिकाधिपति | संमेलनाधिपति | विशारद | स्वतंत्र पुस्तक | २ | २४ | ३५ | १२५ | ३००० | | |
| ३ | सदन | सदनाधीश | ग्रंथालयाधीश | संग्रहाधीश | मुद्रालयाधीश | पत्रिकाधीश | संमेलनाधीश | कोविद | स्वतंत्र निबंध | २ | २२ | ३० | १०० | २००० | | |
| ४ | समाज | समाजाधिकारी | ग्रंथालयाधिकारी | संग्रहाधिकारी | मुद्रालयाधिकारी | पत्रिकाधिकारी | संमेलनाधिकारी | प्रवीण | गुणदोष विवेचक लेख | २ | २० | २५ | ७५ | १५०० | | |
| | | | | | | | | निपुण | | २ | १८ | २२ | ६० | १००० | | |

प्राप्तं कालमतिक्रामन् विफलीकुरुतेऽखिलम्।

---

महीयसो किं महतो महिम्ना।

# सतरावें महाराष्ट्र साहित्य संमेलन, कोल्हापुर.

१९३२

## महाराष्ट्र शारदा मंडळ

ऊर्फ

## महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुनर्घटनेची योजना

(THE ACADEMY OF MARATHI LANGUAGE & LITERATURE)

संबंधीं

## सर्व सन्मान्य प्रतिनिधि व इतर महाराष्ट्र भाषाभिमानी

यांस

## अनावृत पत्र.

वि. वि. आजच्या या महाराष्ट्र–शारदा–महोत्सवाला **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड** यांच्यासारखे सर्वसमर्थ व निस्सीम शारदोपासक प्रभू नेते म्हणून लाभले, ही गोष्ट एक महापर्वणीच समजली पाहिजे. या पर्वणीचें संपूर्ण फल पदरांत पाडून घेणें, हें आपणा सर्वांचें कर्तव्य आहे. ही पर्वणी वायां जाऊं दिली तर त्याचा दोष सर्वस्वीं आपल्याच माथीं बसणार आहे. अशा पर्वण्या वारंवार येत नसतात, हें लक्षांत वागवूनच आपण सर्वांनीं एकमतानें व एकमुखानें काय तें ठरवावें.

आपल्या या प्रियतम मराठी भाषेचें दैन्य कायमचें नष्ट होईल, तिच्या सर्व प्रकारच्या हौशी पुरवल्या जातील व तिचे सगळे पांग फिटतील; याशिवाय आपल्या सारख्या श्रेष्ठ विद्वज्जनसमूहास ललामभूत होईल व श्रीमंत महाराजांच्या थोर पदवीस सर्वतोपरी साजेल अशाच एखाद्या विशाल कार्याचा याप्रसंगीं स्थिर व मक्कम पाया घातला जाऊन उपक्रम झाल्यावांचून प्रस्तुत सम्मेलन यशस्वी झालें असें म्हणतां यावयाचें नाहीं.

असें कार्य म्हटलें म्हणजे मराठी साहित्य सर्वांगपूर्ण व वैभवसंपन्न करणें हें होय. हा हेतु क्रमाक्रमानें साध्य होईल अशीच योजना आज आपल्यापुढें सादर झाली आहे. ही योजना पूर्ण किंवा अव्यंग आहे असें नाहीं, पण सबंध जगांत ज्या ज्या ठिकाणीं ज्ञानाचे जिवंत झरे वाहत आहेत, त्यांचे प्रवाह कशा रीतीनें मराठी भाषेंत आणून सोडतां येतील याची या योजनेंत दिशा दाखविण्यांत आली आहे. या शिवाय या योजनेंत लवचिकपणा असल्यामुळें हिचा आवश्यकतेप्रमाणें हवा तितका संकोच किंवा विस्तार करण्यास सवड आहे. पुन्हा ही योजना आपल्या पूर्व परिचयाचीच आहे. १९२८ सालीं ग्वाल्हेर येथील संमेलनांत **महाराष्ट्र शारदा मंडळ** म्हणून जी योजना आपणास सादर झाली होती, तिचेंच हें सुधारून व कांहीं संस्कार देऊन वाढविलेलें स्वरूप होय. त्यावेळेस त्या योजनेस आपण बहुमान पुरस्सर मान्यता देऊन तिची सुव्यवस्था लावण्याचा प्रयत्नही केला होता. आतां त्याच प्रौढ व प्रगल्भ दशा पावलेल्या योजनेस तशीच मान्यता देऊन जर ही आपण प्रेमादरानें **श्रीमंत महाराजांच्या** पदरांत टाकली तर, मागें जसा आपला प्रयत्न फुकट गेला तसा आतां न जातां मातृभाषेविषयींचे आपण आपलें कर्तव्य चोख बजाविलें असें होईल, अशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतों. कळवें हे विनंति.

लोहिया बाजार,
ग्वाल्हेर
२०–१२–३२

**गोविंद बळवंत माकोडे.**

परिशिष्ट ५ वें

नोच्चार्यो विफलोऽपि दूषणपदं दुष्यस्तु कामो लघुः

(*Low aim, not failure, is crime.*)

# अखिल भारतीय साहित्य परिषदेची योजना

ॐ

## तेरावें महाराष्ट्र साहित्य संमेलन, ग्वाल्हेर.

सन १९२८ ई०

## अखिल भारतीय साहित्य परिषद.

### योजना—स्थूल स्वरूप.

अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या ताब्यांत हिंदुस्थानांतील सर्व भाषांच्या परिषदा असाव्यात.

या परिषदा आपआपल्या वाङ्मयासम्बंधीं पूर्ण स्वतंत्र राहतील, पण सर्व भारतवर्षास कल्याणप्रद अशा एखाद्या गोष्टीच्या प्रचारास त्या अखिल भारतीय साहित्य परिषदेस हरएक प्रकारें सहाय्य करतील.

अखिल भारतीय साहित्य परिषदेस सर्व भाषांच्या परिषदांचे समान प्रतिनिधि निवडून दिले जातील व त्या परिषदेचें काम बहुमतानें चालेल; परंतु एखाद्या गोष्टी-मुळें एखाद्या भाषेंत नुकसान पोंहचण्याचा संभव असेल तर त्या भाषेच्या साहित्य-परिषदेच्या सभासदांचे ¾ बहुमतानें आनुकूल्य मिळाल्यावांचून अखिल भारतीय साहित्य परिषदेस आपला ठराव अमलांत आणतां येणार नाहीं.

अखिल भारतीय साहित्य परिषदेनें देवनागरी लिपीचा प्रचार करावा, शास्त्रीय परिभाषा ठरवावी व हिंदी अथवा इतर योग्य त्या भाषेस अखिल भरतखंडाची व्यवहारभाषा करण्याचा प्रयत्न करावा. व निरनिराळ्या भाषांत त्यांच्या साहित्य-परिषदांमार्फत सहकार्य उत्पन्न करावें. याशिवाय इतर कार्य करीत असलेल्या शास्त्रविषयक संस्थांशींही सहकार्य करावें.

20758 7/7/84

भारतवर्षांतील सर्व भाषांतील वर्तमानपत्रें व शास्त्रीय ग्रंथ देवनागरी लिपींतच प्रसिद्ध होत जातील असा प्रयत्न व्हावा व इतर पुस्तकें त्या त्या भाषांच्या लिपींतच प्रसिद्ध व्हावींत वर्तमानपत्रांतील जो मजकूर सर्व भारतवर्षास लागू असेल तो हिंदी या अन्य बहुमतसंमत भाषेंतच असावा.

भरतखंडांतील निरनिराळ्या भाषांच्या साहित्यपरिषदांनीं आपापल्या साहित्य-संमेलनास इतर भाषांचे प्रतिनिधि त्यांच्या साहित्य परिषदांमार्फत बोलवावेत. हे प्रतिनिधि त्या त्या साहित्यांतील निरनिराळ्या शाखांचे तज्ञ असावेत. एकेका शाखेचे कमींत कमी दोन तरी तज्ञ असावेत.

भारतवर्षांतील निरनिराळ्या भाषांच्या साहित्यपरिषदांनीं आपआपल्या भाषेंत वर्षभरांत प्रसिद्ध होणारीं शास्त्रीय व उच्च प्रतीचीं इतर पुस्तकें परस्परांस मोफत नजर करावींत.

शक्य तोंपर्यंत सर्व भाषांचीं संमेलनें सवडीनुसार एकाच वेळीं अथवा लागो-पाठ आणि एकाच ठिकाणीं भरविण्यांत यावींत. ज्या वर्षी हें शक्य नसेल त्या वर्षी या अखिल भारतीय साहित्य परिषदेनें आपल्या व प्रतिनिधींचें व कांहीं विशिष्ट तज्ञांचें संमेलन भरवून सर्व भाषांच्या तज्ञांच्या विचारविनिमयाचा योग जुळवून आणावा.

भरतखंडांतील सर्व भाषांच्या परीक्षापद्धति एकसारख्याच ( uniform ) असा-व्यात. त्यांचीं नांवेंही एकच असावींत आणि त्यांचें धोरणही एकच असावें. फक्त शिक्षणक्रम त्या त्या भाषेच्या सोयीप्रमाणें भिन्न असावा. तरी पण परीक्षांचें माप (standard of test) सारखें असावें.

अखिल भारतीय साहित्य परिषदेची एक अखिल भारतीय साहित्य पत्रिका असावी, तिची भाषा हिंदी अथवा अन्य बहुमतसंमत व लिपी देवनागरीच असावी. अखिल भारतीय साहित्य परिषदेनें अशाच प्रकारचीं आपल्या उद्देशांस व धोरणास अनुरूप अशीं वृत्तपत्रें, मासिकें वगैरे काढावींत.

**गोविंद बळवंत माकोडे**
अध्यक्ष, प्रसिद्धि मंडळ
तेरावें मराठी साहित्य संमेलन,
ग्वाल्हेर.

परिशिष्ट ६ वें

## ग्वाल्हेरकरांच्या शिरावरील नैतिक ऋण*

लेखक:—**श्री गोविंद बळवंत माकोडे** बी. ए.

कै. श्री. **सयाजीराव महाराजांच्या** कृपाछत्राखालीं मराठी साहित्य संमेलनाचें अधिवेशन महाराष्ट्रीय संस्थानांत पहिल्यानेंच भरविण्याचा अग्रपूजेचा मान बडोद्यानें १९०९ सालीं पटकाविला. त्यानंतर **श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर तिसरे** यांस अधिकारप्राप्ति झाल्यावर १९१७ सालीं महाराजांच्या कृपाछत्राखालीं संमेलनाचें अधिवेशन इंदुरास मोठ्या थाटानें भरविण्यांत आलें. नंतर पुनः १९२१ सालीं संमेलनास बडोद्यानें पाचारण केलें. आणि १९३२ सालीं कोल्हापुरानें संमेलनास आमंत्रण दिलें. कै. **अलिजा बहादुर श्रीमंत सर माधवराव महाराज शिंदे** यांच्या कार्यबाहुल्यामुळें व पुढें त्यांच्या अकल्पित निधनामुळें ग्वाल्हेरकरांचे या बाबतींतले मनोरथ पूर्ण होण्यास १९२८ सालापर्यंत त्यांस वाट पहावी लागली. पण या बिलम्बाचा वचपा ग्वाल्हेरकरांनीं संमेलनाच्या अंतर्बाह्य स्वरूपांत अपूर्व व स्पृहणीय अशी क्रांति घडवून आणून काढला. पण या गोष्टीस आज सुमारें तेवीस वर्षे लोटलीं. आज अलिजा बहादुर **श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे** हे स्वतंत्र भारताच्या एका महान् व वैभवशाली घटक राज्याचे **राजप्रमुख** आहेत. इतकेंच नव्हें, तर आद्य महाराष्ट्र जो **अवन्ती** देश त्याचेही ते प्रभू आहेत. या शिवाय विद्येचा भोक्ता आणि विद्वानांचा आश्रयदाता असा जो जगद्विख्यात **विक्रम** त्याचे ते वारसदार आहेत. **श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे** हे स्वतः मोठे स्वदेशाभिमानी व सुविद्य आहेत. अशा परिस्थितींत श्रीमंत महाराजांच्या कृपाछत्राखालीं पुढच्या वर्षाचें मराठी साहित्य संमेलनाचें अधिवेशन ग्वाल्हेरीस भरविण्यांत यावें अशी अनेकांची आशा, इच्छा व अपेक्षा आहे. व ती ग्वाल्हेरकर विफल होऊं देणार नाहींत असा ठाम भरंवसा वाटतो. व मागच्या खेपेच्या विलम्बाची ग्वाल्हेरकरांनीं आपल्या कार्यकौशल्यानें जशी भरपाई केली, तशीच याही खेपेच्या विलम्बाची उणीव ते अधिकच अहमहमिकेनें भरून काढतील याविषयीं आम्हांस तिळमात्र

* हा लेख 'लोकसत्तेंत' छापला गेला आहे.

शंका नाहीं श्रीमंत सरदार शितोळे साहेब व श्रीमंत सरदार आंग्रेसाहेब यांच्यासारखे धडाडीचे वीर या कामीं पुढाकार घेण्यास मागच्याप्रमाणें याही प्रसंगीं स्वयंस्फूर्तीनें पुढें सरसावतील यांत शंकाच नको. मराठी भाषा व वाङ्मय यांच्या उद्धारासाठीं ज्या ज्या गोष्टी करावयाच्या कै. **श्रीमंत सर माधवराव महाराजांच्या** मनांत राहून गेल्या, त्यांना मूर्त स्वरूप देऊन कै. **महाराजांच्या** ऋणांतून अशत: मुक्त होण्याच्या दृष्टीनेंच या ' माधव भक्त ' व ' माधव-शिष्यां ' नीं कै. महाराजांच्या **श्रीमाधव मराठी वाङ्मय मंडळा**'ची स्थापना केली व त्या मंडळाच्या विद्यमानें संमेलनाचें अधिवेशन भरविण्यात आलें. त्या संमेलनांत जे ठराव पसार करण्यात आले व जे संकल्प सोडले त्यावरून ग्वाल्हेरकरांचा आत्मविश्वास व उत्साह किती दांडगा होता, हें स्पष्ट दिसून येतें. ग्वाल्हेरकरांस त्याचें विस्मरण होणें कधींच शक्य नाहीं. मध्यभारताच्या विद्यमान **राजप्रमुखांच्या** कृपाछत्राखालीं ते संकल्प तडीस नेणें ग्वाल्हेरकरांस मोठेंसें कठीण आहे असें नाहीं. नव्हे, त्यांच्या शिरावर तें एक मोठें नैतिक ऋणच आहे. पण तें सर्वस्वी ग्वाल्हेरकरांच्या आटोक्यांतलेंच आहे. या कामीं कै. **श्रीमंत सर माधवराव महाराजांची** स्मृति ग्वाल्हेरकरांस मोठी स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक ठरेल, हें सांगावयास नकोच.

श्री ग्रंथ संग्रहालय ... स्थळ
अनुक्रमांक २०१४८ वि. ...
क्रमांक ... नों: दि. ...
REFBK-0009082
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०१२